साप्ताहिक

# माणूस

२४ नोव्हेंबर ८४/२ रुपये

## आपली लोकशाही विकृत कशी झाली?




नवा चित्रपट:

## मोहन जोशी हाजिर हो

## कादंबरीचा जन्म

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : सव्वीसावा

¤

२४ नोव्हेंबर १९८४

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४ ५९

¤

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर



## मुंबापुरी

### □ धुवांधार

इंदिरा गांधींचे फोटो काढणे म्हणजे एका विस्तीर्ण महानदीचे मूड्स टिपण्यासारखं आहे असं विख्यात छायाचित्रकार रघुराय यांनी लिहिलं होतं. इंदिराजींना याहून अधिक समर्पक उपमा कोणती असू शकेल ?

गावावर नाराज होऊन पहाडात लुप्त होणाऱ्या नदीची एक तिबेटी दंतकथा आहे. गावकरी अखेरीस त्या नदीची करुणा भाकतात, समजूत काढतात अन् ती गावात पुन्हा अवतरते अशा आशयाची ती गोष्ट आहे. इथे कोणी कुणाची करुणा भाकायची हा प्रश्न आहे.

जवळजवळ दोन तपाहूनही अधिक काळ इंदिरा गांधी भारतीय राजकारणाच्या भरताड खाचा–खळग्यांतून सळसळत राहिल्या. कधी रुद्रभीषण तर कधी सौम्य. मंद. काठाकाठानं भारतीय जनमानसाला जपत राहिल्या. त्यांचा थांग मात्र कधीच कुणाला लागला नाही.

इंदिरा गांधींविषयी पुष्कळ लिहिलं जातंय. बोललं जातंय. आणखी बरंचसं लिहिलं जाईल. वेगवेगळ्या दृष्टिकोनातनं त्यांच्या कर्तृत्वाविषयी त्यांच्या प्रवृत्तीविषयी, राजकारणाविषयी, राजनीतिमूल्यांविषयी, ही चर्चा अर्थातच अनिवार्य आहे. नव्हे, हे असं मंथन आहे की जे होणं आवश्यक आहे.

पण इंदिराजी गेल्याचं दुःख खूप खोल रुतून बसणारं आहे. जिव्हारी लागणारं आहे. एक संपूर्ण पिढी हे दुःख उरी बाळगून जगत राहील. खालमानेनं. जितकं हे दुःख आत झिरपत जाईल तितकी जनसामान्यांची वैचारिक ताकद वाढेल अशी आशा करूया. शेवटी विलक्षण ताकदीच्या माणसांची दुःख झेलायला तेवढीच ताकद लागते. नदीचा थांग शोधायला निघाल तेव्हा डोळ्यांच्या जागी खाचा नकोत, निरंजनं हवीत.

इंदिराजींविषयी सलगीनं लिहायची आमची पोच नाही. तेवढा अधिकार नाही. त्यांच्या मुंबई-भेटी 'कव्हर' करण्याइतपतच त्यांचा आमचा वास्ता, एरवीही, आम्ही काही 'इंदरा–वॉचर्स' नव्हे, तेव्हा त्यांच्याविषयी आगाऊ जिव्हाळाही नाही अन् उगीच येता जाता आगपाखडही नाही. आम्हाला स्तिमित करून टाकलंय ते या नदीच्या प्रवासानं. किती धुवांधार !

भारतीय राजकारणाच्या संदर्भात इंदिरा गांधींनी काही प्रश्न उपस्थित केले. हे प्रश्न मूलभूत आहेत. न डावलता येणारे असे.

भारतीय राजकारणाच्या चिंतनाला या प्रश्नांमुळे एक वेगळंच परिमाण लाभलं आहे. हे प्रश्न केव्हा ना केव्हा उपस्थित होणार होतेच. ते इंदिराजींनी वेळोवेळी मांडून एका साचेबंद, वैचारिक चौकटीला नवा कोन जोडला. बुद्धिवंतांना हे खूप फसिनेटिंग वाटेल.

इंदिराजींना टीकाकारांनी ऊठसूट झोडपलं. भगतगणांनी अहोरात्र डोक्यावर नाचवलं. या दोन्ही वर्गांनी इंदिराजींवर अन्याय केला. पुढेमागे केव्हा तरी इंदिरा गांधी या पुराणशिल्पासारख्या वाटतील चिखलमातीचे खूपसे थर. शेंदूर–गुलालाचे गच्च तवंग.

इंदिरा गांधी गेल्याचं दुःख भडभडून ओकून सांगता येणार नाही. त्या गेल्या त्या दिवशी अवघ्या दोन तासात 'डास्टर्डली अटॅक' हेच दोन शब्द किमान पन्नास वेळा वाचून-लिहून झाल्यावर निषेधाचे सगळे शब्द आता लवाड वाटतात.

शेवटी इतकंच–मृतात्म्याला सद्गती मिळावी म्हणून गंगेत दिवे सोडण्याची आमच्याकडे परंपरा आहे. आम्ही इथूनच दीपदान करतो. इंदिरा गांधी नावाची नदी किनाऱ्याकिनाऱ्याने लखलखून निघावी. लखलखत राहावी.

## ☐ जनता – भाजप

निवडणुकाचे बिगुल दिल्लीत वाजतात न वाजतात, तोच मुबईच्या सहा लोकसभा-जागांसाठी विरोधी पक्षानी एकमेकाविरुद्ध रणशिंगे फुकली आहेत.

मुबईत १९८० च्या निवडणुकीत जनता पक्षाने सहापैकी पाच जागा हस्तगत केल्या, नंतर जनतापक्ष दुसऱ्यादा फुटला. जनसंघवाल्यानी भारतीय जनतापक्षाची पताका रोवून राम जेठमलानीना आपल्यात खेचल. ऐशीची विधानसभा–निवडणूक जनता अन भाजपने आपापल्या सामर्थ्यावर लढवली. यात भाजपचं पारडं जड ठरल. दक्षिण मुबई या जनताच्या मतदारसघातन विधानसभेच्या तीन जागा भाजपने जिंकल्या. तेव्हा आता दक्षिण मुबईची ही रतनसिंह राजदाची लोकसभेची जागा भाजपने मागितली आहे.

जनतावाले अर्थातच याला तयार नाहीत. ते म्हणतात की, विद्यमान खासदाराना तिकिटं नाकारायची नाहीत. भाजपवाले याला कडकडून विरोध करतायेत. झगडा चालू आहे

जनतावाले उत्तरमुबईची जागा भाजपसाठी सोडायला तयार आहेत. उत्तरमुंबईत भाजपचा जोर चांगला आहे; पण भाजपवाल्याचे डोळे दक्षिणमुबईवरच लागून राहिले आहेत. यात भाजपवाल्याचा दुहेरी हात आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविरुद्ध सतत गरळ ओकणाऱ्या राजदाना अद्दल घडवायची आणि आपल्या जसवतीबेन मेहताचा रस्ता मोकळा करायचा.

डॉ. सुब्रमण्यम स्वामीनी उत्तर–पूर्वमुंबईची जागाही चर्चेत अडकून आहे. भाजपने प्रमोद महाजनासाठी या जागेवर आपला क्लेम लावला आहे. डॉ. स्वामीनी आपली उमेदवारी घोषित करून टाकली आहे अन डॉ. दत्ता सामतानीही शरद पवाराकडे या सीटसाठी साकड घालून ठेवलंय.

राम जेठमलानीची उत्तर–पश्चिम आणि प्रमिला दंडवत्याची उत्तर–मध्यमुबई या दोन जागा अनुक्रमे भाजप आणि जनताला जातील यात वाद नाही. कांग्रेस (आय) कडे असलेली एकुलती एक आर. आर. भोळधांची जागाही कांग्रेस (एस) पासनं ते थेट अरुण कांबळ्यापर्यंत सगळचांना हवीये.

एकूण काय, सध्या तरी विरोधी पक्षांमध्ये घोळ चालू आहे हा मजकूर आम्ही लिहून काढेस्तवर एखादा समझोत्याचा फॉर्म्युला तयार होईलही; पण ह्या मजकुराची शाई वाळण्याअगोदर हे सगळे पक्ष पुन्हा मारामाऱ्यांवरही येतील.

कॉंग्रेस (आय) मुंबईत क्षीण असताना आणि मुरली देवरा अन भाऊराव पाटलासारखे उमेदवार असताना सत्तारूढ पक्षाची चाळणी उडवायला फारसे प्रयत्न करावे लागणार नाहीत; पण आधी आपल्यात नको का एकोपा असायला ? विरोधी पक्षाना नेमकी हीच सौ बात की एक बात कळत नाही.

## ☐ स्वस्तातली बदली

मुबई महानगरपालिकेचे प्रशासक द. म. सुखथनकराची महसूलखात्याचे सचिव म्हणून तडकाफडकी बदली झाल्याचे वाचून आम्हाला भारी वाईट वाटले महापालिकेचे आयुक्त म्हणून त्याची तीन वर्षांची मुदत ८ एप्रिल ८४ ला सपली आणि त्याच सुमारास बरखास्त झालेल्या ह्या पालिकेचे पहिले प्रशासक म्हणून एक वर्षासाठी त्याची नेमणूक झाली. म्हणजे मुदत सपण्यापूर्वी चार ते पाच महिने आधीच त्यांची उचलबागडी करण्यात आली. वसतदादा सध्या कोणाचेच ऐकण्याच्या मनःस्थितीत नाहीत. (अगदी बाबुराव भापसे आणि शालिनीताई पाटील याचेसुद्धा !) त्यामुळे दुर्गा भागवतानी एशियाटिकमधून तोफ डागली काय किंवा वृत्तपत्रानी आकाडतांडव केला काय तरी ही बदली लाबणीवर टाकणे सरकारला परवडले नसते.

मुंबई महापालिका बरखास्त झाली तरी सुरुवातीस वाटले त्याप्रमाणे सुखथनकरांनी राजकीय नेत्याना पालिकेच्या कारभारात ढवळाढवळ करू दिली नाही. गेले काही महिने तर त्यानी अनधिकृतरीत्या चटई क्षेत्रफळ वाढवून घेतलेल्या बऱ्याच उत्तुग इमारतीवर परवानगीबाहेर केलेले जादा बांधकाम पाडून टाकायची नोटीस दिलेली होती. त्यापैकी अतिमहत्त्वाच्या इमारती म्हणजे पेडररोडवरील छत्तीस मजली प्रतिभा को-ऑपरेटिव्ह सोसायटी आणि सुप्रसिद्ध समाजसेवक व तळागाळातील गरिबाचे कैवारी युसुफ पटेल यांची बॉबे सेंट्रल येथील केडी अपार्टमेंटस् आणि क्षिया को-ऑपरेटिव्ह सोसायटी. प्रतिभामधील प्रत्येक डुप्लेक्स फ्लॅटची किंमतच जवळजवळ एक कोटीच्या घरात आहे. ह्या इमारतीवरचे आठ मजले पाडायचे म्हणजे कमीत कमी आठ कोटी रुपये तरी पाण्यात जाणार! हे बाधकाम पाडायचाच खर्च मुळी वीस लाखापर्यंत जाईल असा अदाज आहे. त्या मानाने सुखथनकराची बदली अधिक स्वस्तात पडेल, असा विचार दादानी केला असावा.

महापालिकाआयुक्त होण्याआधी सुखथनकर शिक्षणसचिव होते; परतु आयुक्त झाल्यापासूनच ते प्रसिद्धीच्या झोतात आले. याचे सारे श्रेय अर्थातच मुबापुरीचे फेरीवाले, झोपडपट्टीवाले, पीयुसीएल आणि बिल्डर्स (झोपडपट्टीवाले आणि बिल्डर्स ह्याच्यामध्ये पीयुसीएलचे नाव टाकून त्याचा दोन्हीकडे सबध आहे असे दर्शविण्याचा आमचा उद्देश नाही.) याना जाते. मुबापुरीत फारच कमी आयुक्त असे होऊन गेले की, त्याचे नाव ह्या शहराशी कायमचे निगडित झाले. सुखथनकर हे अशापैकीच एक होते.

सामान्यतः वयाबरोबर सरकारी अधिकाऱ्यामध्ये जी मुजोरवृत्ती वाढीला लागते, तिचा सुखथनकरामध्ये अभाव आहे. त्यामुळे प्रशासकासारखे पद–ज्या ठिकाणी सर्वसामान्य लोकांशी जास्तीत जास्त संबध येतो असे पद साभाळताना त्यानी नागरिकाचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला, नवे प्रश्न निर्माण केले नाहीत.

लोकसभा निवडणुकीच्या जवळजवळ दोन महिने आधी ही बदली करण्यात आल्यामुळे, सुखथनकरानी ज्या बिल्डर्सविरुद्ध मोहीम उघडली होती, त्याच्याकडून निवडणूकनिधी उभारण्याच्या उद्देशाने ही बदली करण्यात आली असे सागण्यात येते. प्रॉव्हर्बियल पब्लिक मेमरी शॉर्ट असते (हे वाक्य इग्रजीत असल्याचा आम्हाला का बरे भास होत आहे?) हे लक्षात घेता निवडणुकीपर्यंत ही बदली वादाचा विषय राहणार नाही हे सत्ताधारी पक्षाला ठाऊक आहे

असो. सुखथनकर महसूलखात्यात गेल्याने त्या खात्याचे तरी भले होईल आणि 'महसूल' खात्यात तरी खाल्ला जाणार नाही अशी आमची धारणा आहे. मुबापुरीचे काय – तो आता कागापुरी झाली आहे. मुबई महानगरपालिकेचे पहिले पारशी प्रशासक म्हणून फिरोजशहा मेहतांच्या ह्या एकशे

आठ वर्षांच्या सस्थेचा कारभार ते कसा हाकतात हे पुढील तीन वर्षे पाहायचे.

सुखथनकराच्या बदलीसाठी मुबई प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष मुरली देवरा यानी झटून प्रयत्न केले. त्यामुळे आता निवडणुकीपर्यंत ते ह्या 'मुंबापुरीस' कसे झकास तळून काढतील याकडे आमचे डोळे लागले आहेत!

### ☐ शिखरांची हाक !

डोरोथी नॉर्मल नावाच्या न्यूयॉर्कमधल्या एक पत्रकार आणि छायाचित्रकार आहेत. इंदिरा गाधी एकतीस वर्षांच्या असताना पडित नेहरूबरोबर अमेरिकेला गेल्या तेव्हा त्यांची डोरोथीशी पहिली भेट झाली. पुढे त्याची ही मैत्री पस्तीस वर्षे टिकून राहिली. इदिरा गाधींनी सतरा एप्रिल एकोणिसशे अठ्ठावन्नला त्याना लिहिलेले पत्र आम्ही येथे देत आहोत. 'टाइम्स'च्या नोव्हेंबर बाराच्या अकात ते छापलेले आहे. अक्षरे जेव्हा मनापासून लिहिली जातात तेव्हा त्याचे भाषातर करू नये. तुम्ही कितीही कौशल्य वापरले तरी त्यांच्या आत्म्याला इजा पोहोचतेच म्हणून हे पत्र – जसेच्या तसे–

April 17, 1958

I myself am feeling very unsettled–is it age, do you think? Ever since I was a small girl, there seemed to be some force driving me on–as if there were a debt to pay. But suddenly the debt seems to be paid–anyhow I get a tremendous urge to leave everything and retire to a far far place high in the mountains!

–विष्णु जयदेव

# शरद जोशी : निवडणुका व राजकारण

## मुलाखत - संजय संगवई

कालस्य कारणं राजा की राजा कालस्य कारणं हा सनातन वाद पुढेही चालू राहील. प्रत्येक घटनेच्या वेळी या पदातील एका चरणाचा अर्थ कळत राहतो, दोन्ही परिस्थितीना अनुरूप असा पुरावा मिळत जातो. इदिरा गाधी याच्या निधनानतर राजा कालस्य कारणं हे अनेक पातळ्यावर जाणवत रहातं. अनेक तऱ्हेच्या परिस्थितीची, घटनाची साद–प्रतिसादाची शक्यताच इदिरा गाधी गेल्यानतर नाहीशी झाली.

त्या गेल्यामुळे सर्वच राजकीय पक्ष–संघटनाची विशेषत: विरोधकांची पचाईतच झाली. काहीही दृश्य कार्यक्रम किंवा आकर्षण नसताना, विश्वासार्हता नसताना कशाच्या आधारावर गर्जना करायच्या असा प्रश्न त्यांना पडला. आजपर्यंत अख्खी हयात 'इंदिरा' या एकाच सदर्भाला धरून इथे सर्वांनीच मनसोक्त शब्दच्छल व सघटन–शक्तिप्रदर्शन केले. गर्जना-प्रार्थना–विनवण्या-घोषणा केल्या; पण आता हा रेफरन्स-पॉइंटच कोसळून पडल्याने नेमक कुठं जायच, का जायच या सभ्रमात सगळी डावी–उजवी मडळी पडली आहेत.

या परिस्थितीत एका विशिष्ट गरजेतून निर्माण झालेल्या परिस्थितीचा परिपाक असलेल्या आणि एखाद दृश्य (tangible) ध्येय समोर ठेवलेल्या सघटनेच काय होत असेल? ठरलेला कार्यक्रम पार पाडताना उद्दिष्टात बदल होऊ न देता फक्त धोरणं तात्पुरती बदलायची आणि आपल काम सुरूच ठेवायचं अशी साधारणत: भूमिका या सघटनाची असते. महाराष्ट्रात अशा तऱ्हेची कार्यक्रमावर आधारलेली, त्याचबरोबर मोठा पाठिंवा असलेली एकच सघटना आहे : शेतकरी सघटना.

नाशिक–चाकणच्या आदोलनापासूनच उदयाला आलेल्या या सघटनेची वाढ ही meteoric rise या सदरातच मोडते. कोणत्याही पक्ष–सघटनेला न जमलेला प्रभाव टाकून सर्वत्र पाठिंबा मिळवणे, नवी जाणीव निर्माण करणे, खेडयापाडयापर्यंत नुसतं पोहचणं नव्हे तर एखाद्या निश्चित उद्दिष्टान, तत्त्वज्ञानानं पोहचणं, या सर्व गोष्टी एकाच वेळी महाराष्ट्रात तरी याच सघटनेला जमलेल्या आहेत. पुन्हा हा प्रभावाचा कालखड दोन–तीन महिने एवढाच मर्यादित राहिला नाही. सतत चार वर्षे हा प्रभाव एका किमान पातळीवर स्थिर राहिला आहे. अनेक प्रकारचे सत्याग्रह, इतर शेतकरी संघटनाशी सहकार्याचे प्रयोग, आंदोलनाचे विविध मार्ग, शेतकऱ्याचे अनेक तऱ्हेचे प्रयत्न या सघटनेने हाताळले. चाकणच्या कादाआदोलनापासून दूधआदोलनासारखी यशापयशे पचविली. या वर्षी गाधीजयतीपासून गुजरातच्या शेतकरी संघटनेच्या साहाय्याने बार्डोली ते महाराष्ट्रातील टेहरे गावापर्यंत मोर्चा काढला.

सघटनेला स्वत:च्या सामर्थ्याची जाणीव होऊ लागते तशी तिचा काही प्रत्यक्ष दृश्य (tangible) परिणामासाठी वापर करण्याची प्रवृत्ती होणे अपरिहार्य आहे. संघटनेची ताकद वापरायची उघड सधी म्हणजे निवडणुका–राजकारण. इथे सघटनेचे सुरुवातीपासूनचे सूत्रधार शरद जोशी यानी राजकारणापासून सघटना अलिप्त ठेवायची भूमिका मोठ्या नेटाने लावून धरली. सर्व तऱ्हेचे राजकारणी–सत्ताधारी चोर आहेत कोणीही सत्तेवर आल तरी शेतकऱ्याला न्याय मिळण अशक्य आहे. कारण तिथे येणारा इथल्या व्यवस्थेचा गुलाम असतो. इथल्या भाडवलनिर्मितीच्या अनैसर्गिक प्रक्रियेने तो बाधलेला असतो. त्यामुळे त्याचा शेतकऱ्यांना काही उपयोग नाही, असा त्याचा रोख.

सत्ता–राजकारण अशा तऱ्हेने बाजूला (Non–issue) करून टाकल्यावर जोशीनी या सघटनेच्या आदोलनाद्वारे शेतकऱ्यामध्ये स्व–अर्थाची, हक्काची जाणीव निर्माण करणे व त्याबाहेर शेतकऱ्याच्या मागण्यांसाठी वातावरण निर्माण करणे या दोन गोष्टी साध्य केल्या.

आता यापुढे काय ? ही जाणीव शक्ती कुठे वितरित करायची, कशी वापरत रहायची, ती गजून जाऊ नये म्हणून तिला कोणत्या मार्गाने उजाळा द्यायचा, हे प्रश्न आले. शरद जोशीनी आपल्या परीने त्याचे अनेक मार्ग चोखाळले. दूधआदोलन, विठोबाला साकड, पंजाबात आदोलन, टेहऱ्याला आलेला मोर्चा इत्यादी.

१९८४ हे शेतकऱ्याचं मुक्तिवर्ष म्हणून जाहीर करण्यामागची हीच भावना असावी. गावबंदीसारखे कार्यक्रम घेऊन ही जाणीव जागी तर ठेवायची, ती इतराच्या दृष्टीसही प्रखरतेने आणायची अशी यामागे भावना. मात्र हे करताना निवडणूक–मतदान–राजकारण याचा विचार नको, अशी एक मुक्त ताकीदच जोशी देतात.

*मात्र सटाणा–मनमाडच्या अधिवेशना*पासून संघटनेत काही 'बंडखोर' प्रवृत्ती, विचार येऊ लागले. त्याना थोपवण अवघड होतं. या वर्षी तर गिरणा सहकारी साखर कारखान्यासकट नाशिक जिल्ह्यातल्या सटाणा–ठेंगोडा सूतगिरण्यामध्ये, नांदगाव बाजारसमितीच्या निवडणुकात शेतकरी संघटनेच्या आंदोलक पॅनेलने विजय मिळविला. संघटनेच्या त्रिमूर्तीपैकी प्रल्हाद पाटील–कराड यांनी आमदार विनायक पाटलाबरोबर हातमिळवणी केली. निफाड सहकारी साखर कारखान्यात त्याचे पॅनेल आले. तिकडे एक जोशपूर्ण संघटक अनिल गोरेसुद्धा समोर निवडणुका पाहून स्वत:ला संयम घालू शकत नाहीत.

संघटनेची शक्ती अशी उसळघा घेत आहे, मुक्तिवर्ष म्हणून काही तरी निर्णायक केल जाणार अशी आशा! निवडणूकही समोर आहे–म्हणजे निर्णायक कृती करायला वावही आहे. तेवढ्यात इंदिरा गांधीच्या निधनामुळे इतरांना बसलेला धक्का (Setback) शेतकरी संघटनेलाही कमकुवत करणारा राहिला का? समोर निवडणुका असताना अशा परिस्थितीत संघटनेची भूमिका काय असेल, पुढचा कोणता मार्ग चोखाळणार? त्याहीपेक्षा संघटनेच स्वत:बद्दलचं मूल्यमापन काय असेल, बदलत्या परिस्थितीत कोणत्या पद्धतीनं बदलायच, शेवटी संघटना उभी करणारे नेते–कार्यकर्ते याची स्वत:संबंधी व परस्परासंबंधी भूमिका संघटनेच्या विकासाबरोबरच बदलते ती कोणत्या दिशेने?

अशा काहीशा नेमके टोक नसलेल्या प्रश्नाच्या चर्चेसाठी संघटनेचे नेते शरद जोशींची भेट घेतली.

## राजकारणात अजूनही नाही

चाकणनजीक आंबेठाणच्या त्याच्या शेतीवरील घरात आदल्याच दिवशी गिरणा सहकारीच पॅनल राहून गेलं होतं. भास्करराव बोरावकेही तिथे होते. बरोबर असलेल्या निरंजन आगाशेनं अगदी व्यवस्थित प्रश्न काढले होते. मात्र शरद जोशीसारखी पार 'तयार' झालेली लीडरमंडळी अशा तयार प्रश्नाना तयार उत्तरं देण्यात पटाईत असतातच. ती कधीच हातात सापडत नाहीत. तेल लावूनच बसलेली असतात म्हणा ना! *या वेळी आर्थिक प्रश्नात डोक घालण्याच* कटाक्षान टाळल.

इंदिरा गांधीच्या निधनाचा मुक्तिवर्षाच्या संकल्पित आंदोलनावर परिणाम झाला हे त्यानी मान्यच केलं. 'आंदोलनावर परिणाम झाला नाही तरी, एखादी कृती त्या कालाच्या संदर्भातच घडत असते. म्हणून तिच्यात बदल करावा लागतो; पण हा बदल तेवढ्यापुरताच! ऐतिहासिकदृष्टीनं आंदोलन पाहिलं तर काही विशेष घडतंसं वाटत नाही. आमचं पुढचं धोरण आता बावीस तारखेस पुण्याच्या बैठकीतच ठरेल.'

हे धोरण काय असेल हे सांगायचं मात्र त्यानी कटाक्षान टाळल. गिरणा सहकारीच्या निवडणुकाचा दाखला देऊन, त्या अनुषंगानं असणारं धोरण असेल का? असा कयास देताच शरद जोशींनी वेगळाच मुद्दा मांडला. 'आम्ही राजकारणात पडलो असं नाही. निवडणुका लढविल्या म्हणून राजकारणात पडलो अस कस म्हणता? या आर्थिक संस्थेच्या निवडणुका आहेत, त्याची राजकीय निवडणुकांशी बरोबरी होणार नाही. शेतकऱ्यांच्या हिताची ही संस्था. म्हणून निवडणुका लढविल्या.'

केवळ निवडणुका म्हणजे राजकारण नाही, असे त्याना म्हणायचे का? राजकारणाचं त्याना सोवळ आहे का? यावर ते म्हणतात,

राजकारणाचं आम्हाला सोवळं नाही. तो जीवनाचा अपरिहार्य भाग आहे हे कबूल. मात्र शेतकरी संघटनेचं उद्दिष्ट या मार्गाने साध्य होणार नाही. पंतप्रधान– मुख्यमंत्री किंवा खुद्द कृषिमूल्यआयोग रद्द झाल्याने–*सुद्धा काही फरक पडणार नाही. शेतकऱ्याना* न्याय न मिळण्याची कारणच वेगळी आहेत. ती इथल्या अर्थव्यवस्थेत आणि मनोवृत्तीत आहेत. शेतकरी संघटनेला हे दोन्ही बदलायचं आहे.

## उद्देश वेगळाच आहे

त्यावर आम्ही विचारतो, 'मग तुमच्या मागण्या–आंदोलन ही कोणाला–कशासाठी उद्देशून असतात? विशिष्ट संस्थात्मक रचनेकडून या मागण्या पूर्ण केल्या जाव्या अशी अपेक्षा असते ना?'

**जोशी** : आमच्या या प्रकट मागण्या ज्याच्या विरुद्ध आम्ही आंदोलन करतो, ती खरी *लक्ष्ये नाहीतच. आमचे दूधआंदोलन साफ* पडले. आम्ही नेते कबूलच करतो; पण आमच्या शेतकऱ्याना तस खर वाटतच नाही कारण दूध थांबवणं हा खरा उद्देश नव्हताच. तसच सत्ताधाऱ्यांच आहे. ते आमच्या लेखी केवळ सोयिस्कर ठोकायच साधन एवढच. आम्ही सरकारी नोकराविरुद्ध घोषणा करतो. कारण ते आमचे Convinient punching targets आहेत

आमच्या सर्व प्रकारच्या आंदोलनामुळे, गावबंदीमुळे आज खेड्यात परंपरागत नेते ऊर्फ गावगुंड जायला भीत असतात. गावच्या या गुंड राजकारणाला आमच्या आंदोलनानं अक्षरश: फोडून काढलं आहे.' शेतकऱ्याला जाणीव होत आहे. स्व–अर्थाची. आतापर्यंत आपणही मिळवलं पाहिजे ही जाणीव अनेक संस्कार, गावातले प्रतिष्ठित यामुळे दबली होती.'

ती जाणीव उभी करणे आणि तिला संघटित रूप देणे हे शरद जोशीच्या मते संघटनेचे मुख्य उद्दिष्ट मग यात राजकारण येत नाही? दुसऱ्या कुठल्या तरी सत्तेविरुद्ध उभ राहणं ही भावनाच सत्ताप्राप्तीच्या वृत्तीच गमक नसते? मग यासाठी संघटना उभारली जाते. एकदा संघटना उभारली की तिचे अंतर्भूत नियम हे पाळायलाच लागतात. mobilization – manouvering हे प्रकार अपरिहार्य असतात. संघटना जशी मोठी होते तसं त्याबरोबर येणाऱ्या या इतर घटकामध्येदेखील वाढ होत जाणार नाही का?

## तुम्ही चौकट वापरता?

याकरता मागच्या बोलण्याचा संदर्भ *धरून एक खडा टाकून पाहिला. म्हटलं,* 'गावातल्या प्रस्थापित पुढाऱ्याचा प्रभाव फोडून काढण्यासाठी तुम्हाला तेथीलच दुसऱ्या कमी प्रमाणात– पण प्रभाव असलेल्या गटाला

पृष्ठ २९ वर

# हत्येनंतरच्या भीषण होळीत विद्रूप झालेली राजधानी

**मागच्या आठवड्यात डॉ. दाभोळकरांचा पंजाबवरील लेख प्रसिद्ध झाला. त्यात पंजाबी शिखांचा असंतोष का व कसा धुमसत होता आणि ही कोंडलेली वाफ खलिस्तानच्या दरवाजाला कशा धडका देत होती याचं चित्र होतं. या अंकात इंदिराजींच्या हत्येनंतरची अक्राळ–विक्राळ, बीभत्स, दंगल उसळली कशी, पेटली कशी आणि त्यात सगळ्या संवेदनांची भीषण होळी कशी झाली याची साक्ष देणारा, अस्वस्थ करणारा वृत्तान्त**

**दत्तप्रसाद दाभोळकर**

## एक : शब्दांचा आधार

अधाशी वाचक म्हणून यापूर्वी मी खूप वाचलय. फाळणीच्या वेळी झालेल्या 'कतले आम'ची वर्णने वाचलीत. विजय परुळेकरानी दाखवलेली व्हिएतनाममध्ये नापाम बाँबमध्ये जळून विद्रूप झालेल्या मुलांची काळीज हलवणारी छायाचित्रे पाहिलीत. स्वतःसुद्धा खूप हिंडलोय. खूप पाहिलय.

पण आज माझ्याभोवती ही प्रचड धग आहे. या धगीत माझे आतापर्यंतचे अनुभव, सवेदना, भावना, आकार सारे पार वितळून गेलेत. मज्जातंतूचा पार भुगा झालाय. मी बधीर आहे. कशालाही स्पर्श करू न शकणारी एक बोथट महारोगी सवेदना साऱ्या शरिराला वेढून उरलीये.

सभ्यता, सस्कृती, राग, शिसारी, घृणा, वेदना, शरम, मान, अपमान, सूड, पेटलेले रक्त, गोठलेले डोळे कोणत्याही शब्दाना आज काही अर्थ उरलेले नाहीत. लिहिणे, बोलणे, विचार करणे याला खरोखरच काही अर्थ उरलेला नाही.

पण काही तरी लिहिल्याखेरीज मला अजिबात चैन पडणार नाही. मी भेदरलोय, गागरलोय. शब्दाच्या कुशीत शिरल्याखेरीज मला झोप येणार नाही. शब्द कदाचित बोट धरून मला थोडा धीर देतील.

आतापर्यंतच्या आयुष्यात माणसापेक्षा शब्दांनीच मला अधिक आधार दिलाय.

कोणाला हे वेड्याचे असंबद्ध बरळणे वाटेल. वाटू देत. मला त्याची पर्वा नाही.

—मला स्वत ला माणूस म्हणून कोलमडून पडून कायमचे नेस्तनाबूत होण्यापूर्वी स्वत.साठीच थोडा आधार हवाय.

## दोन : नियतीच्या हातातली क्रूर पानं

सुरुवात तशी कोठूनही करून चालेल. थोडी सुसंगत वाटणारी पेलणारी सुरुवात. आज बुधवार तारीख ३१ ऑक्टोबर. आज सकाळी उठलो त्या वेळी अनेक दिवसानी अगदी मोकळा मोकळा आणि प्रसन्न होतो. खूप दिवसांनी किती निवांत आणि छान वाटत होते. माझे या वर्षी अटार्क्टिकावर जाण्याचे नक्की झालय. गेले काही आठवडे मी त्याच्याच धमाल गडबडीत होतो. त्या सदर्भात हिमालयात 'हाय अल्टिट्युड वॉर फेअर स्कूल'मध्ये प्रशिक्षण होते. तेथे करावयाच्या प्रयोगांची आखणी आणि जुळवाजुळव सुरू होती. माझी या मोहिमेसाठी कदाचित नेता म्हणून होणारी निवड तशी झालेली नाही. म्हणून दुखावलेल्या मनाची समजूत घालावयाची होती. त्रिवेंद्रमला डॉ. वसत गोवारीकरांना भेटून आणि डॉ. कासीम याना सागून अतराळ सशोधनाचे कार्य आणि अटार्क्टिकाची गरज याची सागड घालावयाची होती. माझी सारी कामे अगदी मनाजोगती छान पार पडलीत त्यातच काल किर्लोस्करचे संपादक ह. मो. मराठे याचे पत्र आलंय. मी 'माणूस' वा इतर कोणाला कमिट केलेले नसेल तर त्याना माझे अंटार्क्टिका प्रवासवर्णनाचे लेख हवेत. माझा अहकार यामुळे सुखावलाय. तोंडावर एक वेगळीच चव रेंगाळते आहे हा अनुभव मला जपून ठेवावयास हवा. मनाची ही स्थिती मला आयुष्यात पुढे कधी मिळणार आहे कुणास ठाऊक.

मी निवात आणि मजेत आहे. टिवल्याबावल्या करायला संपूर्ण मोकळा आहे. उठल्या उठल्या या खुशीत पहिला फोन मी महाराष्ट्र टाइम्सच्या अशोक जैनला लावतो. त्याला एकदा आमच्या सशोधन सस्थेत येऊन आमचे कार्य पहायचंय माझे अटार्क्टिकावर करावयाचे प्रयोग समजावून घ्यावयाचेत फोटोसकट माझी मुलाखत महाराष्ट्र टाइम्सला छापावयाची आहे ! मी फोनवर म्हणतो, 'गुरु, आजवर आयुष्यात मी अनेकांच्या मुलाखती घेतल्या. माझी तू मुलाखत घेणार ही कल्पनाच धमाल आहे. उद्या दुपारी १२ वाजायच्या सुमारास ये. निवातपणे बोलू. चायनीज वगैरेमध्ये जेवावयास जाऊ.' तो म्हणतो, उद्या येणं कठीण आहे. महाराष्ट्राचे मुख्यमत्री येथे येणार आहेत; पण तुझ्याकडून चायनीज जेवण मिळणार ही विश्वास न बसणारी गोष्ट आहे. त्याना वाटेला लावून व्यवस्थित तेथे वेळेवर येतो. त्यानंतर मी डॉ. निशिकात मिरजकरासाठी फोन करतो. त्याना व सौ. डॉ. ललिता मिरजकराना पण येण्यासाठी निरोप ठेवतो. त्याच्याकडे मी अनेक पुरवे जोडलेत. एकदा तरी त्याना बोलवावयास हवेच. नंतर मला आठवण होते श्रीकृष्ण खडपेकरांची.

ते विनया खडपेकराचे काका आहेत. ६५ वर्षांचे खडपेकर तसे स्थापत्यशास्त्रज्ञ आहेत; पण साहित्य, संगीत, कला यात त्याना विलक्षण गती आहे. सध्या नवभारत मासिकात त्याचे भाषाशास्त्रावरील लेख प्रसिद्ध होताहेत. मी खडपेकराचा दोन तीनदा फोन फिरवतो. तो लागत नाही. तुमचा रक्तदाब वाढू नये अशी इच्छा असेल तर दारू, धूम्रपान आणि टेलिफोन्स टाळा हे लक्ष्मणचे व्यंगचित्र मला आठवते. आज मला माझा मूड अजिबात बिघडवायचा नाही. खडपेकर माझ्या घरापासून फक्त एक फर्लांग अतरावर राहतात. ती खरी आमच्याच ऑफिसची इमारत आहे. बाहेरचे भाडेकरू म्हणून खडपेकर तेथे आहेत त्याचा शेजारी म्हणून माझा मित्र डॉक्टर बलकारसिंग राहतो. त्याचे ब्लॉक एकमेकाना लागून आहेत ऑफिसातून बलकारबरोबर त्याना निरोप पाठवावयाचे ठरवून मी ऑफिसात जातो.

माझ्या घराच्याच मागे आमचे संशोधनकेन्द्र आहे. किंवा खरे सांगायचे तर संशोधनकेन्द्राच्याच आवारात दिलेल्या घरात मी राहतोय. दिल्लीत माझे दोन छोटे परिवार आहेत. एक माझे घर. मी,बायको व आमची मुलगी. दुसरा परिवार म्हणजे आमचे ऑफिस. आम्हा मध्यमवर्गीयाना घर आणि ऑफिस सोडून आयुष्यात दुसरे काही नसतेच ! माझ्या हाताखाली सत्तर-ऐंशी लोक काम करतात आणि माझ्या खोलीला लागूनच माझ्या तिनी स्टेनो बसतात. त्यातील दोन सरदारणी आहेत. एक बलजीत दुसरी उत्तम, तिसरी आहे हरियाणातील जाट निर्मल. या तिघीचा माझ्यावर खूप लोभ आहे. आपापसात विश्वास बसणार नाही येवढे हेवेदावे आहेत.

बलजीत वयाने सर्वात मोठी म्हणजे पस्तीस वर्षांची प्रौढ कुमारी आहे. तिची पासष्ट वर्षांची आई अर्धांगाने अंथरुणात पडून आहे तिच्या सैन्यातून सेवानिवृत्त झालेल्या बहात्तर वर्षे वयाच्या वडिलाचे एका डोळ्याचे ऑपरेशन झालय. ते ऑपरेशन फार जोखमीचे आहे. त्याना आणि तिच्या आईला अंथरुणापासून हलवयाचे नाही. बलजीतचा धाकटा भाऊ फ्रान्समध्ये जाऊन स्थायिक झालाय. त्याने फ्रेंच मुलीशीच लग्न केलय. एकटी बलजीत हसतमुखाने घरचा व ऑफिसचा गाडा ओढते आहे.

दुसरी उत्तम. तिचे वर्षापूर्वीच लग्न झालंय. नव्या संसारात ती रमलीये. सध्या तिला सहावा महिना सुरू आहे.

तिसरी निर्मल. निर्मलचा नवरा भारतातर्फे आंतरराष्ट्रीय सामन्यातून कुस्ती खेळलाय. तो माझा जवळचा मित्र आहे निर्मलला दोन छोटी मुले आहेत. निर्मल, निर्भय, हसरी, सडेतोड, फटकळ पण सरळ स्वभावाची मुलगी आहे.

राजधानी दिल्लीच्या दूरदूरच्या तीन वेगवेगळ्या सुरक्षीत सुसंस्कृत विभागातून या तीन जणी दररोज आमच्या ऑफिसात येतात.

—पण पुढील चार दिवसांत बलजीतचे सर्वस्व लुटले जाणारे—

—उत्तमचा गर्भपात होणारे—

—पाहिलेल्या घटनानी अस्वस्थ होऊन भेदरून निर्मलच्या छोट्या मुलाना न थांबणाऱ्या ओकाऱ्या सुरू झाल्याने दवाखान्यात ठेवावे लागणार आहे. माझे व माझ्या भोवतालचे हे छोटे जग एका प्रचंड वादळी राक्षसी झंजावातात,आणि अग्निप्रलयात पार बदलून जाणारे. केवळ चार दिवसात ओळखता येणार नाही एवढे बदलणार आहे. आमचे स्वत.चेच चेहरे बदलणार आहेत. नियतीच्या हातातील पाने केवढी विलक्षण असतात; पण आपल्याला त्याची आधी कधी पुसटशीही कल्पना येत नाही. आता आम्ही सारे जण किती मजेत आहोत.

¤

दिवस कसा मजेत खुशीत पुढे सरकतोय. सकाळचे दहा-साडेदहा वाजलेत. क्षणार्धात सारीकडे एक बातमी पसरते इंदिराजीना गोळ्या झाडल्यात. प्रत्येक जण आपण ही बातमी पहिल्यादा ऐकली आहे असे समजून दुसऱ्याला सांगण्याचा प्रयत्न करतोय. पुढची बातमी काहीच मिळत नाही. वातावरण खूप गोंधळलेले आणि थोडेफार तंग आहे लोक ऑफिसात आणि बाहेरही थव्याने जमून चर्चा करताहेत. किती गोळ्या मारल्या, कोणी मारल्या, कशा व कोठे मारल्या याचेच निरर्थक चर्वण सुरू आहे राजधानी दिल्लीत आपल्याला सविस्तर सत्वर बातमी मिळत नाही हा अनेकाना स्वत.चा अपमान वाटतो बातमी काढण्यासाठी ऑफिसातील अनेक जण अनेक दिशानी पांगतात. पण खरे सांगायचे तर बातमी काही मिळत नाही, सर्वत्र गोंधळच आहे.

दुपारी तीन वाजायच्या सुमारास इंदिराजी गेल्याची आजची पहिली अधिकृत बातमी येते. अजूनही दूरदर्शन, आकाशवाणी यानी ही बातमी दिलेली नाही. पण बाई गेल्या याबाबत आता कोणाच्याच मनात संदेह नाही. माझ्या मनावर थोडा ताण आलाय. काही तरी हिंसक प्रकार घडणार असे मला वाटतय. निर्मल पक्की इंदिराविरोधी होती; पण तिला वाईट वाटलय. बलजीत तर पुरती इंदिरा भक्त आहे. कधीच न रडणारी ती मुलगी माझ्या खोलीत येऊन स्फुंदून रडू लागते. मला थोडे चमत्कारीक वाटते—माणूस दिवाळी अंकातील रामदास भटकळाचा स्नेहलताबाईवरचा लेख वाचूनही अशा वेळी काय करावे हे मला समजत नाही ! मी आपला नुसता वेड्यासारखा तिच्याकडे बघतच बसतो. असे हे रडणे वगैरे म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे असे मला वाटते. तिच्या या रडण्यामुळे माझ्या मनावरचा ताण थोडा कमी झालाय असेही काहीसे वाटत असते.

तेवढ्यात डॉक्टर बलकारसिंग माझ्या खोलीत घुसतो. तो घाबरलाय. त्याची बायको ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स मध्ये मानसशास्त्रविभागात मानसशास्त्रज्ञ म्हणून काम करते. हत्येची बातमी आली त्या वेळी तो लगेच आपल्या गाडीतून बायकोकडे गेला होता. तो म्हणतो काही तरी हिंसक भयंकर घडणारे

**हे सारे अक्राळविक्राळ, बीभत्स, असंबद्ध तुकडे आहेत. माझ्या भोवती सर्वत्र काही तरी अजिबात न समजणारं, भेसूर, ओंगळवाणं घडतंय....**

वातावरण फार झपाट्याने चमत्कारीकपण बदलतय. मी जाट शेतकरी आहे. माझे व्यवहारज्ञान फारसे चुकत नाही हे तुला माहित आहे. बायको, मुलगा, मुलगी याना घेऊन आज तुझ्याकडे रहावयास येऊ का ? तिथल्यापेक्षा कॉलनी सुरक्षित आहे.

मी मनापासून त्याही परिस्थितीत हसलो. पंजाबात माझ्याबरोबर गेल्या महिन्यात वाघासारखा हिंडलेला, सहा फुटाचा तगडा दणकट बलकार भयकार घाबरलाय. मी म्हणतो, 'बलकार व्यवहारज्ञान वगैरे काही नाही. जाट शेतकरी वगैरे काही नाही. तू पण आता मध्यमवर्गीय बनला आहेस. उगाचच काही तरी कारण किंवा निमित्त शोधून घाबरतोस.'

मला खरोखरच नवल वाटत होते. दंगल, जाळपोळ होईल ती सरदाराच्याविरुद्ध होईल, हे मी नक्की ओळखत होतो. माझी बाळपणातील पहिली आठवण गांधीवधाच्या वेळी सातारला माझ्या घरासमोर झालेल्या जाळपोळीचीच आहे; पण दिल्लीत दंगल झाली तरी त्याची धग मल्कागजमधील भर चौकात जवाहरनगरसारख्या गजबजलेल्या इमारतीत चौथ्या मजल्यावर राहणाऱ्या बलकारसिंगला पोचेल असे मला मुळीच वाटत नव्हते. त्या इमारतीत चाळीस-पन्नास कुटुंबे आहेत. त्यात वीस-पचवीस कुटुंबे आमच्याच ऑफिसातील आहेत. त्यातून उरलेली कुटुंबे पण सारी चांगली आहेत. या चाळीस-पन्नास कुटुंबात दोनच सरदारकुटुंबे आहेत एक बलकारसिंगचे. दुसरे एका सधन शीख व्यापाऱ्याचे. हा साराच विभाग खूप सुरक्षित आहे. मल्कागजचा प्रमुख बसस्टॉप त्याच्या घराला लागून आहे जवळ टॅक्सीस्टॅण्ड आहे. चार-पाच मिनिटाच्या अंतरावर दोन मोठी पोस्ट-ऑफिसे आहेत. पोलीसचौकी आहे. या घराच्या एका बाजूला घंटाघर सब्जीमंडीसारखा गजबजलेला जुना बाजार आहे. दुसऱ्या बाजूला दिल्लीतसुद्धा उठून दिसावी अशी कमलानगरची नवी नटलेली बाजारपेठ आहे. अनेक प्रकारच्या नव्या आकर्षक वस्तूंनी ही बाजारपेठ नुसती भरलीय. आत छान हॉटेल्स आहेत. कमलानगरमधून हिंडताना कसे हवेत तरंगल्यासारखे वाटते! त्याला लागूनच चंद्रावळची तशी झोपडपट्टी आहे; पण हे लोक येथे अनेक पिढ्या राहताहेत. तेथेच गाईंचे, म्हशीचे गोठे आहेत. बाकीचे लोक तसे चंद्रावळला जायला घाबरतात; पण तेथेही माझे आणि बलकारसिंगचे मित्र आहेत. हे लोक म्हटले तर गुंड आहेत, म्हटले तर फार फार चांगले आहेत!

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे बलकारसिंगच्या घरापासून फक्त दोन किलोमीटर्स अंतरावर राज्यपालभवन आहे. दिल्लीचे प्रशासन बघणारा राज्यपाल तेथे राहतो. थोडे पुढे गेले की, ल्युडलो कॅसलची दोन भव्य मॉडेल स्कूल लागतात. त्याना वळसा घातला की, आपण रिंगरोडवर येतो. एकदा रिंगरोडवर आले की, लाल किल्ला, राजघाट, सिव्हिल लाइन्स हा भाग दहा-पंधरा मिनिटात गाठता येतो. मी बलाकारसिंगला म्हणतो, 'काही झाले तर पंधरा मिनिटात आपण राजघाटावर जाऊन गांधीचे दर्शन घेऊन आत्मबळ मिळवू शकतो वा लाल किल्ल्यात वा सिव्हिल लाइन्सला जाऊन सैन्याला बोलावू शकतो! आपण काही रस्त्यावरची फालतू माणसे नाही. या राजधानी दिल्लीत अनेक सरकारी अंमलदार, पोलीसअधिकारी, सैन्यातले अधिकारी सारे आपले जवळचे मित्र आहेत!'

बलकारसिंग म्हणतो, तू म्हणतोस ते कळते पण पटत नाही आणि बलकारसिंगचे म्हणणे एका अर्थाने खरे आहे. त्याच्या घरापेक्षा आमची कॉलनी अधिक बंदिस्त म्हणून अधिक सुरक्षित आहे मल्कागज पेट्रोलपपाच्यासमोर विद्यापीठ रस्ता सुरू होतो. त्या रस्त्यावरील पहिली इमारत आमच्या संशोधनकेंद्राची आहे. शेवटची इमारत दिल्ली विद्यापिठाची आहे. भोवताली महाविद्यालये, त्याचे निवास, वसतिगृहे पसरलीत. आमच्या संशोधनकेंद्राला आणि कॉलनीला चारी बाजूनी भक्कम दगडी कुंपण आहे. आत फक्त तीस-चाळीसच कुटुंबे राहतात. चार-पाच पहारेकरी नेहमी आत असतात. बाहेरच्या दारावर तर बंदूक घेऊन एक पहारेकरी उभा असतो! मी त्याला चिडवत म्हणतो, तुझे म्हणणे मला पटत नाही; पण या निमित्ताने तरी तू सहकुटुंब माझ्या घरी येणार याचा मला खरंच आनंद होतोय.'

पडत्या फळाची आज्ञा घेतल्यासारखा बलकारसिंग यांत्रिकपणे उठला आणि केवळ पाच मिनिटात बायका–मुलाना घेऊन माझ्या घरी पोचलासुद्धा!

## तीन : लुटालूट, जाळपोळ, भीती

रात्रीचे आठ वाजलेत.

दूर बडा हिंदूरावजवळ आकाशात लाल लाल उजेड पसरलाय. आमच्या घराच्या छतावरून तो लख्ख प्रकाश अगदी स्पष्ट दिसतोय. तो प्रकाश पहावयास घराला छत नसलेले मित्र आमच्या छतावर जमलेत. गेल्या चार-पाच तासात बाहेर आणखी काही झाले आहे असे आम्हा कोणालाच वाटत नाही. जवळपास हिंडून आलेले मित्र पण तसेच सांगताहेत. आमच्या विभागात वातावरण तंग आहे, लोक अस्वस्थ आहेत एवढेच. बाकी आणखी काही नाही. तो प्रकाश आगीचा आहे की, त्या विभागात अलीकडे लावलेल्या निऑन वगैरे दिव्याचा आहे याचाच आम्ही आपापसात विचार करतोय! आजकाल दूरदर्शन सोडून वर गच्चीवर कोण जातो कशाला आणि आकाशात बघतो तरी कशाला? पण हळूहळू तो प्रकाश आणखी मोठा होतो. मागे पुढे हलू लागतो. तो आगीचाच आहे हे आमच्या लक्षात येते; पण दिसणाऱ्या आसमंतात ही फक्त एवढी एकच आग पेटलेली आहे. छतावरून खाली परत येतो तर मला माझ्या वरिष्ठांचा फोन आलाय. ते दूर ग्रीनपार्कला राहतात. त्यांच्या घराजवळ थोडी दंगल सुरू आहे. त्यांच्या सरदार ड्रायव्हरलाच बेदम मारलाय. तो त्याना बंगल्यावर पोचवून सायकलवरून त्याच्या घरी चालला होता. तो मेलाय असे समजून त्याला रस्त्यावर सोडून जमाव पुढे गेला. त्याला जाळावयास पेट्रोल न मिळाल्याने तो वाचलाय. रक्तबंबाळस्थितीत तो त्याच्या घरी पोचलाय. भोवताली काही तरी भयंकर घडलंय. ते मला उद्या ऑफिस बंद ठेवण्याची सूचना देतात. आज जाण्यापूर्वी फक्त अत्ययात्रेच्या दिवशी ऑफिस बंद ठेवण्याचे आम्ही ठरवले होते कारण तोच दिवस सरकारी शोकदिवस असतो. काही वेळाने आणखी एका जबाबदार मित्राचा फोन येतो. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्ससमोर जाणारी प्रत्येक गाडी जमाव रस्त्यावर थांबवतोय. आत सरदार असेल तर त्याला खेचून बाहेर

काढतोय. एकही सरदार यातून सुटत नाही. त्याला चेचून–ठेचून मग पेटवलं जातंय ! तो समोरच राहतो म्हणून हे सारे बघतोय. माझा त्या मित्रावर विश्वास आहे; पण तो जे सांगतोय त्याच्यावर माझा त्या क्षणी अजिबात विश्वास बसत नाही.

सकाळी आम्ही ऑफिस बंद असल्याची सूचना लावावयास जातो. त्याची जरुरी नाहीच. कारण कॉलनीत राहणारे लोक सोडून बाकी कोणीच ऑफिसात आलेले नाही. ऑफिस बंद केल्यावर तीन–चार जण मल्कागंजपर्यंत फेरी मारून यावयाचे ठरवतो. आमचा विभाग तसा शांत आहे; पण काल रात्री समोरच्या मल्कागंज पेट्रोलपंपाच्या साऱ्या काचा जमावाने दगडफेक करून फोडलेल्या आहेत. मल्कागंज टॅक्सीस्टॅंडवरील सरदाराच्या साऱ्या टॅक्सीची कमी–जास्त मोडतोड झालीये. त्याच्या नसलेल्या गाड्या मात्र सुरक्षित आहेत. टॅक्सीस्टॅंड निर्मनुष्य आहे. मल्कागंज–चौकातील सरदाराची एक लॉन्ड्री फोडून सरळसरळ लुटलेली आहे. मी म्हणतो, 'च्यायला, सरदाराला त्रास देण्याचा हा चांगला मार्ग आहे ! दुकान त्याचे, सारे कपडे आमचे ! त्रास आम्हालाच झालाय !' अजूनही मी हे सारे सहजपणे घेतोय. एवढी दंगल होणार हे तर मलाही त्या क्षणी माहीत होते. फक्त चाळीस–पन्नास पोलीस माझ्याकडे दिले तरी आमच्या विभागातील ही असली दंगल मी सहज मोडून काढीन, इतकेच नव्हे तर लॉन्ड्रीतून लुटून नेलेला माल परत मिळवीन असे मला वाटले.

– पण मी अजून कच्चा आहे. मला अजून खूप शिकायचय हे मला त्या क्षणी माहीत नाही. हे सारे 'एकच प्याला' मधील सुधाकरासारखा आहे.

– अराजक, अंदाधुंदी याचा पहिला घोट घेतला की, जमावाला त्याची सवय होते, चटक लागते किंवा व्यसन जडते ! महत्त्वाचे म्हणजे दारूहूनही झपाट्याने जमावाला अराजक व अंदाधुंदी चढते! त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे संसर्गजन्य रोगासारखे किंवा प्लेगसारखे हे सारे झपाट्याने भोवताली पसरते.

घरी आल्यावर आम्ही सारे गच्चीवर गेलो आणि काय होतेय याचा पहिला अंदाज आला. कोणत्याही बाजूला पहा. सारी दिल्ली पेटलीये. चारी बाजूनी धूर आणि आग आकाशात वर चढते आहे. ज्वालामुखीच्या विवरातून धूळ आणि धूर बाहेर यावा तसा अनेक नव्या ठिकाणाहून धूर वर उठतोय. सारी भोवतालची दिल्ली पेटलीये. शहर कसे जाळतात ते मी आयुष्यात प्रथम पाहतोय या आगी शक्तिनगर, सिव्हिल लाइन्स, कमलानगर, घंटाघर सब्जीमंडी या विभागात कोणत्या दुकानांना वा गुरुद्वारांना लागल्यात याची आम्ही चर्चा करतोय. बलकारसिंग आज सकाळपासून बाहेर पडलेलाच नाही. त्याला हे सारे पहाण्यासाठी एक जण वर बोलावतो. समोर काही अंतरावर हंसराज कॉलेजचे वसतिगृह आहे. त्याच्याही गच्चीवर खूप मुले आहेत. ती मुले बलकारसिंगला पाहून हिंस्त्र पशूसारखी पण समूहाने काही ओरडतात. सापाच्या जिभा फिराव्यात तसे त्याचे हात त्याच्या दिशेने हवेत उठवतात. बलकार भयंकर घाबरतो. आम्ही सारेच जण घाबरतो. खाली घरी जाऊन बसतो. बाहेरून हिंडून आलेले लोक सांगतात काल रात्री बडा हिंदूरावसमोरील तीन मजली सुंदर गुरुद्वारा जाळून भस्म केलाय. त्याच्या समोरची सरदाराची टायर्स दुरुस्त करणारी आठ–दहा दुकाने अजूनही जळताहेत. आझादनगरचा टॅक्सीस्टॅंड जळून भस्म झालाय. त्या विभागातील अनेक घरे लुटलीत आणि जाळलीत. शक्तीनगरला तेच सुरू आहे. वास्तुकलेचे सुंदर रूप दाखवणारे तेथील गुरुद्वार पेटून उठलेत; पण बाहेर भटकायला काही हरकत नाही. दाढी-फेटा नसलेला कोणीही बाहेर सरळ हिंडू शकतोय !

आम्हाला थोडी हिंमत येते. बारा वाजायच्या सुमाराला आम्ही काही जण मल्कागंज, घंटाघर सब्जीमंडीपर्यंत हिंडावयास बाहेर पडतो. आता या विभागातील अनेक दुकाने उघडून लुटावयास सुरुवात झालेली आहे. ही दुकाने तयार कपड्याची आहेत, क्रॉकरीची आहेत, चैनीच्या छानछोकीच्या वस्तूंची आहेत. निवांतपणे बाजारहाट करावा अशी दुकाने लुटली जाताहेत ! तीन–चार पोलीस चकरा मारताहेत. झपाट्याने लोक येताहेत, सामान काखोटीला मारून घेऊन जाताहेत, माझा माझ्या डोळ्यावर अजिबात विश्वास बसू नये असा हा देखावा आहे. अजून सरदाराची काही दुकाने लुटायचीत. त्यात सेठी बेकरी आहे. दूरदर्शन विकणारी दुकाने आहेत, सोन्याचांदीची दुकाने आहेत. मी म्हणतो, लोकांना अजून भूक लागायची आहे. दोन वाजायच्या सुमारास सेठी बेकरी फुटेल व रात्री वा सकाळी सोन्याचांदीचे दुकान फुटेल !

मी थोडा चुकलोय. सहा वाजता परत आलो तर सेठी बेकरी बरोबर दोन वाजता लुटलेली आहे. दूरदर्शनचे दुकान पाच वाजता फुटलय. जमाव मोठा झालाय. खूप खूप मोठा ! पोलिसांसमोर दूरदर्शन आणि व्हिडिओ तीनशे ते पाचशे रुपयापर्यंत विकले जाताहेत; पण सोन्याचे जवाहिराचे दुकान त्याच्या थोडे आधी फुटलय ! हा माल न विकता लोक घेऊन गेलेत. आधी लुटलेल्या दुकानातील लाकडी सामान बाहेर काढून ते पेटवण्यात आलय. लाकडी सामान त्यापूर्वीच पेटवलेल्या, त्याआधीच्या मोकळ्या दुकानांना आगी लागताहेत. रस्त्यावर शिळोप्याच्या गप्पा मारत हिंडताहेत असे वाटावे असे पोलीस हिंडताहेत. मल्कागंज, घंटाघर, कमलानगर या विभागातील सरदाराची सारी दुकाने–झाडून सारी दुकाने–लुटली जाताहेत. नियमाला अपवाद असावा म्हणून फक्त मल्कागंज कोपऱ्यातील 'जॉली ऑटो शॉप' सोडलय. त्यात खूप माल आहे; पण त्या मालाचा कोणालाच काही उपयोग नसावा तो लगेच विकता येण्यासारखा पण नाही. या विभागातून हिंडताना रस्त्यावर सर्वत्र होळी आहे आणि भोवताली भडकलेल्या दुकानांच्या आगी. पंजाब फ्रूट वेअर्सचे दुकान लुटलय. त्याच्या समोरचे 'पंजाबदिहट्टी' हे सुकी फळे आणि मेवा विकणारे प्रचंड दुकान संपूर्णपणे लुटून त्याला आग लावलीये. ती तीन मजली प्रचंड इमारत धडाडून पेटून उठलीये. वरच्या मजल्यावर लोक राहतात. हिंदू कुटुंबे पण राहतात. त्यांचे काय झालंय माहीत नाही. काही जण सांगतात– पाठीमागून चार–पाच जळलेली प्रेते काढलीत. सर्वांत अधिक विध्वंस सुंदर कमलानगरचा झालाय. 'ब्राइट ड्रेसेस' हे येथील तयार कपड्याचे फार मोठे दुकान. ते सारे लुटलय. त्याचा मालक बलकारसिंगचा मित्र आहे म्हणून पाठीमागच्या त्याच्या प्रचंड घरात त्याला भेटायला गेलो. त्याची बायको धाय मोकलून रडते आहे. दुकान लुटताना पाहून तिचा तगडा नवरा हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावला. सारे जण भेदरलेत. त्याचे प्रेत कसे बाहेर काढावयाचे याचीच सर्वांना चिंता पडलीये.

घरी आलो तर आमचा सिक्युरिटी–ऑफिसर कपूर माझी वाट पहात होता. तो तसा आमचा सिक्युरिटी ऑफिसर नाही. आम्ही आमच्या सिक्युरिटीचे कत्राट एका कपनीला दिलय. ती कपनी अनेक सस्थाची सिक्युरिटी साभाळते कपूर त्या कपनीचा अधिकारी आहे तो त्याच्या साऱ्या केंद्राना दिवसभर भेटी देऊन आलाय. तो म्हणतो, तुमचा विभाग फार शांत आणि सुरक्षित आहे ! बाहेर अग्निप्रलय आहे. मी स्वत जी. टी. कर्नलरोडवर जळणारी दहा प्रेते मोजलीत. कोकाकोलाची फॅक्टरी जळून भस्म झालीये. हिंसक थवे सर्वत्र हिंडताहेत. सरदार बदला घेणार असे पण म्हणताहेत. आमच्या सुरक्षिततेवर विश्वास ठेवू नका कॉलनीसाठी तुमची पण गस्त सुरू करा ! आमच्या या कॉलनीत फक्त दोन सरदारकुटुंबे आहेत. एक मिसेस गुरुचरणकौरचे, दुसरे डॉ. सुरेंद्रसिंगचे सुरेंद्रसिंग मला सागतो, 'त्याच्या मेहुण्याचा फोन आला होता. तो सदरबाजारला राहतो. त्याचे सारे दुकान लुटलय; पण तो वाचलाय. कारण त्याने दाढी–मिशी केली ! म्हणजे तो मोना बनलाय ! तो पुढे मला म्हणतो, 'साऱ्या कॉलनीवर माझ्यामुळे काही सकट येणार असेल तर मी पण मोना बनायला तयार आहे.' मी म्हणतो तू उगाच घाबरला आहेस. येथे काही होणार नाही. अजिबात काळजी करू नको !

पण खरे सागायचे तर मी घाबरलोय. मला काळजीही वाटते आहे, त्यापेक्षा मी अधिक गोंधळलोय. पोलिसांचे विसरा ही राजधानी आहे. पाच मिनिटात सैन्य इकडून तिकडे हवे तसे हलवता आले पाहिजे. मला आणखी एका गोष्टीचे नवल वाटतय. दिल्लीतील सारी यंत्रणा पार कोसळली आहे आणि नेमक्या या वेळी नेहमी काम न करणारे टेलिफोन्स विश्वास बसू नये इतक्या चागल्या प्रकारे काम करताहेत. सकाळपासून दूरचे–जवळचे सारे टेलिफोन्स मिळताहेत. सकाळपासून मी स्वत च पुण्याला तीन मोठे टेलिफोन्स केलेत एक माणूसकचेरीत. दुसरे दोन देवदत्त दाभोळकराना.

मात्र याचाही विचार करायला त्या क्षणी वेळ नाही भेटणारा प्रत्येक माणूस, येणारा प्रत्येक फोन त्याच गोष्टी पुन्हा पुन्हा ओकतोय. साऱ्या दिल्लीत सर्वत्र यत्रणा कोलमडलीये. प्रचंड प्रमाणात लूटमार, जाळपोळ, कत्तल सुरू आहे आमचा विभाग त्यामानाने सुरक्षित आहे. माझा मावस पुतण्या एक दिवस आधी दिल्लीला आलाय. तो हौसखासला त्याच्या मित्राकडे उतरलाय. तो मुबईत विल्सन कॉलेजात प्राध्यापक आहे. त्याचे वडील मुबईत डेप्युटी पोलीसकमिशनर होते. मुबईतील अनेक दंगली त्याने जवळून पाहिल्यात. तो फोनवर म्हणतो, हे सारे विश्वास न बसणारे आहे. आमच्यासमोरचे सरदाराचे बगले फोडून सोफा, कपडे, दूरदर्शन सारे लोक डोक्यावर ठेवून घेऊन जाताहेत !

–घडतंय, दिसतंय, जे ऐकू येतय ते खरेच काही समजत नाही. सारेच विश्वास न बसण्यासारखे आहे. रात्री आणखी काहीच करण्यासारखे नसल्याने हे सारे का होतय ? कोण करतय ? कस करतय ? याचीच आम्ही चर्चा करीत बसतो कोणी म्हणतो झोपडपट्टीतील लोक हे सारे करताहेत. महारोग वाढावा तशी देशात सर्वत्र झोपडपट्टी वाढली आहे. त्याच्यासमोर उच इमारतीतील स्वर्गसुख भोगणारे लोक आहेत. या महारोगी झोपडपट्टीत बोथट, सवेदनाक्षम, सूडाने पेटलेली मने असणारच. दुसरा जण म्हणतो, हे झोपडपट्टीतील लोक नाहीत. दिल्लीला लागून असलेल्या सीमेवरील प्रातातील खेड्यापाड्यातील लोक यात मोठ्या प्रमाणावर आहेत. प्रचड दारिद्र्य असलेली भुकेकगाल खेडी या समृद्ध, ऐषारामी ऐतखाऊ दिल्लीला वेढून आहेत ! खेडी विरुद्ध शहरे या उद्याच्या अटळ लढाईमधील ही पहिली फेरी आहे. मी म्हणतो, तुम्ही म्हणता ते मला थोडेफार पटते; पण मला वाटते आपण सारेचजण गुन्हेगार म्हणून यात सामील आहोत. थोडेफार नट म्हणून, थोडेफार प्रेक्षक म्हणून, थोडेफार टीकाकार म्हणून. – सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपण सर्वजण या क्षणी आहोत अफवा निर्माण करणारे कारखानदार ! सारे पाहून–ऐकून अजूनही माझ्या मध्यमवर्गीय मनाला यातील बऱ्याचशा गोष्टी अफवाच वाटताहेत !

## चार : 'हम बरबाद हो जाएंगे'

दुसरा दिवस उगवलाय.

अफवा आता अफवा उरल्या नाहीत. त्यातील धग आता सर्वांनाच जाणवू लागलीये. सकाळी पहिलाच फोन येतो प्रकाशसिंगचा. आमच्या ऑफिसात एकूण दहा–बारा सरदार आहेत. प्रकाशसिंग त्यापैकी एक. प्रकाशसिंग हा एक फार चागला सशोधक आहे. त्याने सध्या केलेल्या काही संशोधनामुळे 'यु. नी. डो.' पुढील महिन्यात तीन महिन्यासाठी त्याला जर्मनीत पाठवणार आहे. प्रकाशसिंग फार साधा आणि सरळ आहे. माझ्या अनेक सरदारमित्रापैकी हा फक्त एकच असा आहे की, खलिस्तान, भिंड्रनवाले, आतकवादी याचा हा नेहमी जोरदारपणे निषेध करत असतो. प्रकाशसिंग दूर जहागीरपुरीला राहतो. त्यातून त्याचे घर दुसऱ्या मजल्यावर आहे. प्रकाशसिंग फोनवर म्हणतो, 'सर, मी माझे कुटुबीय अगदी सुखरूप आहोत. काही काळजी करू नका' मला चेष्टा करावयाची लहर येते. मी म्हणतो, 'बेटा, तुला काय होणार ? तू पुरता सरदारविरोधी. खरे पाहता तूच ही सरदारविरोधी जाळपोळ करत असशील असे मला वाटते !' पण माझा हा विनोद निम्म्यावरच राहतो. प्रकाशसिंग सागतोय, 'सर, माझे सारे सारे लुटले गेलय. माझी स्कुटर, दूरदर्शन सारे माझ्या समोर जाळलय. बाकी सारे काही लुटून नेलय आम्ही सारेजण पळून गेलो म्हणून वाचलो जिन्यावरून गच्चीवर जाऊन एका गच्चीवरून दुसऱ्या गच्चीवर उड्या मारत आम्ही नाहीसे झालो. माझी दहा वर्षांची मुलगी मात्र घरात राहिली होती; पण ती बाथरूममधील माळ्यावर जाऊन लपली म्हणून वाचली, प्रकाशसिंग काय सागतोय ! काय बोलतोय ते मला कळत नव्हते. तो नुसता अनेक वेळ फोनवर बोलत होता. हे सारे दोन तासापूर्वी घडले होते आणि पहिला फोन त्याने मला केला होता. तो काय सागतोय ते त्यालाही समजत नव्हते आणि मला पण. थोडा थोडा बोध होत होता. हे सारे घडले त्या वेळी तो, त्याची बायको, तीन मुले आणि त्याचा भाऊ घरात होते. त्याचा भाऊ कॅनडात स्थायिक झालेला आहे कॅनडाचा नागरिक आहे. त्याच्या घरात आता गॅससिलेंडर, रेशनकार्ड, पखा, चपला काही म्हणजे काही उरलेले नव्हते. अंगावरील कपडे सोडून त्याच्याकडे

काहीसुद्धा नव्हते. त्याला काय सागावे मला कळेना. मी म्हटले इकडे कॉलनीत ये तो म्हणाला, 'सर, तसे नको. येणे फार धोक्याचे आहे मी आलो तर तुम्हाला पण सर्वांना कदाचित त्रास होईल. माझ्या भावाची काही काळजी करू नका.' – प्रकाशसिंग म्हणत होता ते सारे खरे होते. त्याच्या भावाचा काही प्रश्न नव्हता. तो काही भारताचा नागरिक नव्हता ! तो कॅनडाचा नागरिक होता ! कॅनडाची भारतातील वकिलात केवळ दोन तासात त्याला सुखरूप ठिकाणी घेऊन जाऊन स्वत:च्या खर्चाने कॅनडाला घेऊन जावयास तयार होती. त्याचा देश त्याच्यामागे उभा होता. प्रश्न होता या देशावर मनापासून प्रेम करणाऱ्या प्रकाशसिंगचा !

मी विमनस्क अवस्थेत फोन खाली ठेवतो. माझ्यासमोर पसरलेली सारी वर्तमानपत्रे अशीच सुन्न करणारी माहिती देताहेत. 'स्टेट्स-मन' ने शेवटच्या पानावर एक लुटालुटीचे चित्र दिलंय पचकुईया-रोड या नव्या दिल्ली स्टेशनजवळील रस्त्यावर सुदर फर्निचर विकणारी खूप दुकाने आहेत. हे फर्निचर लुटून नेले जातय आणि ही लुटालूट पोलीस करताहेत. आपल्या पोलिसाच्या मोठ्या ट्रकमध्ये भरून पोलीस फर्निचर पळवून नेताहेत असे हे छायाचित्र आहे. टाइम्स, हिंदुस्तान टाइम्स अशा जबाबदार वृत्तपत्रानी त्रिलोकपुरीत झालेल्या महाभयंकर कत्तलीची छोटी वर्णने दिलीत. केरकचरा भरावा तशी दोन ट्रक्स भरून प्रेते–कुजलेली, तुटलेली, सडलेली, नेतीत म्हणून लिहिलय. जमनापार हे अस घडतय आणि दूरदर्शन व आकाशवाणी जमनापार 'चुटपुट घटनाएँ' सुरू आहेत म्हणून सागताहेत ! आम्ही काही मित्र जमनापार फेरी मारून येण्याचे ठरवतो. मी मध्यातूनच परत फिरतो. माझे पाहण्याचे धैर्य सपलय माणूस आणि पत्रकार म्हणून मी आयुष्यात पहिल्यादा पराभूत झालोय. वाटेत माझ्यासमोर दोन माणसे जिवत जाळली गेलीत. एक दूरदर्शनचे दुकान फुटलंय क्रुद्ध, हिंस्र, प्रचड जमाव दूरदर्शन तेथून ओरबाडून नेतोय. समोरच्या घरातून बारा–तेरा वर्षांची एक मुलगी सगळ्याची नजर चुकवून आरडत-ओरडत तेथे पळत आलीये. ते तिच्या वडलाचे दुकान आहे. 'हम बरबाद हो जाएगे, पपा मर जाएंगे' असे बडबडत ती त्या दुकानाचे रक्षण करावयास मधे येते बीभत्सपणे, हिंस्रपणे हसत त्यातीलच एक–दोन दूरदर्शन तिच्या डोक्यावर आपटून चेचून जमाव तिला बेशुद्ध करतो आणि त्या दूरदर्शनसकट तिला जाळून देतो.– या देशात आलेल्या दूरदर्शन 'व्ही. डी. ओ.' सस्कृतीने आपला पहिला बळी माझ्या डोळ्यासमोर नोंदवलाय, मी भेदरून गोठून कोपऱ्यात उभा आहे हिजडेसुद्धा इतके अगतीकपणे आणि असमर्थपणे उभे रहात नसतील !

एका तिरमिरीत मी आणि माझे मित्र घरी परततो. मी आता अजिबात बाहेर न पडण्याचे ठरवलय. मी घाबरतो म्हणून नव्हे. खरे पाहता सरदार सोडून इतर कोणाला रस्त्यावर घाबरण्यासारखे काही नाहीच; पण हे सारे सहन होण्याच्या पलीकडचे आहे. मी काहीही घरी बोलत नाही. चिडिचूप पाघरूण अगावर घेऊन अंथरुणात पसरतो. मला अजिबात झोप येत नाही. नक्की काय झालय हे मला अजिबात समजत नसते. रात्री १२ वाजण्याच्या सुमारास फोन घणघणतो. आमच्या ऑफिसचा डॉक्टर जैन चादणी चौकात राहतोय. दिल्लीतील पाण्यात 'पोटॅशियम सायनाइड' सारखे जालीम विष मोठ्या प्रमाणावर मिसळलय म्हणून त्याने ऐकलय. चांदणीचौक विभागात सर्वत्र तेच बोलताहेत. त्याने त्याला ही बातमी समजल्यावर दूरदूरच्या तीन चार मित्राना फोन केला. प्रत्येकाने आपण ही बातमी आधीच ऐकल्याचे त्याला सागितले आहे. मला व कॉलनीतील मित्राना ही बातमी समजली आहे का हे तो विचारत होता. मी ही बातमी पहिल्यादाच ऐकत होतो. कॉलनीत कोणाला माहीत आहे का नाही मला माहीत नव्हते. कारण मी नतर घरी आल्यावर कोणालाच भेटलो नव्हतो, पण कसली तरी अनाकलनीय उदासीनता माझ्या मनाला ओढून उरली होती कोणाला काही विचारावे, कोणाला काही सागावे असे मला काही वाटत नव्हते. मी फोन खाली ठेवला आणि अथरुणात घुसलो रात्री दोन वाजण्याच्या सुमारास मला अचानक घाबरून जाग आली. दरदरून घाम सुटला होता. आपण फार मोठी चूक करतो आहो हे माझ्या अचानक लक्षात आले होते मी घरातील सर्वांना उठवतो. घरातील उरलेसुरलेले सारे पाणी आम्ही फेकून देतो. रात्री उठून झोपेत कोणी पाणी प्यावयास जाऊ नये म्हणून नळाना फडकी बाधून त्याना बंद करतो, पण त्या वेळीही कॉलनीत आणखी कोणाला घरी जाऊन वा फोनवरून हा निरोप सागावा असे आम्हाला कोणालाच वाटत नाही.

सकाळी आम्हा सर्वांनाच उशीरा जाग आली आहे. आता काय करायचे हा प्रश्न अथरुणातच मनात आहे आता चहा मिळणार नाही. तोड धुवावयाचे नाही पाणी प्यावयाचे नाही. प्रयोगशाळेत जाऊन बाष्पीभवन करून पिण्याएवढे पाणी गोळा केले पाहिजे. एवढ्यात दूरदर्शनवर पाणी विषारी नसल्याची बातमी येते. एक दोन वृत्तपत्रात पण ते छापून आलय. एका क्षणात मनावरचे दडपण गेलय फार छान हलके हलके वाटते. कालचा प्रसग तर मी विसरूनच गेलोय. फार मोठा ताण गेलाय अगदी प्रसन्न आनदी वाटतय. – मला नवल फक्त एकाच गोष्टीचे वाटत राहते काल रात्री बारा एक वाजावयाच्या सुमारास आम्हा सर्वांनाच कॉलनीत ही बातमी समजली आहे आणि आम्ही कोणीच दुसऱ्या कोणाला ही बातमी सागावयाचा त्या वेळी प्रयत्न केलेला नाही !

## पाच : जबरदस्त दडपणाखाली

आज रविवार तारीख ४ नोव्हेंबर.

आज घराबाहेर पडायला हवेच. बलकारसिंग आणि त्याचे कुटुब फक्त अगावरचे कपडे घालून माझ्या घरी आले होते त्यांना त्याच्या घरून आणखी काही किमान कपडे हवे आहेत. मी पण आता थोडा निवळलोय. मनावरचा ताण उतरलाय. आता बाहेर पडावयास पाय पुन्हा थोडे तयार आहेत.

काल इदिराजीची अंत्ययात्रा होती. मी ती निवातपणे दूरदर्शन-समोर बसूनच पाहिली अत्ययात्रेला अजिबात गर्दी दिसत नव्हती. माझ्यासारखे अनेक हवशे, गवशे, नवशे घरातच बसलेले दिसतात; पण तरीही अंत्ययात्रेतील ती मामुली गर्दी पाहून आम्हाला आश्चर्यच वाटते. एक जण म्हणतो, "आपल्या अत्ययात्रेला एवढी कमी गर्दी आहे हे समजले तर बाई रागाने एकदम उठून बसतील !" मोव-

तालच्या सर्वांची पंचाईत करतील !

काल आम्ही केलेले हे असले अरबट चरबट विनोद आठवीत मी बलकारसिंगच्या घरी पोचतो. त्याच्या घरासमोर दोन गाड्या जळून त्यांचे सांगाडे टाकलेत. त्या गाड्या त्याच्या इमारतीत राहणाऱ्या सरदार व्यापाऱ्याच्या आहेत. काल तिकडे इंदिरा गांधींच्या पार्थिव शरीराला अग्नी देत होते आणि हे लोक इकडे या गाड्यांना अग्नी देत होते. घरी बसल्यामुळे आम्हाला काहीच समजले नव्हते. तो सरदार दुकानदार मात्र वाचलाय. काल प्रचंड बंदोबस्तात त्याला शरणार्थी शिबिरात घेऊन गेलेत. तेथे राहणारा दुसरा एक मित्र अनाहूत बातमी देतो. हे संरक्षण देण्यासाठीसुद्धा पोलिसांनी त्याच्याकडून वीस हजार रुपये घेतलेत ! माझ्या मनावर पुन्हा एकदम अचानक दडपण येते. माझे कुणाकडेच लक्ष नाही. कशातच मन नाही. मी बलकारसिंगच्या घराचे कुलूप काढतो. सौ. खडपेकर लगेच येतात व म्हणतात, ‘कालपासून वाटेल ते गुंड येथे येऊन हिम्मत करून ‘ये सरदार कहाँ है’ म्हणून मला पुन्हा पुन्हा विचारताहेत.’ खडपेकर म्हणतात. काल रात्री छतावर जाऊन त्याच्या घरात डोकावून तो तेथे कोठे लपून बसलाय का हे गुंड पाहून गेलेत. मी त्या दोघांशीही काही बोलत नाही मुकाट्याने मिळतील ते कपडे चपला वगैरे हातातील दोन पिशव्यात भरतो आणि झपाझप पावले उचलीत घराकडे परत निघतो. माझी दाढी थोडी वाढलीय. पायात चपला, अंगात टीशर्ट. मी थोडा चालतो तोच विरुद्ध दिशेने येणारे दोन तरुण मला थांबवतात. त्यांच्याही हातात पिशव्या आहेत पण त्या मोकळ्या आहेत. मित्रत्वाच्या भावनेने ते मला विचारतात, ‘अजून कोणत्या दुकानात माल बाकी आहे ?’ काय होतंय हे मला खरेच समजत नाही. झोपेत अंगावरून सरपटत झुरळ, पाल, साप सरसरत चालत जावे आणि आपल्याला शहारून जाग यावी असे काही वाटते, मी कसाबसा धडपडत घरी पोचतो.

घरी पोचतो तर एक वेगळेच झमेले माझ्या समोर उभे आहे डॉ. बलकारसिंग भयंकर घाबरलाय. जाम घाबरलाय. तो चुकून एक मिनिट गच्चीत जाऊन उभा राहिला होता. आणि त्या वेळी आमच्या कॉलनीच्या आत माझ्या घरासमोर उभे राहून मोटारसायकलवरून आलेले तीन तरुण त्याच्याकडे रोखून पाहताहेत हे त्याने पाहिले होते. तो काय म्हणतोय ते मला समजत नाही. ते तीन तरुण अजून तेथेच उभे होते. मी आमचा ॲडमिनिस्ट्रेटिव ऑफिसर, सिक्युरिटी ऑफिसर असे तिघेजण आम्ही त्या तिघांच्याकडे जातो. ते तिघे येथे असे का उभे आहेत म्हणून विचारतो. त्या तिघांनी आमच्या प्रश्नाला अजिबात उत्तर दिले नाही. अगदी उर्मट आवाजात त्यातील एकाने विचारले, ‘तुमच्या घरात तो सरदार राहतो तो काय तुमचा नातेवाईक लागतो ? आणि त्याची ती गाडी तुमच्या घरासमोर का उभी आहे ?’ आम्ही तिघेही तसे मुरलेले प्रशासक आहोत. मी तर नुसत्या नजरेने समोरच्या माणसाला वाचतो आणि वाकवतो असा माझा लौकीक आहे ! खरे पाहता साहेब आणि बायको या दोघांना सोडून आम्ही इतर कोणाला या जगात घाबरत असू असे मला कधीच वाटले नव्हते. पण आम्हा तिघांचीही अक्षरशः फाटली आहे. आमचा ॲडमिनिस्ट्रेटिव ऑफिसर बनिया म्हणजे चतुर आहे. तो सहजपणे म्हणाला, ‘सरदार साले कुत्ते है. लेकिन कुत्ताभी वफादार होता है. तो सरदार येथे आश्रय मागायला आलाय. पण त्याची दाढी करून त्याच्याच गाडीत घालून आम्ही त्याला ल्युडलो कॅसलच्या शरणार्थी शिबिरात पाठवतोय. अगदी विश्वास ठेवा.’

ते तिघे समाधान पावून आणि कृतकृत्य होऊन निघून गेले. आम्ही बलकारसिंगची गाडी झपाट्याने अज्ञात ठिकाणी हलवली. बलकारसिंगची बायको बिचारी सरळ आहे. ती म्हणाली, तू खरेच दाढी मिशा का काढत नाहीस ?’ फारसा न चिडणारा बलकार त्या क्षणी भयंकर उखडला. म्हणाला, ‘मी तुम्हाला जड झालो असेन तर मला घराबाहेर काढा. मी दाढी मिशा काढल्या असे नुसते जरी समजले तरी खेड्यात माझे वडिल आत्महत्या करतील ! माणूस कोणते मानदंड मानतो ? कोणत्या भावनात अडकून पडलेला असतो त्यांचे हे भांडण कसे मिटवायचे हेच मला कळेना. आम्ही त्यांना आमच्याच घरात आणखी थोडे आत हलवले. अडगळीच्या एका खोलीत तो त्याची बायको मुले यांना जवळजवळ बंदिस्त करून ठेवले !

मी अंतरबाह्य घाबरलोय. माझ्या घशाला कोरड पडली आहे. मी इतका डरपोक माणूस आहे हे मला आयुष्यात पहिल्यांदाच समजलय माझा कणा किती लिबलिबीत आहे हे मला समजलंय. भोवतालच्या व्यवस्थेच्या तटबंदीतच मी फक्त सुरक्षित असतो. अधिकार गाजवू शकतो. ती भोवतालची यंत्रणा, व्यवस्था कोलमडली की मी कोलमडतो. आणि खरी गोष्ट अशी की राजधानीतील सारी यंत्रणा पार कोसळून पडलेली आहे. सर्वत्र नुसती अंदाधुंदी आहे.

—आजच्या काळात दुसऱ्या एखाद्या देशाला अगदी ठरवून प्रयत्न करून सुद्धा आपल्या राजधानीत फक्त चार दिवसांत अशी अंदाधुंदी माजवून दाखविता येणार नाही.

## उत्तरार्ध पुढील अंकी



# आपली राजकीय संस्कृती लोकशाहीविरोधी का होत आहे ?

प्रा. बी. वाय. कुलकर्णी

" **मी** जन्मभर राज्यशास्त्र शिकवले आहे; पण लोकशाही समाजव्यवस्थेला आवश्यक मानल्या गेलेल्या घटकावयवाचा मागमूस नसता लोकशाही कोठे नांदलेली मी पाहिली नाही; परंतु या सिद्धांताला भारत हा एकच अपवाद आहे आमच्या सैद्धांतिक तर्कात न बसणारा हा एक नमुनेदार अपवाद आहे." अमेरिकेच्या कॉर्नेल विद्यापीठातील प्रो. क्लिंस्टन रॉसिटर यांनी १९५५ मध्ये हे मत व्यक्त केले होते. तर " साऱ्या ग्रीस देशाला अथेन्सनगरीची राजवट ज्याप्रमाणे आदर्श व मार्गदर्शक ठरली त्याप्रमाणे नेहरूंच्या भारतातील लोकशाही साऱ्या आशिया खंडाने कित्ता घ्यावी अशी आहे " असे १९५७ ला ब्रिटिश राज्यशास्त्रज्ञ प्रो. मॉरिस जीन्सला वाटले.

ही सर्व गौरवपूर्ण विधाने आज भारतीय लोकशाहीच्या संदर्भात हास्यास्पद वाटावीत इतकी वाईट स्थिती इथल्या लोकशाहीची झालेली आहे. काहींच्या मते भारतीय संस्कृती, चालीरीती, भारतीय सामाजिक मनोरचनेचा विचार घटना निर्माण करणाऱ्यांनी न करता घटना हे जे शिल्प तयार केले तीत भारतीय संस्कृतीला अजिबात स्थान नाही. त्यामुळेच भारतीय लोकशाहीसमोर ह्या अडचणी निर्माण झालेल्या आहेत; पण या मताला फारसा अर्थ नाही. माजी अटर्नी जनरल दफ्तरींच्या मते ''भारतीय संविधानात काहीही चूक नाही आणि तरीही अनेक अडचणी निर्माण झालेल्या आहेत याचे कारण संविधान निर्माण करणाऱ्यांनी या संविधानाची अंमलबजावणी सभ्य माणसे करतील असे गृहीत धरले होते जे काही वर्षांनंतर निखालस चूक ठरले नी ह्या अडचणी निर्माण झाल्या आहेत." ( सेमिनार ८१ ) दफ्तरींच्या या मतात शंभर टक्के सत्यांश आहे कारण भारतीय संविधानाचा अनादर नेत्यांनीच नव्हे तर बुद्धिवंत, राजकीय कार्यकर्ता व सामान्य व्यक्तींनी संविधानाने त्यांच्यावर टाकलेली जबाबदारीची जाणीव न ठेवता व तिने बाळगलेल्या अपेक्षांची उपेक्षा करून केला आहे. थोडक्यात याला स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेली भारतीय राजकीय संस्कृती जबाबदार आहे.

भारतीय राजकीय संस्कृतीत पैसा, जात, सत्ताग्रहण, गुंडगिरी व पक्षांतर या वाईट गोष्टींनाच जास्त महत्त्व आलेले आहे त्याचा विपरीत परिणाम संपूर्ण व्यवस्थेवरच झाला आहे.

## पैसा

भारतीय राजकीय संस्कृतीत पैशाला वाजवीपेक्षा जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे. तो इतका महत्त्वाचा झाला आहे की " आज चांगले व वाईट नेते असा फरक करता येईल; पण पैशाशिवाय कुणीही नेता होऊच शकत नाही अशी स्थिती होऊन बसली आहे. " ( रिफ्लेक्शन ऑन ८२, सेमिनार, जानेवारी ८३ राजेंद्रपुरी ) पैशाने काहीही करता येते अशी स्थिती निर्माण झालेली आहे ''अंतुलेंना कोर्टाचा आधार घेऊन श्रीमती गांधींना काढावे लागले. अन्यथा आमदाराकरवी त्यांना ते शक्य नव्हते कारण त्यांना आपल्या बाजूने ठेवण्याची अंतुलेंत इंदिरा गांधींइतकीच पैशाची ताकद होती " ( सेमिनार जाने. ८३ रिफ्लेक्शन ऑन ८३ राजेंद्रपुरी ) राजकीय कार्यकर्त्यांचे वर्तन आज पैसा ठरवत आहे. राजकारणात येण्यासाठी व त्यात टिकण्यासाठी पैसा अत्यंत आवश्यक आहे. " राजकीय कार्यकर्त्यांना चांगल्या नेत्याबद्दल आदर असतो; पण ते ऐकतात मात्र श्रीमंत नेत्यांचेच " राजकीय यशाची ती आज गुरुकिल्ली झालेली आहे. प्रचंड पैसा बाळगणारा राजकारणी सहज मुख्यमंत्री होऊ शकतो. या संदर्भात हरियाणाचे मुख्यमंत्री भजनलालचे मत विचारात घेण्यासारखे आहे. त्यांच्या मते " दिल्लीचा सफदरजंग-रस्ता इतका भ्रष्टाचारी आहे हे मला आधी माहीत असते तर मी कित्येक वर्षे या अगोदरच मुख्यमंत्री झालो असतो. " (सेमिनार जाने. ८३ ) तर "करोडो रुपये जमवून जर बिजू पटनाईक ओरिसाचा मुख्यमंत्री होत असेल तर मी शेकड्यांनी करोडो रुपये जमवून भारताचा पंतप्रधान सहज होऊ शकतो." असे बहुगुणांचे मत आहे (ऑल जनता मेन-जनार्दन ठाकूर ) कित्येक राजकीय निर्णय पैसाच आज घ्यावयाला भाग पाडत आहे. बाबासाहेब भोसलेंना मुख्यमंत्रीपदावरून दूर केले याचे कारणही पैसाच आहे. त्यांच्याच शब्दात " इथे ( महाराष्ट्रात ) मुख्यमंत्री असा हवा की जो उद्योगपतींकडून थैल्या काढून दिल्लीला पोचवू शकेल कारण निवडणूकनिधी देशात जेवढा गोळा होतो त्यातला निम्मा भाग मुंबईचा असतो. माझ्यासारखा माणूस दिल्लीला अशा वेळी उपयोगाचा नाही..." अशा प्रकारची अनेक मते पैशाचा भारतीय राजकारणावरील प्रभाव स्पष्ट करण्यास पुरेशी आहेत.

पैशाला मिळालेल्या या स्थानामुळे येथील उद्योगपतींच्या हातात अप्रत्यक्ष राजकारणाची सूत्रे गेलेली आहेत. ' साठीच्या दशकाच्या मध्यास सत्तेच्या वर्तुळातून उघडपणे बोलले जाई की, संसदेतील शंभरएक सभासद आपल्या राजकीय पक्षापेक्षा एका विशिष्ट मक्तेदार घराण्याशीच निष्ठा ठेवून आहेत व संसदेत ते त्यांच्याच हितसंबंधाची काळजी घेताना दिसतात.' ( प्लॅनिंग अँण्ड इकॉनॉमिक पॉलिसी इन इंडिया--पा १६. ध. रा. गाडगीळ ) 'सरकारने उद्योगपतींची मानहानी करण्याचे धोरण असेच चालू ठेवले तर एके दिवशी ते धोरण त्यांच्या अंगावर उलटेल व अनेक पुढाऱ्यांची शिरे धुळीत लोळतील!' असा कडक इशारा किंवा गर्भित धमकी घनश्यामदास बिर्ला यांनी १९६५च्या सुरुवातीस कलकत्त्यात केलेल्या एका भाषणात दिली होती बिर्लांचे हे भाषण हिंदी बड्या भांडवलदाराच्या हातात राजकीय

सत्ता किती प्रचंड प्रमाणात केंद्रित झालेली आहे याचेच स्पष्ट गमक आहे. या भांडवलदारी घोषणेचा प्रतिवाद कॉंग्रेस वा इतर सत्ताधाऱ्यानी अद्याप केलेला नाही. '१९७९ च्या मध्यास त्या काळातील उद्योगमंत्री जॉर्ज फर्नांडिस याने उघडपणे म्हटले की, उद्योगमंत्रालयातील प्रत्येक फायलीची एक प्रत बिर्लाकडे असते. पैशाच्या आत्यंतिक वाढलेल्या महत्त्वामुळेच बड्या उद्योगपतीच्या हातात आर्थिक सत्तेबरोबर राजकीय सत्ता केंद्रित झालेली दिसून येते' (स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक बदल–अ. रा. कामत पा. ४१–४५) आज कित्येक समाजवादी कायद्याची अमलबजावणी पैसेवाल्याच्या हातात असलेल्या सत्तेमुळे होत नाहीये याचे उत्तम उदाहरण म्हणजे जमीनसुधारणा कायदे. '१९५३ साली दहा एकर किंवा अधिक जमिनीची मालकी एकूण समाजातील वरच्या १३ टक्के लोकांच्या हाती होती तोच ढाचा जमीनविषयक अनेक कायदे होऊनही फारसा बदललेला नाही.' (द अॅग्रेरियन प्रॉस्पेक्ट इन इंडिया, पा. १२–१३) 'त्यामुळे जमीनसुधारणा कायदे म्हणजे एक तर लुटूपुटीच्या सुधारणा तरी होत्या किंवा ढोंग होते' (दि चॅलेंज ऑफ वर्ल्ड पॉव्हर्टी-गुन्नार मिर्डाल) असा पैशाचा सर्वदूर प्रभाव भारतात झाला आहे पैशाला हे महत्त्व प्राप्त झाले आहे याचे कारण निवडणुकीत प्रचंड पैसा लागतो. नेत्याचा कमीअधिक प्रभाव त्याच्या कर्तृत्वावर अवलंबून राहिलेला नाही तर त्याच्याजवळ असलेल्या कमीअधिक पैशावर निश्चित झालाय आज दोन नेत्याच्या प्रभावाची तुलनादेखील त्याच्याजवळ असलेल्या गंगाजळीवर होत असते. पैशाला मिळालेल्या या स्थानाचा परिणाम असा झाला आहे की, त्याने भारतीय लोकशाहीचे सरंजामशाहीत रूपांतर केले आहे. सत्तास्थानी छोटेछोटे सरंजामदार निर्माण केले आहेत त्याचा परिणाम ६० टक्के दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्या या देशात लोकशाही असताना प्रतिनिधी मात्र एकही दारिद्र्यरेषेखाली असणारा विधानसभेत व लोकसभेत सापडत नाही

## सत्ता

जेव्हा पैशाला आत्यंतिक महत्त्व प्राप्त होते तेव्हा त्याच्या रक्षणार्थ पैसा बाळगणारे सत्ता प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात वास्तविक राजकारणात 'सत्ता' हा महत्त्वाचा घटक असला तरी तो साधन असावा, साध्य कधीच होऊ नये कारण अधिकारग्रहणावर भर देणारा सिद्धांत, प्रवृत्तीचा विचार लोकशाही समाजरचना निर्माण करील असा फार कमी संभव आहे

स्वातंत्र्योत्तर काळात आपला सर्व भर सत्तेवर आहे. त्याचा परिणाम त्याची लागण सर्व क्षेत्रात झालेली आहे. तिला सर्वदूर, सर्वस्पर्शीपणा आलेला आहे प्रतिष्ठा व मोठेपणा इतकेच काय पण कवित्व व साहित्याची मान्यता सत्तेच्या मान्यतेशिवाय होईनाशी झालीय राज्यपुरस्कार प्राप्त झाल्याशिवाय साहित्याला, व्यक्तीच्या कलाकृतीला समाजही मान्यता देईनासा झालाय सांस्कृतिक कार्यक्रम राजाश्रयाशिवाय होईनासा झालाय. या सर्व प्रकाराची तुलना मध्ययुगीन समाजरचनेशी करता येईल. कारण तेव्हाच्या त्याच कलावंताची, साहित्यिकाची, . विद्वानाची, संगीतकाराची नावे आज आपल्याला माहीत आहेत, ज्यांना राजाश्रय होता. तीच स्थिती थोड्याफार फरकाने आज जाणवते. यातून एकच निष्कर्ष काढता येईल की, 'आजही भारतीय समाजरचनेची मनोरचना ही मध्ययुगीन आहे' (लोकशाही सिद्धांत आणि प्रयोग– पु ह. पटवर्धन) ती अद्याप लोकशाहीपूरक इहवादी व्हायची आहे म्हणूनच इथे लोकशाही लडखडत आहे.

## जात

भारतीय राजकीय संस्कृतीचे अभिन्न अंग असेच जातीचे वर्णन करावे लागेल कोणतेही राजकीय विश्लेषण करत असताना, निवडणुकीच्या संदर्भात काही निष्कर्ष काढताना, प्रचारात जातीचाच प्रामुख्याने आधार घेतला जातो. तालुका किंवा प्रादेशिक नेतृत्वच त्याचा फायदा घेते असे नव्हे, तर तथाकथित राष्ट्रीय नेतेही जातीशिवाय विचारच करत नाहीत असे दिसते. हेच पहा ना, 'बनियोंने कभी हुकुमत की है ? हुकुमत तो राजपुतोंने और जाटोंने की है।' हे चरणसिंगाचे सी बी. गुप्ताबद्दलचे वाक्य पुरेसे बोलके आहे. (ऑल जनता मेन – जनार्दन ठाकूर) तर 'इस कम्बख्त मुल्कमें चमार कभी पंतप्रधान नही हो सकता' हे जगजीवनरामाचे वाक्य त्याच्यावर असलेला जातिप्रभाव दाखवण्यास पुरेसे आहे. इतकेच नव्हे तर 'एखादा ब्राह्मण बाबुजीच्या चरणाला अक्षरश. स्पर्श करतो तो बाबुजीच्या जीवनातील सर्वात आनंदाच्या क्षणापैकी एक असतो.' (ऑल जनता मेन – जनार्दन ठाकूर) याचा अर्थ अद्यापही ते ज्यासाठी संघर्ष करतात त्या तत्त्वावर त्याची निष्ठा नाही असाच होतो. प्रादेशिक नेतृत्वाचा तर याबाबत विचारच न केलेला बरा यामुळेच भारतीय राजकारणाचा अभ्यास प्रामुख्याने 'जात व राजकारण' या निष्कर्षाखाली जास्त होत असताना दिसून येतो.

## मंत्रतंत्र व मांत्रिक

भारतीय राजकीय संस्कृतीत आता भर पडली आहे ती मंत्रतंत्र व मांत्रिकाच्या प्रभावाची. भारतीय राजकारणात 'रासपुटीनचे' महत्त्व दिवसेदिवस अतिशय वाढत चाललेले आहे याचा अर्थ ते पूर्वी अजिबात नव्हते असे नव्हे 'पंतप्रधान नेहरू आजारातून बरे व्हावेत यासाठी तीन मूर्तीत ४,२५००० वेळा जप केला गेला होता त्याला नेहरूंची संमती होती इतकेच नव्हे तर, त्या वेळी होणाऱ्या विधीला ते हजरही रहात' (१४ मार्च १९७३ कुलदीप नायरनी गुलझारीलाल नंदाची घेतलेली मुलाखत–कुलदीप नायर) (अधिक सविस्तर माहितीसाठी माय डेज विथ नेहरू–मथाई) विशेष म्हणजे या जपामुळे नेहरूचा मृत्यू चार-पाच वर्षांनी लांबला असाही त्यानी दावा केला आहे (नंदा तर आपला बराच वेळ हवन व पूजेत घालवत असत (My days with Nehru –मथाई) नेहरूसारख्या इहवादी नेत्याची ही अवस्था तर इतराचे विचारायलाच नको प्रत्येक नेत्याचा एक स्वतंत्र मांत्रिक आहे दिल्लीवरून निघणाऱ्या 'भूभारती' या नियतकालिकाने यावर अतिशय झगझगीत प्रकाश टाकला आहे. (जून ८० व मे ८३ भूभारती) १९७७ पूर्वी पंतप्रधानपदी असताना अनेक महत्त्वाचे निर्णय श्रीमती गांधी मध्यरात्री घेत. कारण मंत्रतंत्राच्या दृष्टीने ही वेळ सगळ्यात चांगली समजली जाते १९८० च्या जानेवारीत मकरसंक्रातीच्या दिवशी पहिल्या प्रहरात श्रीमती गांधीनी आपल्या नव्या मंत्रिमंडळाची शपथ घेतली ती याच दृष्टि-

कोणातून. चौधरी चरणसिंगांनी पतप्रधान होण्यासाठी जनतापक्ष सोडला तेव्हा त्यांच्यासाठी काही तांत्रिक पंचतारांकित हॉटेलांतून अनुष्ठान करत होते तर त्याच वेळी जगजीवनराम देहरहवाबाबाच्या चरणी लीन झाले होते. स्वत:ला लोहियावादी समजणारे राजनारायण यानी १९७७ च्या निवडणूकीच्या वेळी निवडणूकअर्ज मांत्रिकाच्या सल्ल्यावरून एका विशिष्ट वेळी भरला होता व निवडणुकीतील विजयानंतर मंत्रिमंडळात सामील झाले व नंतर त्यानी पेढे वाटले ते देखील मांत्रिकाच्या सल्ल्यावरून. (जनता इन अ जाम-के. अे. अब्बास) इतकेच नव्हे तर त्यांनी 'जनतापक्ष फोडला. तेव्हा आपल्या यशासाठी त्यानी मांत्रिक पुरुषोत्तम नाथ कपूर व चंद्रास्वामी याना होमहवन करायला लावले होते.' (ऑल जनता मेन–जनार्दन ठाकूर पा. १२१) कमलापती त्रिपाठी, ललित नारायण मिश्र चंद्रास्वामीचे शिष्य आहेत तर हेमवतीनंदन बहुगुणाचे गुरू आहेत. स्वामी पूर्णानंद. (जनता इन अ जाम-के. अे. अब्बास) १९८० मध्ये जगजीवनराम यानी इंदिरा गांधीना हरवून आपण विजयी व्हावे म्हणून जयगुरुदेवबाबाचे आशीर्वाद घेतले होते. यापेक्षाही खरी आश्चर्यकारक बाब म्हणजे नेहमी अशा प्रकारच्या मंत्रातंत्राला नावं ठेवणारे व धर्म ही एक अफूची गोळी आहे असे मानणारे नंबुद्रीपादचे 'साम्यवादी सरकार केरळमध्ये १९५७ व १९६७ ला सत्तेवर आले तेव्हा त्यानीही मांत्रिकाकडून शुभ दिवस व शुभ वेळ शपथग्रहणासाठी पाहून घेतली होती.' (फार ईस्टर्न इकॉनॉमिक रिव्हयू–हाँककांग १५–६–१९६७ व दि इंडियन एक्सपिरिमेंट गीसलहर वीरसिंग पा. २०६) हे झालं बड्या नेत्याचं. लहान नेत्याचं तर विचारायलाच नको. ते सध्याही राजकीय यशासाठी यज्ञात गुंग दिसताहेत. भारतीय राजकीय संस्कृतीला हे एक विचित्र गळू झालेले आहे असे मला वाटते.

पैसा, जात, सत्ता, मंत्रतंत्राचा परिणाम असा झाला आहे की, आजही भारतीय समाज–मनोरचना ही मध्ययुगीन असल्यासारखी वाटते. मध्ययुगीन समाजरचनेने भिन्न चालीरीती व संकुचित विचार पोसले.संस्कृतीतील हीनोच्च आविष्कार जपण्यासाठी जातीबद्ध समाजरचना निर्माण केली. एकमेकापासून अलग राहणारे गट निर्माण केले. त्यामुळे राजकीय शक्ती निर्माण झाली नाही. (सोबत दिवाळी अंक ८२–आपल्या संस्कृतीतील घेण्यासारखे व नाकारण्यासारखे–तर्कतीर्थ जोशी पा. ७५) आजही थोड्याफार फरकाने हीच स्थिती पाहावयास मिळते. पूर्वी कसल्याही प्रकारचा तार्किक आधार नसताना जाती निर्माण झाल्या. आज कसल्याही प्रकारचा वैचारिक मूलभूत फरक नसताना राजकीय पक्ष निर्माण झाले आहेत ढोबळ अर्थाने आज त्या जातीच आहेत. तेच आज जातीचे काम करत आहेत. त्याचा परिणाम आजही समरस न होणारे गट निर्माण झाले आहेत. त्यामुळे आजही लोकशाहीसाठी आवश्यक असणारी राजकीय शक्ती भारतात निर्माण होताना दिसत नाही. राष्ट्रापुढील समस्याचे त्याना भान नाही. या बाबतीत सर्वसामान्य व्यक्तीचे वागणे व प्रामुख्याने आसामच्या संदर्भात त्याचा अलिप्तपणा इंग्लंडचे माजी पंतप्रधान चेंबरलेनच्या अनुनयाच्या परराष्ट्रधोरणाची आठवण करून देणारा आहे. चेंबरलेन पोलंडवर आक्रमण झाल्यानंतरही म्हणाला होता की, 'पोलंड इंग्लंडपासून अतिशय दूर आहे, ज्याचे नावही फार कमी लोकाना माहीत आहे' (शंकर एन. मैना–निवृत्त ICS ऑर्गनायझर १३ मार्च ८३) हेच मत भारतीय लोकाचे आसामच्या संदर्भात आहे असे वाटते. अगदी जागृत समजला जाणारा कामगार, आणीबाणीत त्याच्या नेत्याना अटक झाल्यानंतर त्यांच्या सुटकेची मागणी न करता शिस्तपर्वाच्या दिंडीत सामील झाला होता तर 'आणीबाणीच्या कालात म्हशीच्या अंगावर पाण्याचा थेंब पडावा व प्रतिकार म्हणून तिने कातडी थरारावी तितकाही प्रतिकार भारतीय जनतेने तिचे हक्क काढून घेतल्यानंतरही केला नाही' याला कारण अद्यापही भारतात राजकीय शक्ती निर्माण झालेली नाही.

मध्ययुगीन राजकीय संस्कृतीचा एक गुण आहे 'गुंडगिरी', 'अरेरावी' आज तीही भारतीय संस्कृतीचे अभिन्न अंग झालेला आहे. 'बिहार, उत्तरप्रदेशात तर जो जास्तीत जास्त मतदानपेट्या ताब्यात घेईल तो निवडून येतो अशी स्थिती निर्माण झाली आहे' (दिल्ली दिनांक–गंगाधर इंदूरकर) उत्तर भारतात आज अनेक नेत्यांजवळ भाडोत्री गुंड आहेत. कित्येक गुंडाना राजकीय अभय आहे तर 'उत्तरप्रदेश व बिहारमध्ये डाकूना विशिष्ट जातीचे रक्षक म्हणून मान्यता प्राप्त होत आहे ज्या,मुळे त्याना पकडणे कठीण होऊन बसले आहे. (अ कास्ट स्टडी : रूटस् ऑफ व्हॉयलन्स इन बिहार–इंडियन एक्सप्रेस मार्च १३–८३ गिरिजा चौधरी) आज राष्ट्रीय नेत्यावर टीका करणे सोपे झाले आहे; पण स्थानिक पातळीवरील नेत्यावर टीका करणेही कठीण झाले आहे. याचे कारण त्याची गुंडगिरी होय.

## थट्टेचा विषय

याव्यतिरिक्त 'पक्षांतर' व खोटे आश्वासन ही दोन भारतीय राजकीय संस्कृतीची आज अंगे झालेली आहेत पक्षांतराने तर आज कहर केला आहे आमदाराची किंमत आज ऑनमनीसारखी ४०/५० हजार ठरली आहे. (सफर-मोहन धारिया तर 'आयाराम गयारामचे राजकारण' या नव्या शब्दाची भर राज्यशास्त्राच्या शब्दकोषात त्याने घातली आहे पक्षांतरामुळे हरियानात १९६८ ला विधानसभेच्या ४१ सदस्यापैकी २३ मंत्री होते. याचा परिणाम राजकीय पक्ष आज थट्टेचा विषय झालेले आहेत कारण ते केवळ निवडणुकीच्या राजकारणाचा विचार करतात त्याचे खोटे आश्वासन देणे इतके वाढले आहे की ते जाहीरनामा एक अनिवार्य गोष्ट म्हणून काढतात. दुसऱ्या शब्दात आज जाहीरनाम्याचे महत्त्व सिगारेटच्या डबीवरील वॉर्निंगसारखे झाले आहे. जिचा ओढणाराही विचार करत नाही नी छापणाराही. (राजकीय भारत– 'भास्कर भोळे')

एकंदरीत भारतीय राजकीय संस्कृती लोकशाही तत्त्वाच्या विरुद्ध आज आकार घेऊ लागली आहे आणि हाच तिचा मार्ग राहिला तर लोकशाही राजकीय व्यवस्थेला इथे काम करणे कठीण होऊन बसेल. कारण प्रत्येक राजकीय व्यवस्था 'राजकीय संस्कृतीच्या मुशीत तयार होत असते' व तिचे यशापयशही राजकीय संस्कृतीवरच अवलंबून असते

□

# कादंबरीची जन्मकथा

साहित्यपरिषदेत दर वर्षीप्रमाणे याही वर्षी दहा नोव्हेंबर पासून शारदीय व्याख्यानमाला सुरू झाली.
व्याख्यानमालेचा विषय आहे ' कादंबरीचा जन्म ' शनिवार, रविवार व बुधवार हे तीन दिवस पडघवली, ओंकार व महानगर या कादंबऱ्यांचे लेखक अनुक्रमे गो. नी. दांडेकर, भीमराव कुलकर्णी व रमेश मंत्री यांची व्याख्यानं झाली. त्याचा हा वृत्तांत. पुढील अंकात ज्योत्स्ना देवधर, वि. ग कानिटकर व ना. सं. इनामदार यांच्या व्याख्यानांबद्दल ......

**मंगला गोडबोले**

## पडघवलीत विरघळलेला लेखक

महाराष्ट्र साहित्यपरिषदेने आपल्या शारदीय व्याख्यानमालेच्या निमित्ताने मराठी साहित्यामधल्या एकेका वाङमयप्रकाराचा नामवत लेखक–समीक्षकाकडून परामर्ष घेण्याचा परिपाठ ठेवलेला आहे. या निमित्ताने मागील वर्षी स्त्रियाच्या आत्मचरित्राचा मागोवा घेण्यात आला होता हे अनेकाच्या स्मरणात असेल. यदाचा विषय ' कादंबरीची जन्मकथा ' असा होता. १९५५ साली प्रसिद्ध झालेल्या 'पडघवली'पासून १९८३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'इतिवृत्त'पर्यंत मराठी साहित्यावर ठळक ठसा उमटवलेल्या काही कादबऱ्यांची जन्मकथा त्याच्या लेखकाच्या तोडूनच ऐकण्याची सधी या निमित्ताने श्रोत्याना मिळाली. कादबऱ्याची निवड परिषदेच्या पदाधिकाऱ्यानी परस्पर चर्चेतून केलेली होती असे समजले. श्री. ना. पेंडसे किवा भालचद्र नेमाडे याच्यासारखे नामवत कादबरीकार या मालिकेत नव्हते, तसेच लेखिकापैकी एकटचा ज्योत्स्नाबाईचीच दखल घेतली गेली होती, असे काही मुद्दे साक्षेपी श्रोत्याना जाणवल्याशिवाय राहिले नसतील; पण यावर सयोजकाचे उत्तर असे की, धोरणात्मक दृष्टीने कोणाही लेखकाला वगळण्याचा प्रयत्न नव्हताच. फक्त या वेळेस जे लेखक उपलब्ध झाले त्याना सहभागी केलं गेलं इतकच. तरीसुद्धा इतके कादबरीकार एकामागोमाग एक वाचकासमोर येण हाही दुर्मिळ योगच होता त्याचा लाभ स्वत: घ्यावा व वाचकानाही द्यावा या दृष्टीने ही व्याख्याने ऐकली. पहिल्या दिवशी दि १० नोव्हेंबर रोजी गो नी. दाडेकर ' पडघवली ' बद्दल बोलले. ' पडघवली ' ही त्याची आठवी कादबरी १९५५ मध्ये प्रसिद्ध झाली. त्याआधीची ' शितू ' ही कादबरी लोकप्रिय झालेली होतीच. किंबहुना या व्याख्यानमालेमध्येसुद्धा ' शितू ' बद्दल बोलाव अशीच सयोजकाची इच्छा होती; पण या कादबरीवर शरदबाबूचा फार प्रभाव आहे, तिची अर्पणपत्रिकाही ' श्रद्धेय शरदबाबूच्या स्मृतीस ' अशीच आहे. या प्रभावाच्या बाहेर पडून स्वतत्रपणे लिहिलेली ' पडघवली ' हीच कादबरी विचारार्थ घेणे योग्य असे गोनीना वाटले अर्थात शरदबाबूचा प्रभाव अटळच होता. १९३० ते १९४५ पर्यंत विजनात असताना मराठी साहित्याशी काडीचाही सबध नव्हता. मराठीतले त्या काळातले लेखक वाचलेले नव्हते, रूढ वाङमयप्रकाराचा, त्याच्या तत्राचा, वाचकाच्या कलाचा काहीही अदाज नव्हता; पण माळव्यामध्ये भटकत असताना शरदबाबूच्या साहित्याची एकदा तोडओळख झाली आणि ते भूत कायमचं मानगूटीवर बसल श्रीकातचे चार भाग तर किमान पन्नास वेळा वाचले. इकडे खाजगी जीवनात अन्न घालून, जगवणाऱ्या आधार देणाऱ्या स्त्रिया वेळोवेळी भेटत गेल्या. त्यामुळे स्त्रीची उदात्त प्रतिमा रगवणारे शरदबाबू भावनिकदृष्टचाही जवळचे वाटले. परिणामी सुरुवातीचं लेखन ' बिंदूची कथा ' ' तुडवलेले घरकुल ' यासारख्या सुरुवातीच्या कादबऱ्या ही शरदाची तिसऱ्या, चौथ्या श्रेणीची अनुकरणं होती असं आज गोनीना वाटत. गोनीना निवेदक गोनी किंवा लेखक गोनी खऱ्या अर्थानं सापडला तो पडघवलीच्याच सुमारास. लिहिताना आपण नक्की कोणता वाङमयप्रकार लिहितोय याची कल्पना नव्हती ' पडघवली 'च्या प्रस्तावनेतसुद्धा ही कादबरी आहे की दुसरंच काही आहे असा सभ्रम त्यांनी व्यक्त केलेला आहे आजही तिला कादबरी म्हणण्यापेक्षा ' एका खेड्याची मोठी गोष्ट ' अस म्हणण गोनीना श्रेयस्कर वाटत. गोष्टच, कथाही नव्हे. कारण ' कथा ' या शब्दाचे साहित्यिक कगोरे त्याना अभिप्रेत नाहीत. लिहिण्यापूर्वी आलेला एक अस्सल, रसरशीत जीवनानुभव हाच खरा मोलाचा होता. तो त्यानी सविस्तरपणे सागितला. ते मूळचे कोकणातल्या ' गुढघं ' या गावचे बालपणी १९२२–२४ च्या सुमारास या गावानं त्यातल्या नैसर्गिक समृद्धीनं, अन्नपाण्याच्या सुबत्तेन, नारळीपोफळीच्या बागानी मनावर खोल ठसा उमटवलेला होता. विजनवासानतर १९५३–५४ मध्ये ते पुन्हा तिकडे गेले तोवर मात्र हे सर्वत्र चित्र पार कोलमडलेल होतं. जिथे बारमास दुथडी भरून वाहणारा पाट असायचा तिथे पाण्यासाठी भाडण होत होती. सुकलेले माड, झडलेल्या पोफळी, वडिलोपार्जित जमिनीच्या कोर्टदरबारी होणाऱ्या वाटण्या, दारिद्रच याच दर्शन मन विद्ध करणार होतं. जिथे नादतीगाजती घरं होती तिथे आता पोस्टमनची, चाकरमान्या मुलाच्या पत्राची, मनिऑर्डरची वाट बघणारी असहाय्य म्हातारी डोकी उरलेली होती. या माणसाच, एका अर्थानं आपल्याच वाडवडिलाचं, पितराच, ऋण फेडण्यासाठी हे पुस्तक लिहिलं पाहिजे अशी तीव्र इच्छा झाली. त्या वेळी पुस्तकाची एक धूसर आकृती मनात होती; पण त्याखेरीज नायक, खलनायक, सुरगाठ, निरगाठ

उकल अशा तांत्रिक करामती काहीच योजलेल्या नव्हत्या.

स्वतःच्या लेखनप्रक्रियेविषयी सांगताना गोनी म्हणाले की, आतून भरून आल्याशिवाय लिहिणं त्यांना जमत नाही. मृण्मयीसारख्या कादंबरीचं बीज पंचवीस वर्षं मनात राहातं हे चित्र एकीकडे तर 'मोगरा फुलला' सारखी कादंबरी प्रत्यक्ष लिहिताना महिनाभरात हातावेगळी होते हे चित्र दुसरीकडे. विचाराच्या ओघात हळूहळू एकेक पात्र दाराबाहेर येऊन उभं राहात, त्याची निवड डोक्यात होऊ लागते आणि अखेरीस लेखक हा नुसता लेखनिकच झालेला असतो. 'शितू' या कादंबरीच्या अखेरीस शितूच विसूशी लग्न का केल जात नाही असा प्रश्न अनेकदा गोनींना विचारला जातो. यावर गोनींच उत्तर असतं, 'लग्न लावणारा मी कोण बाबांनो ? तीच 'नको' म्हणाली. तसाच काहीसा प्रकार पडघवलीच्याही शेवटाबाबत होतो. अंबूवहिनी पडघवली सोडून जाते असा शेवट गोनींनी योजलेला होता; पण यासबंधी विचार करताना त्यांना जाणवू लागलं की ही स्त्री हे गाव सोडून जाणं शक्य नाही. तिला तसं करायला लावणं हा तिच्या व्यक्तिमत्त्वावर अन्याय होईल ही कादबरी मौज प्रकाशन गृहाने काढली. साहजिकच श्री. पु. भागवतांशी वारंवार होणाऱ्या चर्चा, त्याचे सस्कार याचाही प्रभाव पडणं अटळ होतं. गोनींनी फार उदार भाषेत हे ऋण मान्य केलं, पण त्याचबरोबर आपण कादबरीशी कसे एकरूप झालो होतो, पात्रामध्ये कसा परकायाप्रवेश केला होता त्याचही मनोज्ञ दर्शन घडवल. अशा परिस्थितीत अंबूवहिनी गावातच परत राहाते हा शेवट अपरिहार्य झाला. तिला गावचा किल्लेदार गूढ रूपात दिसतो व तो तिला गाव सोडून न जाण्याविषयी विनवतो असा प्रसंग या कादबारीच्या अखेरीस आहे. हा एकच नव्हे तर असे सहासात गूढ, अतिमानवी म्हणावेत असे प्रसग या कादबरीत आहेत.जसे दुर्गादेवीची सामक्षा सतीची सामक्षा, सातमायचा किंवा आवळीमातेचा दृष्टान्त, विहिरीमधले सोन्याचे देव इत्यादी. वाचताना हे प्रसंग गुंगवून टाकणारे वाटले तरी नंतर ह्याच्याविषयी आधुनिक वाचकाला कुठे तरी खटकल्याशिवाय राहात नाही हे गूढाच, अद्भुततेचं आकर्षण कशामुळे ? एरवी कमालीच्या वास्तव असणाऱ्या चित्रणात हा धागा इतका बेमालुमपणे कसा काय मिसळतो ? यावर गोनींचं उत्तर असं की, त्याचा गूढावर विश्वास नाही. मानवी सृष्टीपलीकडे कोणती सजीव सृष्टी असेल अस त्यांना वाटत नाही; पण त्यांच्या आईचा या सर्वांवर विश्वास होता आणि कादबरी लिहिताना ते परकायाप्रवेश करून तिच्या शरीरात शिरलेले होते कोकणात अशा अनेक मिथ्स' (myths) प्रचलित असत. दीर्घकाळ निसर्गाच्या सहवासात राहाणं, अज्ञान, प्रगत समाजापासून दुरावा, माणसाच रिकामपण, दारिद्र्य या अनेक गोष्टींच्या परिपाकामुळे असेल; पण अतिमानवी शक्तीवर विश्वास ठेवणारी अनेक माणस तिथे असत. गोनींची आईही त्यापैकीच एक. तिन आपल्या सासूची जी गोष्ट गोनींना सांगितली त्यावरून या कादबरीचा आराखडा उभा राहिला. त्यामुळेच तिची भाषा, तिचे विचार, अतींद्रिय शक्तीवरचा तिचा विश्वास अपरिहार्यपणे या कादंबरीत आलेला आहे, अस या कादबरीतल्या मिथ्सच त्यांनी स्पष्टीकरण केलं.

या कादबरीविषयी दुर्गाबाई भागवतासारख्या समीक्षकान म्हणून ठेवल आहे, खडीसाखरेचा खडा हळूहळू विरघळत अखेर अदृश्य व्हावा तसा लेखक या कादंबरीशी एकरूप झालेला आहे म्हणूनच पडघवली लिहिणारा लेखक तिच्याबरोबर सपला, मागे उरलेल्या गो. नी. दांडेकर या माणसाला तिच्याविषयी काही विचारू नये असं गोनी म्हणाले असावेत

## ओंकार – नवा लेखनप्रयोग

दुसरं व्याख्यान 'ओंकार' या कादबरीबद्दल डॉ. भीमराव कुलकर्णी याच होतं. १९६८ साली प्रसिद्ध झालेल्या या ऐतिहासिक कादबरीन मराठी रसिकतेला धक्का दिला होता तो मुख्यतः आनंदीबाई पेशव्यांच्या अनपेक्षित चित्रणामुळे. आनंदीबाईंनी 'ध' चा 'मा' करून नारायणरावाचा खून करवला हे मराठी मनावर पक्क रुजलेलं होतं. इतिहासाच्या अभ्यासकांना, ऐतिहासिक कागदपत्र साक्षपाने वाचणाऱ्यांना सत्य परिस्थिती काय आहे याची कल्पना होती; पण तपशिलाच्या बारकाव्यासकट ते जनसामान्यापर्यंत पोचलेल नव्हत. तथाकथित ऐतिहासिक कथा, कादंबऱ्या, नाटक यांनी पेशव्यांच्या काळाच अतिशय ढोबळ, बटबटीत असं चित्र रेखाटून आनंदीबाईंवर सर्व दोषाचा ठपका ठेवलेला होता. अशा लहानमोठ्या प्रयत्नामध्ये तर सोडाच पण 'स्वामी'सारख्या अत्यंत गाजलेल्या कादबरीमध्येही परिशिष्टात अनेक ऐतिहासिक ग्रथांची, कागदपत्रांची मोठी जत्री दिलेली आहे. त्यावरून हे ललितसाहित्य ऐतिहासिक सत्यच होय असा आभास निर्माण केला जाई व बहुसख्य वाचक त्याल भाळत. आजही ही परिस्थिती फारशी बदललेली नाही. इतिहासाचा खूप अभ्यास करून लिहिल्यासारख्या वाटणाऱ्या अनेक कथाकादंबऱ्या पूर्णपणे कल्पित आहेत. भीमरावांच्या मते याचं कारण मराठी मनामध्ये दडलेल आहे. मराठी मनाला माणसामाणसांमधली शोकांतिका पेलत नाही. उलट रम्याद्भुततेच भाबड आकर्षण त्याला सतत जाणवतं व त्याचं इमानेइतबारे पोषण करणाऱ्या कथाकादंबऱ्यांचा पुरवठा सातत्यानं होतो. ही प्रवृत्ती किती जुनी आहे हे सांगताना भीमरावांनी उदाहरण दिलं ते रमामाधवाच्या कथेच. १८६२ साली विनायक जनार्दन कीर्तने नावाच्या लेखकान ४० पृष्ठांच, गद्य, एकही पद नसलेलं असं नाटक लिहिलेल होतं. त्याच नाव होत, 'नाटक थोरले माधवराव पेशवे याजवर.' यात रमामाधवाच उत्कट प्रेम व अखेरीस रमाबाईंचं सती जाणं हे अतिशय रोमँटिकपणे लिहिलेलं होतं. नव्हे, एका अर्थानं ही मराठीमधल्या रोमँटिसिझमची सुरुवात होती. बरोब्बर १०० वर्षांनी १९६२ मध्ये रणजित देसाईंनी 'स्वामी' ही कादबरी लिहून पुन्हा त्याच अलौकिक प्रेमाचा आणि सती जाण्याचा उदोउदो केला. ऐतिहासिक कागदपत्र याला साक्ष देत नाही. रमाबाईंच सती जाण प्रेमापोटी नव्हतं, धर्मज्ञेपोटी होत. कारण ती विनापत्य होती. रमाबाईंचा माधवरावांशी झालेला विवाह विपरीत परिस्थितीत झालेला होता. सुरुवातीला वेगळीच वधू नेमस्त केली होती, निमंत्रणे गेली होती; पण ती सवध फिसकटल्यावर, केवळ वेळ साभाळण्यासाठी, पागेमध्ये घोड्यावर शिक्का मारणाऱ्या कारकुनाची मुलगी, केवळ पत्रिका जुळते आहे या निकषावर ठरवली

गेली. अशा अनेक तपशिलांचा अभ्यास् केला तर रमामाधवाची अनुरूपता आणि अनुरक्तता शकास्पदच ठरेल. अस असूनही १०० वर्षांच्या अतरान त्याचाच पुनरुच्चार व्हावा व तो लोकप्रिय व्हावा ही गोष्ट वेगवेगळ्या अर्थांनी मननीय आहे.

वेळोवेळी बखरीच सपादन करताना, प्रबधासाठी ऐतिहासिक मराठी नाटकाचा विशेष अभ्यास करताना, 'ऐतिहासिक पत्र-बोध' या पुस्तकाच सपादन करताना डॉक्टर भीमराव कुलकर्णी याना सुमारे वीस दप्तर, अनेक ऐतिहासिक कागदपत्र वाचण्याची सधी मिळाली. त्यामध्ये १९६३–६४ च्या सुमारास आनंदीबाईंची दोन पत्र त्यांच्या वाचनात आली. त्यापैकी एक नाना फडणिसाना व दुसरं सखारामबापूना लिहिलेल होतं व दोन महिन्याचा आपला मुलगा दुसरा बाजीराव ती लिहिनो आहे अशो भूमिका घेऊन उत्तम भाषेत राजकीय मुत्सद्देगिरीचा नमुना त्यात पेश केलेला होता. आनदीबाई खरोखर खलस्त्री असती नर अशी पत्र लिहिण्याच नैतिक बळ तिच्यात कुठून आलं असतं? असा प्रश्न भीमरावाना सतत पडू लागला पेशवाई, त्याची घराणेशाही आणि माणसामाणसाचे परस्पर सबध अधिक बारकाव्याने तपासले पाहिजेत अशी प्रेरणा त्यातून मिळाली. जसजस अधिक खोलात शिराव तसतशा कल्पिताला लाजवतील अशा गोष्टी आणि प्रसग ऐतिहासिक कागदपत्रात सापडू लागल्या. रघुनाथराव पेशव्यानी झेंडा अटकेपार लावला तो वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी! पहिली पत्नी निधन पाल्यावर मोहिमेवर असतानाच गलगली मुक्कामी त्यानी आनदीबाईंशी विवाह केला; तो इतक्या घाईत की तिच नाव बदलण्याचंही राहून गेलं. आनदीबाई अत्यत देखण्या; पण लग्न झाल्यापासून पेशव्याच्या अतर्गत राजकारणाची झळ त्याना सतत लागत राहिली. पेशव्यांवर, शनिवारवाड्यावर गोपिकाबाईची घट्ट पकड होती. गगापुरी राहूनसुद्धा अनेक घडामोडीची सूत्रं त्याच्या हाती होती. त्याचा सगळा जीव विश्वासरावावर, देखण्या मुलावर. 'उद्याचा पेशवा' म्हणून त्याची जडणघडण करण्यात त्या रमलेल्या. धाकटा नारायण मात्र त्याच्याकडून कायमचा उपेक्षित राहिलेला हे 'अपयशी कार्टं' देवीनं आजारी पडतं तेव्हा त्याची शुश्रषा गोपिकाबाई करत नाहीत, आनदीबाई करतात. त्यातून त्यांचा नारायणाशी भावबध्द जुळत जातो. रघुनाथराव माधवरावाशी असेच मनाने जवळ आलेले असतात. आनंदीबाईंचे पहिले दोन मुलगे दगावतात. राघोबादादा दत्तक मुलगा घेनात. अशा वेगवेगळ्या प्रसगामधून जाताना आनदीबाईंचा नारायणरावाविषयी जिव्हाळा वाढतच गेला असणार. अशा नातेसबंधामधली स्त्री एकाएकी खून करण्यापर्यंत पोचेल हे सभवत नाही. नारायणरावाच्या वधानतरचा प्रसगही यावर प्रकाश टाकणारा आहे. गंगाबाई सती जायला निघतात तेव्हा आनदीबाईच त्याना थाबवतात कारण त्याची पाळी नुकतीच चुकली असल्याच त्याच्या लक्षात आलेलं असत. नारायणरावांचा अंश टिकवण्याची, वाढवण्याची ही धडपड काय सुचवते? अशा अनेक धाग्यादोऱ्यामधून आनदीबाईंचा आणि पर्यायाने पेशवाईचा जो चेहरा भीमरावाच्या परिचयाचा झाला तोच वाचकापुढे ठेवण्याचा त्यानी प्रयत्न केला. तोपर्यंत पेशवाईवरचं सर्व ललितसाहित्य हरिवशाच्या बखरीचा आधार घेऊन लिहिलेलं होत आणि रघुनाथरावाशी ज्या पटवर्धन घराण्याच जुनं वैर त्या पटवर्धनानी ती लिहिलेली होती. साहजिकच ती पूर्वग्रहदूषित होती. आनदीबाई व रघुनाथरावाचं अतिरंजित, एकागी चित्र उभारणारी होती. नवऱ्याच्या पश्चात त्याच्या नाटकशाळा साभाळणारी, गोपिकाबाईकडून पावलोपावली अपमानित झालेली, कटामध्ये आपला हात नसल्याच पत्र लिहिणारी आनदीबाई त्यात येण शक्यच नव्हत

अर्थात 'ओकार' ही कादबरी आहे, इतिहास नव्हे याचं भीमरावाना भान आहे 'ओकार'च्या पहिल्या आवृत्तीला त्यानी प्रस्तावना लिहिली नव्हती, सूचीही जोडली नव्हती आता तिची तिसरी आवृत्ती निघत आहे. मधल्या काळात कडवट टीकेपासून मन पूर्वक स्वागतापर्यंत वेगवेगळ्या प्रकारानी ही कादंबरी स्वीकारली गेली. लेखनाच्या पातळीवर हा एक प्रयोग होता अस भीमरावाना वाटत. घटनाप्रसगाची मालिका न रचता सुट्या कथा रचाव्यात व त्याची कादबरीची प्रकरणं व्हावीत. सलग वाचताना त्याचप्रमाणे सुट्या वाचतानाही त्या वाचनीय ठराव्यात अशी धारणा होती. उदाहरण द्यायचं तर 'ब्राह्मणी दौलत' हे कादबरीत पुष्कळ शेवटी आलेले प्रकरण त्यानी कथास्वरूपात फार सुरुवातीलाच लिहून ठेवल होतं. अर्थात यातला तत्राचा भाग सोडला तरीही मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पेशवाईतील माणसं तपासण्याचा हा असा ठळक प्रयत्न होता व त्या दिवशीच्या व्याख्यानावरून तरी ही माणसं भीमरावाना चागली समजली असावीत असं वाटल्याशिवाय राहात नव्हतं. इतिहास किंवा पुराणातील माणस वाचताना त्यांच्यावर आजचे संदर्भ लादण्याऐवजी त्याच्या देशकालस्थितीच्या सदर्भात बघणं किती महत्त्वाचं आहे हे त्या दिवशी प्रकर्षाने जाणवून गेलं.

## महानगर उत्स्फूर्त लेखन प्रक्रिया

१४ नोव्हेंबर रोजी रमेश मत्री यांच 'महानगर' या त्याच्या गाजलेल्या कादबरीवर भाषण झालं. १९६६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या कादबरीमुळे विनोदी लेखक रमेश मंत्री याची गभीर साहित्यकार म्हणून दखल घेतली गेली. सामान्य वाचकामध्ये तर ती अमाप लोकप्रिय झालीच; पण त्यातल पाश्चात्य जग जाणकारानाही मोहवून गेल. लडनसारख्या महानगरामध्ये श्रीकात नावाचा तरुण वृत्तपत्रविद्या-शिक्षणासाठी जातो. एका डच मुलीच्या प्रेमात पडतो. दीड वर्ष ते बरोबर राहतात; पण आपण विवाहित आहोत हे तिला सागण्याच तो सतत टाळत राहतो. त्या डच तरुणीचे विचार, प्रगल्भता त्याला मोहवीत राहते. अखेरीस ती शिक्षणक्रम सपवून परत गेल्यावर प्रतारणेची बोच त्यालाच असह्य होते व तो स्वत हून तिच्याकडे जाऊन आपण विवाहित असल्याचा कबुलीजबाब देतो अस काहीसं कथानक आहे त्याच्या जोडीनं लडनमधल कलाविश्व, समाजजीवन, नैसर्गिक वातावरण, शास्त्रीय विकासाची चिन्ह, स्त्रीपुरुष सबध अशा अनेक गोष्टी या कादबरीत फार बारकाव्यानिशी रगवल्या आहेत. या विस्ताराबद्दल काहीचा आक्षेप असला तरी वातावरणनिर्मितीसाठी तो आवश्यक होता अस मत्रीना वाटतं. डच तरुणीत क्रमाक्रमान

गुंतत जाताना नायकाच्या मनात पत्नीचा विचार आल्याचं कुठेच दाखवू नये हेही वाचकांना खटकतं. ही उणीव आपल्या हातून अनवधानानं राहून गेली आहे हे मंत्रींना जाणवलेलं आहे; पण कादंबरीच्या दुसऱ्या-तिसऱ्या आवृत्तीत तो भाग घालावा अशी इच्छा त्यांना झाली नाही. लेखनप्रक्रियेतल्या उत्स्फूर्तपणावर त्यांची भिस्त आहे. त्यामुळे आराखडे करून, घट्ट नियोजनात कादंबरी बसवण्यापेक्षा तिचा प्रवाह वाहील तसा वाहू द्यावा असा प्रयत्न त्यांनी केला. पाच ते साडेपाच महिन्यांत सलगपणे कादंबरी हातावेगळी करता आली. लंडनसारखी महानगरं ही एका अर्थानं वेटिंगरूम्स ( स्टेशनवरच्या प्रतीक्षालयांसारखी ) सारखी असतात. जगातून नाना ठिकाणांहून माणसं तिथे काही कालावधीसाठी येतात, त्या काळात मिळेल तेवढं सुख ओरबाडून घेतात व पुन्हा आपल्या जीवनक्रमाला लागतात असा त्यांचा अनुभव होता. किंबहुना हे सर्व कथानक आत्मवृत्तात्मकच होतं; पण आत्मवृत्तापेक्षा कादंबरीचा साचा निवडला की, घटनाप्रसंगांच्या निवडीचं स्वातंत्र्य राहातं. ते घेता यावं म्हणून त्यांनी ही कादंबरी लिहिली व ती ९० टक्के सत्यावर आधारित आहे असा निर्वाळा लिहिल्यानंतर अनेक वर्षांनी पहिल्यांदा दिला. प्रस्तुत भाषणाच्या अखेरीस श्रोत्यांनी कादंबरीबद्दल प्रश्न विचारावेत, व्यक्तिगत अनुभवाची फेरतपासणी करू नये असं आवाहन मंत्रींनी केलं. त्यांच्या स्वतःच्या भाषणात मात्र कादंबरीपेक्षा आत्मकथनातच ते अधिक रमलेले दिसले. एखाद्या ललितकृतीची जन्मकथा सांगण्याचा प्रयत्न किंवा तयारी फारशी आढळली नाही. साहजिकच श्रोत्यांचे प्रश्नही कादंबरीपेक्षा व्यक्तिगत जीवनाकडेच रोखलेले आढळले. श्रोत्यांमधील एका स्त्रीनं अखेरीस विचारलं की, ज्या प्रकारचा अनुभव व लेखन तुम्ही केलंत तसंच तुमच्या पत्नीनं केलं असतं तर तुम्हाला काय वाटलं असतं ? यावर मंत्रींनी तत्काळ उत्तर दिलं, ' साधी गोष्ट आहे. रस्त्यात एखादी शंभराची नोट पडली असली तर आपण ती उचलतो; पण म्हणून आपली नोट पडावी किंवा आपली नोट कोणी उचलावी असं आपल्याला वाटत नाही. ' मंत्रींनी असं उत्तर द्यावं व श्रोत्यांनीही भरपूर हसून त्याला दाद द्यावी या दोन्ही गोष्टी मला अनेक अर्थांनी सूचक वाटल्या. अशा प्रकारच्या व्याख्यानाचा वक्ता आणि श्रोता या दोघांकडून अधिक गांभीर्याची अपेक्षा आहे असं म्हणावं का ? □

१ ते ८ नोव्हेंबर १९८४ हा वनमहोत्सवसप्ताह : त्या निमित्ताने

# मुंबईचा हवा-प्रदूषण प्रश्न जनतेच्या हाती

रामदास टेमगिरे

दरवर्षी पावसाळ्यात सर्दी–ताप, हिवाळ्यात थंडी–सांधेदुखी, उन्हाळ्यात संसर्गजन्य कातडीचे रोग हे चक्र वर्षानुवर्ष चालू असून सर्वसामान्य माणसं ' हे चालायचंच ' ' ह्याची सवय आपल्याला झाली पाहिजे ' ह्या दृष्टिकोनातून ह्या आरोग्यघातक प्रश्नाकडे केवळ अज्ञानाने दुर्लक्ष करीत असतात. कारण आपण जेथे राहतो ती झोपडपट्टी असो वा हौसिंग सोसायटी असो; पण तेथे स्वच्छता राखायची, झाडे लावून वायु–प्रदूषणाचा बीमोड करायचा चंग जोपर्यंत सर्वसामान्य माणसं वस्तुस्थिती लक्षात घेऊन बांधणार नाहीत, तोपर्यंत मुंबईची औद्योगिक दाट लोकवस्ती–वाहने–कंपन्या यामुळे दिवसेंदिवस वाढणारा पण आपल्या ध्यानीमनी नसलेला वायुप्रदूषणाचा प्रश्न सरकारी पातळीवर कितीही राबविला तरी शरीरातील ओल्या जखमेवर वरचा कोरडा उपचार अशी विचित्र अवस्था ह्या मुंबईची होईल, असे मत मुंबई वायू–प्रदूषण अभ्याससमितीचे अध्यक्ष डॉ. सुधाकर कामत ह्यांनी माझ्याजवळ व्यक्त केले

डॉ सुधाकर कामत हे परळच्या के. इ. एम. हॉस्पिटल व जी. एस. मेडिकल कॉलेजचे छातीच्या रोगाचे तज्ज्ञ प्राध्यापक आहेत. त्यांनी डिसेंबर १९७६ सालापासून १९८३ पर्यंत लालबाग, चेंबूर, खार, कोयनाड ( अलीबाग मुंबई रस्त्यावर आहे ) हे चार विभाग संशोधनासाठी निवडून अंतिम निरीक्षण केले.

' १९७६ साली मुंबईतच डॉ. सुधाकर कामतांनी गिरणीकामगारांच्या कामाच्या–घरच्या वायू–प्रदूषणाचा अभ्यास करून त्यांची आरोग्य दुष्परिणाम पाहणी केली होती तसेच १९६४–६५ साली मद्रास मेडिकल कॉलेजमध्ये वायु–प्रदूषणाच्या अभ्याससमितीत ते सामील झाले होते. १९६९ साली मुंबई महानगरपालिकेने नागपूरच्या नॅशनल इन्व्हॉरॉनमेन्ट इंजिनिअर रिसर्च इन्स्टिटयूटला ( NEERI ) मुंबई शहरातील वायू–प्रदूषणाचा अभ्यास करण्याचे कंत्राट दिले होते. १९७३ साली त्यांची अभ्यासपाहणी संपली व त्यांनी १९७५ साली मुंबई महापालिकेला आपला अहवाल सादर केला. तो अहवाल पाहून महापालिकेने ठरवलं की, वायू प्रदूषणाच्या औद्योगिक दुष्परिणामाचा अभ्यास झाला. आता आरोग्यदुष्परिणामांचा अभ्यास होणे अत्यावश्यक आहे. हे ठरवून महापालिकेने तशी सूचना नॅशनल इन्व्हॅरॉनमेन्ट इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिटयूटला दिली. म्हणून ते सदस्य महापालिकेच्या हॉस्पिटलमध्ये चौकशीसाठी गेले. त्या वेळी श्री. जे. आर पटवर्धन मुख्य शहरअभियंता होते. त्यांनी डॉ. सुधाकर कामतांना टेलिफोन केला व त्यांनी ह काम करायला डॉ. कामतांना सांगितले. १९७६ च्या अखेरीस श्री. व्ही. बी. शिरोडकर उपमुख्य शहरअभियंता यांनी तसा ठराव जून १९७६ साली पालिका सभागृहात पास करून घेतला. डिसेंबर १९७६ साली अभ्यास पाहणीला सुरुवात झाली. ह्यासाठी वेस्टर्न सेंट्रल रेल्वे, रिझर्व बँक ऑफ इंडिया, लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन, टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेन्टल रिसर्च, शहरविकास आणि जनआरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने ह्या



प्रकल्पासाठी एक लाखाचे अनुदान दिले. १९७७ ते १९८३ या सात वर्षांकरिता मुंबई महानगरपालिकेने ह्या प्रकल्पावर अठरा लाख रुपये खर्च केले.

१. १९७७–८१ या चार वर्षात अभ्यास समितीने ४१२९ लोकांना तपासले. यात लालबाग, चेंबूर, खार, कोयनाड भागातील सर्वसामान्य आजारी माणसे होती. मध्य मुंबई, पूर्व व पश्चिम उपनगरात तीन श्रेणींचे सल्फर डायऑक्साईड ($SO_2$) चे प्रदूषण होते. तसेच ग्रामीण भागात ४० किलोमीटर क्षेत्राच्या टप्प्यात, त्यातच दक्षिण मुंबई विभागही गटवारीने येतो. येथे फर्टिलायझरसारखा प्रदूषित धूर वातावरणात सोडल्यामुळे विशेष दुष्परिणाम जाणवला.

अभ्याससमितीचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

अ) मुंबईतील दोन प्रदूषित विभागात रोग्यांचे प्रमाण फार जाणवले. याचे कारण कफ, थंडी आणि घशाचे रोग हे होत. ग्रामीण भागापेक्षा शहरी रहिवाशांचे आरोग्य-प्रश्न फारच बिकट आहेत. जेथे कमी वायु–प्रदूषण आहे तेथील शहरी आरोग्य सुव्यवस्थित असल्याचे पाहणीत आढळले. वायु–प्रदूषणामुळे डोकेदुखी, डोळ्यांचे विकार, छातीची दुखणी, चामडीचे रोग, अंतर्गत चिकट कफ झालेले आढळले.

ब) फुफ्फुसाची मूलभूत कार्ये ग्रामीण भागात कमी कार्यक्षम असून शहरात जेथे वायू-प्रदूषण कमी आहे तेथे चांगली कार्यक्षमता आहे. हा आलेख जास्त प्रदूषणाच्या ठिकाणी घसरत गेलेला आहे.

क) दोन विभागांत ( चेंबूर व खार ) चांगल्या वृक्षारोपण लागवडीमुळे समूह रोगाचे प्रमाण कमी झाले असल्याचे दिसून आले.

ड) शहरातील कमी दर्जाच्या राहणीमान विभागात घशाच्या रोगाच्या जास्त तक्रारी समजल्या. ह्याचे कारण मोटर–कारचे प्रमाण वाढल्यामुळे वायु–प्रदूषण वाढले.

इ ) रासायनिक कंपन्यांच्या संख्येत कमालीची वाढ म्हणजे रोगाच्या प्रमाणात वाढ. हे प्रमाण इतर कारणांमुळे होणाऱ्या प्रदूषणापेक्षा जास्त आहे.

फ ) बहुसंख्य आरोग्य दुष्परिणाम हे प्रदूषण अस्तित्वाशी संबंधित वस्तू म्हणजे निरुपयोगी रासायनिक वस्तू–द्रव्य, सोडीअम डाय ऑक्साईड व नायट्रोजन डायऑक्साईड

२. तुलनात्मक वर्गवारी विभागाचा अभ्यास–गेल्या चार वर्षांत फार एकजुटीमुळे १९८०–८१ मध्ये आम्ही काही निष्कर्ष काढू शकलो.

अ) हगवण वा अतिसाराचे शहरात चढ-उताराचे फार प्रमाण असून हा वायू रासायनिक वस्तूच्या टाकाऊ संख्येशी प्रमाणित आहे.

ब) राहणीमानाच्या समस्या ह्या विपुल प्रदूषणभागात १० टक्केपेक्षा जास्त असाध्यात.

क) सुका दीर्घकालीन कफ शहरातील मध्यम प्रदूषित भागात २९.५ टक्के आहे.

ड) ठसका मारणारा कफ हा उच्च प्रदूषित भागात ५.८ टक्के आहे.

इ) वारंवार येणारा सर्वसाधारण ताप–थंडी उच्च प्रदूषित भागात सर्वांत जास्त २६.९ टक्के प्रमाण असून हेच प्रमाण मध्यम प्रदूषित भागातही आहे.

फ) झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांना हृदयविकाराचा त्रास नसतो हे विशेष.

ज) ग्रामीण भागात आरोग्याचे प्रदूषण अभावी प्रमाण फार दर्जेदार आहे.

च) फुफ्फुसाची कार्ये ही उच्च प्रदूषण भागात जास्त प्रमाणात अकार्यक्षम असल्याचे दिसून आले.

३. तीन वर्षांच्या अभ्यासकालावधीत २,२०० रुग्णाच्या रोजच्या आरोग्यनोंदीवरून ३०–३५ टक्के लोकांना सर्वसामान्य थंडी–ताप, ४५ टक्के वर कफ, २.८ टक्के जणांना घशाचे रोग दिसून आले. जे उच्च व मध्यम प्रदूषित भागात राहतात त्यांना वरील रोगांचा प्रादुर्भाव झाल्याचे जाणवले.

अ) मुंबईत वायु–प्रदूषणाला आमंत्रण देणारे, पर्यायाने त्या संबंधित रोगाचे प्रमाण जास्त असणारे महिने असे आहेत. ऑगस्ट, सप्टेंबर, मे आणि जून.

ब) शहरी भागात हगवणरोगाचे प्रमाण वायू–प्रदूषणामुळे उंचावल्याचे स्पष्ट झाले.

क) वायु–प्रदूषित विभागात सोडियम डाय ऑक्साइडचे उंबरठागणिक रोज कमाल प्रमाण पन्नास मायक्रोग्रॅमच्या खाली आहे. रोज ह्या प्रमाणात बदलाची पातळी घसरण्याची शक्यता कमी असते.

ड) कमी प्रमाणित वायु–प्रदूषित विभाग-सल्फर इंधनाचे कमी प्रमाण हे प्रदूषण आटोक्यात असल्याचे लक्षण होय.

इ) प्रदूषित विभागातील बहुसंख्य व्यक्ती ह्या प्रदूषित वातावरणाच्या संबंधित आजार झाल्याने वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात दाखल होतात.

फ) ह्यापेक्षा ग्रामीण भागात परिस्थिती फार आटोक्यात आहे. किमान प्रदूषणामुळे होणाऱ्या रोगाचे प्रमाण नगण्य आहे.

४. १९७१–७९ सालात मुंबई शहरातील मृत्यू कोणत्या कारणास्तव झाले ह्याबाबत अभ्याससमितीचे निष्कर्ष असे–

अ) दीर्घ दुःखदायक आजार व पोटाच्या तक्रारींच्या रोगावर प्रदूषणामुळे स्थिरावलेल्या

प्रदीर्घ, दुष्परिणामाच्या कारणामुळे मृत्यू होतात.

ब) घशाचे, फुफ्फुसाच्या दुष्परिणामी रोगामुळे मृत्यूचे प्रमाण जास्त प्रमाणात वाढले आहे.

क) श्वासोच्छ्वासावर झालेला दुष्परिणाम, जेथे औद्योगिक प्रदूषण सर्वांत जास्त आहे, अशा मध्य मुबई विभागात मृत्यूचे प्रमाण जास्त आहे.

ड) अपुऱ्या आरोग्यसुविधा उपनगरात असल्याने पोटाच्या व्याधीमुळे तेथे मृत्यूचे प्रमाण मध्यम असल्याचे दिसून आले

इ) छातीचे रोग कारखाने व वाहने याच्या अति धुरामुळे होऊन वायुप्रदूषित भागाशी सबधित व्यक्ती ह्या कारणास्तव दगावते.

फ) वायु-प्रदूषित भागात सोडियम डाय ऑक्साइडप्रमाणे 'बेन्झोवीरीन' ह्या घातक वातावरणातील प्रदूषित घटकामुळे कॅन्सरचा (कर्करोगाचा) माणूस दगावण्याचे प्रमाण शहरात जास्त असल्याचे निष्कर्षाअती समजले.

५. मध्यमुबईतील १४१० रहिवाशाचा नियमित अभ्यास केल्यावर असे जाणवले की, १८.३ टक्के लोकाना वारवार होणारे पडसे ३८.६ टक्के लोकाना दीर्घकालीन खोकला, १०टक्के लोकाच्या श्वासोच्छ्वासाच्या तक्रारी आहेत आणि ९.४ टक्के लोकाना हगवणीचा त्रास होता. यात नवीन विषय म्हणजे सर्दीचे वाढते प्रमाण तर जुना विषय म्हणजे जास्त छातीच्या रोगाचे रुग्ण हे होत.

अ) फळे व भाजीपाला हे अत्यत जतुयुक्त व दूषित असून त्यामुळेच रोगाच्या प्रमाणात झपाटयाने वाढ होऊन, मानवाची रोगप्रतिकारशक्ती सपुष्टात येऊन त्याला खाण्यातून रोग उद्भवतात.

ब) महापालिका भाजीपाला बाजारामध्ये जे पाणी वापरले जाते तेही जतुयुक्त असते. अनेक ठिकाणी पाइप फुटलेले असतात. बाजारातील अस्वच्छता सपुष्टात आणण्यासाठी दररोज बाजार पाण्याने स्वच्छ करून बेकार माल, पॅकिंगची योग्य तऱ्हेने विल्हेवाट लावून जन्माला येणाऱ्या अनेक नव्या जतूचा नीमोड करण्याचा प्रयत्न केला जात नाही

क) पोटाचे विकार हे गरीब वस्तीत अन्नात योग्य घटकाचे प्रमाण समतोल नसल्याने म्हणजेच रोज शरीराला हवी तेवढी कॅलरी अन्नातून न मिळाल्याने होतात.

ड) अनेक हगवणीच्या केसेस ह्या दूषित भाजीपाल्याशी सबधित आहेत. उदा. जुना भाजीपाला, स्वस्त, घाणेरडा भाजीपाला घेतल्याने जेवण्याच्या निमित्ताने जतू आयते शरीरात प्रवेश करतात म्हणून हगवणीचे गरीब वस्तीत प्रमाण जास्त.

६ कृत्रिम फुफ्फुसाच्या चौकशीअती नुकताच धुम्रपान किंवा प्रदूषणाच्या विषमतेचा त्याच्यावर होणारा दुष्परिणाम उजेडात आला आहे.

७. अनेक श्वासोच्छ्वासाच्या तक्रारी ह्या मुबईमध्ये ॲलर्जीशी संबधित आहेत का ह्याची पाहणी केली नाही. हे रक्ताभिसरण पाहणीत समजले; पण त्याचा संबंध रासायनिक वायूप्रदूषण प्रक्रियेशी असावा हे अभ्यासाअंती समजले

८. वाहतूक नियत्रण नाक्यावर वैद्यकीय दूषित रोगाचे प्रमाण जास्त असून शहरात नुकतेच बाधलेले उच ओव्हर पूल हे चाळ इमारतीला लागून बाधल्यामुळे तेथील आरोग्य वातावरण आजाराला आमत्रण देणारे आहे..

अ) परतु दीर्घकालीन दमेवाल्याच्या तक्रारीचा सबध कार्बन मोनॉक्साईड वायू प्रदूषणाशी नाही.

ब) कार्बन मोनॉक्साइडचे जास्त प्रमाण हे प्रशस्त बगल्यात व शहरातील मुख्य मोठ्या रस्त्यावरील रहिवाश्याच्या आजूबाजूला असते.

क) अन्न शिजवणाऱ्या इधनाचे घटक उदा. द्रव पेट्रोलियम गॅसने लक्षणीय वाढ आरोग्यविषमतेत होऊन त्याचे जास्त दुष्परिणाम मुले व स्त्रियावर झालेले आढळले.

९. छाती रोगग्रस्त व्यक्तीने नियमित वैद्यकीय उपचार घेतले तर त्याचा आजार लवकर आटोक्यात येतो. त्यामुळे अती धुम्रपान करणाऱ्या व्यक्तीही रोगमुक्त होण्याची शक्यता जाणवली. नियमित उपचार घेतल्याने क्वचित योग्य उपचाराच्या अभावी रुग्णाची वाढलेली सख्या, आटोक्यात येण्याची शक्यता आहे.

१० धोक्याच्या रासायनिक प्रकल्पात काम करणाऱ्या क्षेत्रातील कामगाराचा अभ्यास केला असता त्यातील २६% लोक ओल्या कफाचे रोगी तर २९% लोक श्वासोच्छ्वासाचे रोगग्रस्त असून त्याचा दीर्घ सबंध काम करण्याच्या अवधीत तेथील दूषित हवा – द्रव – रासायनिक मिश्रणाने त्याच्या शरीरावर दुष्परिणाम होतात.

अ) यात प्रत्यक्ष यत्राच्या नजिक ३६% लोकाचा सबध येतो.

ब) क्ष-किरणाने त्यांच्या छातीचे छायाचित्र घेतल्यावर ५१% लोकाचे आरोग्य धोक्यात असल्याचे स्पष्ट झाले

क) अती धुम्रपान आणि असमतोल लक्षण ह्यामुळे छातीचे क्ष-किरण पाहिल्यावर वरील कारणामुळे फुप्फुसाचे कार्य अकार्यक्षम करण्यास अती मदत असल्याचे स्पष्ट झाले.

११. श्वासोच्छ्वास किंवा दम्याची व्याधी वाढल्याची लक्षणे हिवाळयात दिसतात. त्यातच अ-धुम्रपान व धुम्रपान करणाऱ्याना हिवाळयात जास्त त्रास जाणवतो. विशिष्ट मोसमात व हवासानाच्या बदलावर वायू-प्रदूषणाचा चढउतार दिसून येतो. ही चिन्हे पाहणीअती उमजली.

१२. दोन हंगामात ( हिवाळा व उन्हाळा ) आहार समतोल ह्या शहरी भागात १९५७ लोकात तर ग्रामीण भागात ७५८ लोकात अनुक्रमे ४८-५५% शहरी भागात ४६% ग्रामीण भागात यथायोग्य कॅलरी पोषक अन्न मिळत असल्याचे पाहणी अती समजले.

अ) प्रोटीनचे शहरी लोकात ११-१९% इतके कमी प्रमाण अन्नात असल्याचे आढळले तर ग्रामीण लोकाच्या अन्नात प्रोटीनचे ४६% इतके तुटपुजे प्रमाण जाणवले.

ब) ग्रामीण भागातील अन्नाचा आहार निकृष्ट दर्जाचा आहे.

क) समतोल आहाराचा संबंध त्या कुटुबातील रोजगारीवर अवलबून असतो,

ड) ०-९ वर्षांच्या लहान मुलाना मिळणारा निकृष्ट दर्जाचा आहार तसेच महिलांना मिळणारा अपुरा आहार यामुळे उभयताना योग्य प्रमाणात कॅलरी वा प्रथिन मिळण्याचे प्रमाण कमालीचे अल्प असून याच्याशीच कमजोरीचा सबध आहे.

इ) जेथे उच्च दर्जाचे वायू-प्रदूषण असून श्वासोच्छ्वासाच्या तक्रारीच्या प्रमाणात चढ उतार आहे तेथे निश्चित निकृष्ट अन्नआहार

मिळाल्याने ह्या रोगांच्या संख्येत लक्षणीय वाढ होते.

१३. अभ्यासगटाने नियमित विशिष्ट रोग्यांचा अभ्यास केल्यावर वायू-प्रदूषित विभागातील काही वर राहून गेलेले वातावरणातील विषमता आणणारे घटक-पदर्थांचा उल्लेख खालील प्रमाणे आहे.

अ) धुम्रपान, योग्य आहाराचा अभाव, ७ वर्षांच्या खालील व ५० वर्षांच्या वरील व्यक्तींना जडणारे रोग हे त्याच्यामध्ये रोगप्रतिकार शक्ती कमी असल्यामुळे वयाचे कारण इंधन हेच घटक वायू-प्रदूषणाचे महत्त्वपूर्ण वाटेकरी आहेत.

ब) चार विभागात वैद्यकीय लक्षणावरून सर्वत्र दूषितपणा सारखा न आढळता वेगवेगळ्या प्रमाणात, वेगवेगळ्या घटकांमुळे सातत्याने टिकवून राहण्याची कारणे विभिन्न असल्याची जाणवली.

क) ग्रामीण लोकाच्या फुप्फुसाचे कार्य वृद्धपणात कमी प्रमाणात का होईना पण शहरी तुलनेने सुदृढ कार्यक्षम असते.

ड) शहरी भागातील वृद्ध स्त्री-पुरुषाचे फुप्फुसाचे कार्य मोठ्या प्रमाणात अकार्यक्षम होण्यास वायु-प्रदूषणामुळे मदत होते.

इ) अशा काही विभागात लहान बालकांची वाढ हळूहळू खुटत होती. हवा-प्रदूषणाची अस्तित्वात असलेली पातळी साधारण सोडियम डाय-ऑक्साइडने दर्शविल्याप्रमाणे श्वासोच्छ्वास दूषित विकाराशी सबंधित असते.

निष्कर्ष असे —

१. पुढे रासायनिक प्रक्रिया कपन्यांमुळे वायु-प्रदूषित होतील त्या सुधारण्यासाठी कंपन्यांच्या सभोवतीचा बराचसा भाग मोकळ्या हवेचा व हिरवळीचा-झाडांनी आच्छादित असावा.

२. रासायनिक कपन्याना दाट लोकवस्तीच्या ठिकाणी उभारण्याची परवानगी न देता शहराबाहेर डोंगराजवळ उभारणीसाठी-विस्तारासाठी परवानगी द्यावी.

३. वायु-प्रदूषण हे दाट लोकवस्तीमध्ये फार असून हे विभाग नियंत्रणाखाली आणणे अत्यावश्यक आहे.

४. बहुसंख्य रुग्णाच्या हृदय आणि फुप्फुसाची कार्य विषमतेचे अडथळे आणतात. ह्याचे कारण उत्कृष्ट वाहतूक मार्गाच्या आराखड्याचा अभाव आणि विस्तृत नसलेले मार्ग. वाहतूक नियंत्रण मध्यवर्ती गाभा सुनियंत्रित असावा.

५. मुबईत ४६ लाख लोक घाणेरड्या झोपडपट्टीत राहतात. तेथे दारूभट्टया वगैरे गैर मार्गाने वायु-प्रदूषणाचे प्रमाण जास्त असून त्यामुळे त्याचे आरोग्य कमालीचे धोकादायक बनते हे पाहणीअंती समजले.

(अ) झोपडपट्टी हा राहणीमानाचा भाग उघडपणे गरीब असतो. त्याची आरोग्यहित आणि कमी जागा, मानवी दुष्कृत्यामुळे त्या भागातील रहिवाशाचे आरोग्य आणखी धोक्यात येते.

(ब) झोपडपट्टीवाढीवर नियंत्रण हेच आरोग्याला वरदान ठरेल त्यामुळे जनतेचा वैद्यकीय उपचारासाठी केला जाणारा खर्च कमी होईल.

(क) झोपडपट्ट्यामधील बहुसख्य माणसांचे आरोग्य धोक्यात असते ह्याची दोन कारणे म्हणजे त्या स्थानिक झोपडपट्टीजवळ उद्योगधदा असेल आणि जवळून मुख्य महामार्ग जात असेल तर पर्यायाने वातावरणात जास्त वायु-प्रदूषण निर्माण होते. हे दोन घटक प्रदूषण वाढवायला कारणीभूत आहेत.

६. सोडियम डाय-ऑक्साइड ( $SO_2$ ) मुबई शहरात प्रत्येक उबऱ्यामागे अगदी कमी प्रमाणात म्हणजे ५०. यू. जी. पेक्षा कमी आहे आज आपल्याला गरज आहे ती रासायनिक, औद्योगिक आणि वाहनावाटे बाहेर पडणाऱ्या अतोनात प्रदूषित धुराला-वायू-द्रवाला आवर घालण्याची, मर्यादित कक्षेत आणण्याची. याचा समाजाने प्रामाणिकपणे विचार-प्रयत्न करायला हवा.

७ आपण ज्या स्थानिक बाजारातून भाजीपाला-फळे घेतो तेथे आजूबाजूला स्वच्छता राखली पाहिजे. तसेच पदार्थ हाताळताना, पाण्यातून गाळून घ्यावेत. तसाच स्वच्छ वापर घरी केला तर आपले आरोग्य विशेषत: शहरातील रहिवाशाचे आरोग्य सुधारायला मदत होईल.

८. आज मुबई शहरातील सर्व अन्न-धान्य-भाजीपाला-बाजार सर्वसाधारणत घाऊक विक्रीने केली जातो. त्यामुळेच कदाचित स्थानिक जनतेच्या मनात प्रदूषित विरोधी मोहीम उघडण्याविषयी लोकप्रिय एकजूट होत नाही.

९. हलक्या वाहनमार्गासाठी ( उदा स्कूटर वगैरे ) वाहतूक नियत्रण कक्षेने तत्कालीन दुसरी योजना उभारली पाहिजे. तसेच उडत्या पुलाचीही वेगळी योजना असावी की, जिचा संबध वाहतूक-सकेताशी येऊ नये आणि त्या योजनेत उडते पूल स्थानिक बिल्डिंगपासून किमान अंतरावर असावेत. जड वाहतूक-यत्रणा वेगळी आणि थोडा वेळ थांबवावी. जेव्हा हलक्या वाहनाची वाहतूक चालू असेल.

१०. ह्या शहरात इधनाचे बर्नर घरगुती गॅससाठी फार कार्यक्षम असून त्याचा निश्चित उपयोग व्हावा. कनिष्ठ दर्जाच्या इंधनाला पेटवण्यासाठी शहरात उद्योगासाठी वा घरगुती वापरासाठी परवानगी देऊ नये.

११. स्वच्छता आणि घाणेरड्या नाल्याचा योग्य निचरा ह्याची उपनगराला फार गरज असून त्यामुळे शहरातील आरोग्य सुधारेल. अती-गर्दीचा विभाग असेल तेथे स्वच्छता राखणे अत्यत आवश्यक आहे

१२. रासायनिक उपयोग आणि भरवस्तीतील रहिवाशी याचा नेहमी जवळचा सबध घातक आहे. जेथे प्रदूषित वायूची दिशा असेल तो विभाग त्वरित आरोग्यघातक होतो.

१२. जेव्हा विशिष्ट प्रदूषणाचा स्फोट होऊन समकेंद्री दोष वारवार घडवून येतो तेव्हा कामगारांच्या आरोग्याकडे किंवा रासायनिक उद्योगधद्यात अत्यत बारकाईने पाहणे अत्यत आवश्यक आहे. चागल्या यंत्रातील अडथळे शोधून काढणे.

१४. योग्य आहाराअभावी जास्त प्रदूषण हे विकाराशी सबंधीत असून त्यामुळे प्रदूषणाचा आलेख मानवी आरोग्याशी व्यस्त आहे ही परिस्थिती सुधारण्यासाठी योग्य आहार प्रत्येकाला मिळेल अशी समतोल योजना आखून यथायोग्य आहार तरुण मुले व गरोदर स्त्रिया याना तुटपुजा न मिळता कसा परिपूर्णपणे मिळेल हे पाहण्याची गरज आहे.

१५. श्वासोच्छ्वासाच्या रोगाने (फेफरे वगैरे) मरणारे उल्लेखनीयरीत्या तरुणवयाचेच असतात आणि घशाच्या रोगाने मरणारे

वृद्ध वयाचे असतात. ह्या उभय प्रश्नांचा बीमोड करण्यासाठी अतिशय दाट वस्तीतील रस्त्यातील प्रदूषण, प्रति–धूम्रपान आणि प्रति–धूरमोहीम काढून त्यांच्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे.

१६. काळजीपूर्वक चौकशी आणि उपचार होणे ह्याची मुंबईतील विभागांना फार गरज आहे ह्या प्रदूषणाविरुद्ध लढण्यासाठी बळकटी आणून विस्तृत सार्वजनिक श्वासोच्छ्वासाच्या विकारावर मात करता येईल. त्वरित चौकशी आणि उत्तम व्यवस्थापन शहरवासीयांना अल्प किंमतीत सेवा उपलब्ध करून देऊ शकतील व प्रशासन त्यांची जास्त काळपर्यंत सेवा करू शकेल. कारण तेव्हा प्रदूषणनिर्मूलनाने त्या रुग्णांच्या संख्येत बरीच घट झालेली असेल.

१७. प्रदूषणाविरुद्ध मोहिमेत क्रियाशील रोग्यांनी घशाचे आणि श्वासोच्छ्वासाच्या पीडितांना नियमित वैद्यकीय उपचार घेण्याविषयी मनोधैर्य बळकटी आणणे अत्यावश्यक असून त्यांनी हे मान्य केलं पाहिजे की, हे कार्य दीर्घकालीन पण समाजउपयोगी असून ह्या कार्यान्वये सामाजिक असमर्थता कमी करायचा प्रयत्न केला पाहिजे.

१८. जर हवा, पाणी आणि अन्नामध्ये अस्वच्छतेचा भाग हा जास्त असेल तर शहरवासी रोग्यांचे आरोग्य खालावणार म्हणूनच त्याला प्रतिबंध करण्यासाठी उच्च वैचारिक समृद्धता समाजाने स्वीकारणे अत्यावश्यक आहे.

१९. वायु–प्रदूषणावर सातत्याने प्रायोगिक,बारकाईने आणि वैद्यकीय विकाराबाबत संशोधन होणे अत्यावश्यक आहे. वैद्यकीय विकारांचे संबंध वातावरणीय प्रदूषणाशी असून त्याचा उपयोग हा त्याच्या मूल्यमापन बदलाने त्याच्याकडे कानाडोळा करण्याची प्रवृत्ती–दिशा बदलून आणि म्हणूनच मोहिमेचे महत्त्व वाढवून केला पाहिजे योग्य मापन प्रदूषण प्रश्नाबाबत वारंवार घेतले पाहिजे.

२०. आधुनिक औद्योगिक यंत्रसामुग्रीचा उपयोग हा वायू प्रदूषणाचे विघटन ( संपुष्टात ) आणण्यासाठी व्हावा.

२१. प्रदूषणाचे नियंत्रण मापन हे या शहरात सहकार्याच्या क्रियेने संपूर्ण मुंबईत तसेच पुणे, औरंगाबाद, नागपूर इ. शहरात एकत्र घडवून आणणे अत्यावश्यक आहे. नव्हे ही काळाची गरज आहे. □

**पुस्तके**

# साता उत्तराची कहाणी काही विचार

**‘सा**ता उत्तराची कहाणी’ या पुस्तकाचे परीक्षण करताना श्री. गोविंद तळवळकरांनी असा एक आक्षेप घेतला की, भारतातील हिंदु-मुस्लिम प्रश्नासंबंधी श्री. अच्युतराव पटवर्धन व श्री. अशोक मेहता यांनी आपल्या ‘कम्यूनल ट्रँगल’ मध्ये जो सिद्धांत मांडला होता, त्याचाच प्रधानांनी या पुस्तकात पुनरुच्चार केला आहे. ( महाराष्ट्र टाइम्स’ ४ ऑक्टोबर १९८१) वास्तविक स्वतः अच्युतरावांनीच नंतर आपला पूर्वीचा सिद्धांत चुकीचा होता हे मान्य केले असताना त्याची पुनरावृत्ती प्रधानांनी का करावी. हा तळवळकरांचा आक्षेप होता. नंतर भाई वैद्यांनी या टीकेला उत्तर देताना म्हटले की, या पुस्तकातील काल्पनिक व्यक्ती प्रत्यक्ष घटना घडल्या त्या काळात वावरत आहेत, अशी कल्पना करून हे पुस्तक लिहिले असल्यामुळे अच्युतरावांचा नंतरचा विचार या पुस्तकात व्यक्त होणे शक्य नव्हते. (महा. टाइम्स, १ नोव्हेंबर १९८१)

तळवलकरांचा आक्षेप आणि भाई वैद्यांचे स्पष्टीकरण यातूनच या पुस्तकाच्या मर्यादा स्पष्ट होतात. देशाच्या राजकीय जीवनात गुंतलेले–नव्हे गुरफटलेले–काही मित्र निरनिराळ्या पक्षांचे सक्रिय कार्यकर्ते होतात. त्यांपैकी एक जण जागरूक; पण अपक्ष असा राहतो. हे मित्र मधून-मधून भेटतात, बोलतात, चिंतन आणि चर्चा करतात. १९४२ पासून भारतातील बहुतेक आंदोलनात ते सक्रिय भाग घेतात. त्यांच्या या सहजीवनातून आणि सहचिंतनातून १९४२ पासून १९८० पर्यंतच्या राजकीय घडामोडींचा पट उकलून दाखवण्याचा प्रधानांनी येथे प्रयत्न केला आहे. त्यासाठी त्यांनी या सहा पात्रांचे संवाद, रोजनिशी आणि पत्रे– अशा तीन माध्यमांचा मुख्यतः वापर केला आहे. ‘हा राजकीय इतिहास नव्हे; ही आहेत कार्यकर्त्यांच्या मनातील आंदोलने’ असे सुरुवातीलाच ते सांगून मोकळे होतात. हा इतिहास नाही हे स्पष्ट केल्यामुळे, या पुस्तकातील घटनांकडे ऐतिहासिक न्यायनिष्ठुरतेने पहाणे योग्य होणार नाही, असे त्यांना सुचवायचे असावे असे मानता येईल.

कार्यकर्त्यांच्या मनातील आंदोलने व्यक्त करणे एवढा मर्यादित हेतू असल्यामुळे प्रधानांना राजकीय लिखाणाच्या नेहमीच्या पद्धतीपेक्षा वेगळा फॉर्म वापरणे शक्य झाले. ‘वामन मल्हारांनी रागिणी कादंबरीत ज्याप्रमाणे काव्यशास्त्रविनोद आणला आहे, त्याप्रमाणे राजकारणातील विविध विचार व समस्या यांची चर्चा करावी’ ही प्रधानांच्या लेखनाची बैठक आहे. या फॉर्मला अनुसरून आणि रागिणीचा बराचसा मागोवा घेऊनच त्यांनी निरनिराळ्या पक्षांच्या कार्यकर्त्यांची पात्रे तयार केली. त्यामुळे रूढ अर्थाने ही कादंबरी नसली तरी कादंबरीसारखे वातावरण आणि विवरण करणे आवश्यक, नव्हे अपरिहार्य झाले.

काव्यशास्त्रविनोदाच्या विवेचनाला योग्य ठरलेला हा ‘रागिणी फॉर्म’ राजकीय विचारांचा वा समस्यांचा परामर्श घेताना योग्य वाटतो का? की उलट त्या फॉर्ममुळेच ‘राजकीय विचारांची व समस्यांची चर्चा करणे’ हा जो प्रधानांचा हेतू होता, तो साधणेच कठीण होऊन बसते?

काव्यशास्त्रावरील विचार आणि ज्यामधून इतिहास निर्माण झाला आहे, अशा राजकीय प्रश्नांवरील विचार यांच्या स्वरूपात महत्त्वाचा फरक आहे. काव्यशास्त्रावरील ५० वर्षांपूर्वी व्यक्त केलेले विचार आज वाचले तरी त्यामुळे असे वाटत नाही की, गेल्या पन्नास वर्षांत या विषयासंबंधी जी प्रगती झाली तिच्याशी हे विचार सुसंबद्ध आहेत आणि म्हणून आजच्या संदर्भात ते काल-

विसंगत आणि निरुपयोगी झालेले आहेत. राजकीय प्रश्नाच्या बाबतीत असं नसतं. प्रत्यक्ष घटना घडतात, तेव्हा सारासार सोडाच; पण कधीकधी कोणताच विचार कार्यकर्त्याच्या मनात नसतो. चळवळीचा वेग इतका प्रचंड असतो की, संवेदनाशील कार्यकर्ता त्यात गुरफटला जातो, बुडून जातो. एखाद्या कार्यकर्त्याने डायरी लिहायची ठरवली तरी, 'आज असे घडले' याव्यतिरिक्त त्या दिवसातील घटनांच्या आगेमागे जाणे त्याला शक्य नसते. चळवळ अधिक पुढे कशी रेटता येईल, हाच त्याच्यापुढील मुख्य प्रश्न असतो. सामान्यतः असे म्हणता येईल की, कार्यकर्त्यांच्या मनातील जे विचारमंथन प्रधानांना अभिप्रेत आहे ते समकालीन नसतेच. घटना घडल्यानंतर आणि चळवळीची 'नशा' उतरल्यानंतर थोडे मागे वळून पहाताना कार्यकर्त्यांच्या मनात खरे वादळ सुरू होते आणि चळवळीचा 'इतिहास' होऊ लागतो, तेव्हाच त्यासंबंधी सारासारविवेक करता येतो.

पण 'त्या त्या काळातील पाने एकमेकांशी चर्चा करीत आहेत' हा कथनाचा फॉर्म्युला ठरल्यामुळे, त्या काळातील घटनांविषयी अनेकांच्या मनाला सतावणारे प्रश्न प्रधानांना डावलणेच भाग पडले आहे. १९४२ ते १९८० हा काळ अनेकांनी पाहिला आहे काहींनी अनुभवला आहे. या काळातील घडामोडींशी आणि चळवळींशी समरस झालेलेही बरेच असतील. किंबहुना या काळाचे संस्कार ज्याच्या मनावर या ना त्या स्वरूपात उमटले नाहीत असा माणूस 'ब्रीद्स् देअर?' म्हणून शोधावा लागेल. म्हणूनच या काळातील घटनांकडे ऐतिहासिक, त्रयस्थ दृष्टीने पहाण्याचा प्रयत्न करणे हे माझ्यासारख्याला नेहमीच एक सुखद आव्हान वाटते.

## समाजवादाला झुकते माप

राजकीय प्रश्नांची गणितासारखी निश्चित उत्तरे नसतातच, पण तरीही त्यांचा वस्तुनिष्ठ परामर्श घेण्याचा प्रयत्न सतत होत असतोच. या सर्व चळवळीत बुडून गेलेल्या पण तरीही दृष्टी स्वच्छ असलेल्या प्रधानासारख्यांना तर असा परामर्श घेणं अधिक सुलभ होते. प्रधानांच्या पुस्तकाने माझा थोडा अपेक्षाभंग झाला तो त्या पुस्तकात कोणत्याच प्रश्नाचा ऐतिहासिक, वस्तुनिष्ठ परामर्श नसल्यामुळेच. बेचाळीसचा लढा तयारीशिवाय सुरू झाला याव्यतिरिक्त या लढ्याचे मोजमाप इथे होऊच शकत नाही. नंतर उपलब्ध झालेल्या 'ट्रॅन्स्फर ऑफ पॉवर' किंवा 'पटेल–नेहरू पत्रव्यवहार' यासारख्या अनेकविध साधनांतून या लढ्याचे अधिक सम्यक् आणि वस्तुनिष्ठ मूल्यमापन करणे शक्य होते. 'करेंगे या मरेंगे' अशा जबरदस्त घोषणा करणारांनी या लढ्याच्या स्वरूपाची काहीच योजना आखली नव्हती असे खरोखर घडले होते काय? गुप्तता आणि घातपात या मार्गाने पण काँग्रेसच्या नावावर चळवळ चालवण्याचा जो निर्णय मुख्यतः समाजवाद्यांनी घेतला, त्यात तत्कालीन काँग्रेसचा इतिहास आणि तत्त्वनिष्ठा यांच्याशी प्रतारणा झाली होती काय? 'पुढारी तुरुंगात गेल्यास तुम्हाला योग्य वाटेल त्या मार्गाने प्रतिकार करा' या महात्माजींच्या आदेशाचे केवळ शाब्दिक पालन करूनच चळवळीचा आराखडा तयार केला गेला होता काय? किंबहुना रेल्वे, पोस्ट वगैरे सार्वजनिक मालमत्तेचा विनाश आणि स्वातंत्र्यचळवळ यांचा कुठे सरळसरळ संबंध येत होता काय? सविनय कायदेभंगाचे आणि सत्याग्रहाचे जे तंत्र वीस-बावीस वर्षांत या देशात विकसित झाले होते, त्याचा त्याग करण्यापूर्वी यासंबंधी संपूर्ण विचार चळवळीच्या पुरस्कर्त्यांनी केला होता काय? ज्याची उत्तरे प्रधानांसारख्यांकडून अपेक्षित होती, असे यासारखे किती तरी प्रश्न आहेत; पण त्यांनी स्वीकारलेल्या 'रागिणीपद्धती' मुळे या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा ते प्रयत्नही करू शकत नाहीत. हीच अडचण नंतरच्या जवळजवळ सर्व विवरणात आहे. गोव्याच्या सत्याग्रहाचे, विशेषत. तेथील रानटी सत्तेने केलेल्या सत्याग्रह्यांच्या छळाचे खूप वर्णन प्रधानांनी केले आहे; पण जे सत्याग्रहाचे तंत्र कायद्याचे राज्य असलेल्या ब्रिटिश सत्तेपुढे काही प्रमाणात यशस्वी झाले तेच रानटी पोर्तुगीज सत्तेपुढे अयशस्वी होते यामध्ये सत्याग्रही–शास्त्राच्या मर्यादा व्यक्त होतात काय? आणि तसे असेल तर सत्याग्रहाचे सामर्थ्य कोणते आणि किती?...... महाराष्ट्रावरील अन्याय दूर करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाली, पण त्या वेळी एकत्र आलेल्या पक्षांनी आपल्या स्वतंत्र चुली कायम ठेवल्या. त्यामुळे समिती बरखास्त झाल्यावरही राजकीय पक्षांच्या वाढीवर विपरीत परिणाम झाला नाही. हे सर्व दिसत असूनही १९७७ साली केवळ इंदिरा गांधींना विरोध करण्यासाठी सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी आपल्या स्वतंत्र राजकीय संघटना बरखास्त करून नवाच राजकीय पक्ष काढण्यात काही चूक केली काय? प्रबळ पक्ष–बांधणीसाठी लागणारी शक्ती आणि तपश्चर्या तर नाही; पण इंदिराजींना तर विरोध करायला हवा, म्हणूनच पक्ष एकत्र आले काय? ज्या पक्षांच्या तत्त्वनिष्ठेमध्ये आणि ध्येयामध्ये मूलभूत भेद आहेत (असे ते पक्षच ओरडून ओरडून सांगत होते) त्यांनी अशा रीतीने पक्ष विसर्जित करून, 'आपण सारे एकच आहोत' असे दाखवणे हा राजकीय अप्रामाणिकपणा होता काय? किंबहुना अनेक पक्ष एकत्र करून राजकीय बळ निर्माण करण्याचा 'शॉर्टकट्' समाजवाद्यांनी १९३८ पासून शोधला, त्याचाच जनतापक्ष हा मोठा प्रयोग होता काय? आणि हा प्रयोग नंतरच्या पक्षाघाताला कितपत जबाबदार आहे? असे अनेक प्रश्न अनेकांना सतावीत असतील, पण प्रधानांच्या रागिणी–फॉर्ममुळे या पुस्तकात पात्रांच्या हालचाली, चहापाणी, सभाबैठका, प्रियाराधने वगैरे साऱ्या घटनांची रेलचेल असूनही अशा खऱ्या प्रश्नांची उत्तरे मात्र त्यात सापडत नाहीत.

प्रधानांनी जो फॉर्म स्वीकारला आहे त्यामुळे आणखी एक प्रश्न निर्माण होतो. निरनिराळ्या प्रश्नांवर खानोलकर, एम. आर. वगैरे त्या त्या पक्षाचे प्रतिनिधी आपले म्हणजे आपल्या पक्षाचे विचार व्यक्त करतात. या विचारांना जिवंतपणा आणण्यासाठी आणि घटनांमध्ये सत्याचा आभास निर्माण करण्यासाठी घटना–काळात प्रत्यक्ष झालेल्या बैठका किंवा एस्. एम., गोरे, कर्णिक, पां. वा. गाडगीळ, आचार्य जावडेकर वगैरेंच्या भाषणातील उतारे पुस्तकात दिले आहेत. म्हटल्यास सत्य, म्हटल्यास असत्य असा हा प्रकार आहे सत्य सांगण्याचा प्रयत्न आहे; पण त्यामधील खरेपणाविषयी कोणी आक्षेप घेतल्यास, 'अहो, ते सारे कादंबरीतले होते' असे सांगून मोकळे होण्याची मुभा

लेखकाने ठेवली आहे; पण त्यामुळे, कम्युनिस्टाना उद्देशून खानोलकरने मधूनमधून वापरलेला शब्द योजून बोलायचे तर, थोडी लबाडी होते. *प्रधान स्वत: एका पक्षाचे कार्यकर्ते आहेत.* स्वाभाविकच त्या पक्षातील अंतस्थ वादविवाद, चर्चा त्याना जितक्या अवगत असतील तितक्या इतर पक्षाच्या नसणार हे उघड आहे, पण इथे दाखवले आहे ते असे की, जणू सर्व पक्षातील धालमेली आणि घडामोडी ते त्रयस्थ दृष्टीने पहात आहेत. *प्रत्यक्ष मात्र समाजवादी* पक्षाला झुकते माप पडले आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळचे विवरण या दृष्टीने पहाण्यासारखे आहे. सर्वच राजकीय पक्षात समितीविषयी काय धोरण असावे या प्रश्नाची त्या काळात चर्चा झाली होती. त्या वेळच्या वर्तमानपत्रांतही ही चर्चा कमी–अधिक प्रमाणात *प्रतिबिंबित झाली होती;* पण समाजवादी पक्षीयांच्या बैठकीतील चर्चा प्रधान तपशिलासह सागू शकले तशी – निदान त्या प्रमाणात – इतराच्या बैठकीतील सागू शकले नाहीत. एस्. एम्‌ना ओझरत्या बैठकीत नारायणराव गोऱ्यानी सावरून धरले तसे इतर पक्षांतही झाले असेलच

### क्रांतिकारक प्रयत्न

हा रागिणी–फॉर्म प्रधानानी स्वीकारला नसता तर वस्तुनिष्ठ पद्धतीने ते चळवळींकडे पाहू शकले असते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे सुभाषबाबूंच्या भारताबाहेरील प्रयत्नावर खानोलकरने लिहिलेले १७ जाने. १९४६ चे पत्र. *या* पत्रातील सुरुवातीचे 'प्रिय मित्र', अखेरचे 'तुझा दोस्त' व 'तुला आठवत असेल की, दुसऱ्या महायुद्धातील पंडितजीची भूमिका अँटी–फॅसिस्ट होती' अशासारख्या वाक्यांतील 'तुला आठवत असेल की' वगैरे शब्द गाळले तर हा पत्राचा फॉर्म निघून जातो आणि देशाबाहेर *स्वातंत्र्याचा उठाव* करणाऱ्या सुभाषबाबूंच्या प्रयत्नांचे मूल्यमापन करणारा एक निबंध असे या पत्राचे स्वरूप रहाते. सुभाषबाबूंची देशाबाहेरील चळवळ सपुष्टात आल्यानतरचे हे पत्र आहे अशी कल्पना करून ते लिहिले गेले असल्यामुळे एका दृष्टीने ते 'तत्कालीन' नव्हेच. त्यामुळे ऐतिहासिक दृष्टीने या प्रयत्नांचे मूल्यमापन प्रधानाना करता आले. या पत्रातील विचारावर आक्षेप घेता येतील; पण नतरच्या घटनांमुळे या पत्रातील निष्कर्षात फारसा बदल करावा लागणार नाही. म्हणूनच *वाटत की, प्रधानानी रागिणीचा फॉर्म न* स्वीकारता, १९८१ सालीच जुन्या घटनाकडे पहायचे ठरवले असते तर सुभाषबाबूंच्या चळवळीप्रमाणे इतर अनेक चळवळीकडे ते अधिक नि.पक्षपाती, वस्तुनिष्ठ व ऐतिहासिक दृष्टीने पाहू शकले असते. कादंबरीचा फॉर्म न स्वीकारताही अशा प्रकारचे लिखाण चटकदार *करणे कठीण नसावे.* ट्रॉट्स्कीने रशियन क्रांतीविषयी लिहिताना किंवा नेहरूंनी आत्मवृत्तात भारतातील घटनांविषयी लिहिताना प्रसंग किती जिवत आणि बोलके केले आहेत ते पहावे म्हणजे झाले.

असेही म्हणता येईल की, कादंबरीचा फॉर्म स्वीकारल्यामुळे प्रधानाना, एरव्ही *ज्याचा सबंध नाही आणि ज्या टाळल्यामुळेच* चळवळीची वर्णने अधिक जिवत झाली असती, अशा अनेक गोष्टी पुस्तकात घुसडून, पुस्तकाचा आकार आणि (फापट) पसारा उगीच वाढवावा लागला आहे. प्रेक्षक समोर ठेवून बोलपट तयार करतात, त्याप्रमाणे वाचक समोर ठेवून अशा प्रकारचे लिखाण करावे असे मानणे बरोबर नाही हे खरे; पण तरीही कळत–न कळत वाचक डोळ्यासमोर असतोच. *कादबरीचा वाचक निराळा, या* पुस्तकाचा निराळा. किंबहुना तोच वाचक कादबरी वाचताना ज्या प्रकारच्या लेखनाची अपेक्षा करतो, त्यापेक्षा येथे अपेक्षा निराळी असते. त्यामुळे पाल्हाळ–वर्णने, चहापाणी, प्रियाराधने, किनाऱ्यावरील कूजने वगैरे गोष्टी कादबरीत योग्य असल्या आणि राज*कारणाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या* फडक्याच्या कादंबरीत त्या आवश्यकही वाटल्या, तरी राजकीय प्रश्नाची चर्चा करण्याच्या हेतूने लिहिलेल्या पुस्तकात त्या चपखल बसत नाहीत. (असं वाटणे हा 'नसता सोवळेपणा' नसावा.) येथे वाचकाला हवी असते ती त्या त्या चळवळीमागील प्रेरणा, पार्श्वभूमी, *विचारसंघर्ष, डावपेच, फलश्रुती– आणि या* साऱ्या गोष्टीचे नि.पक्षपाती, वस्तुनिष्ठ पृथक्करण. प्रधानाना ते *'अधिक चागल्या* रीतीने करता आले असते असे जरूर वाटते.

स्वातंत्र्य–संग्रामाविषयी किंवा त्यानंतरच्या चळवळीविषयी आणि सघर्षाविषयी आजवर जे लेखन झाले, त्यापेक्षा प्रधानांचे लेखन निराळ्या पद्धतीचे आणि वेगळ्या घाटाचे आहे आजवरचे लेखन हे प्राय: '*घटनाची जत्री' अशासारखे होते. किंबहुना* राजकीय लिखाण हे शुष्क, न समजण्यासारखे, आंबट आणि सुतकी चेहऱ्यामोहऱ्याचे असावे अशीच कल्पना रूढ झाली आहे. 'सुलभ समाजवाद' नावाचा एक अतिबिकट केलेला 'वाद' सेवादलाच्या बौद्धिकात आणि स्टडी सर्कलमध्ये आमच्या *डोक्यात ठेचून ठेचून भरण्याचा प्रयत्न* एका काळी केला जात असे शास्त्रीय लिखाणसुद्धा रोचक करता येते हे आम्हाला मान्य नव्हते असेच त्या वेळी वाटे. सरळ समजण्यासारख्या गोष्टी बिकट केल्या की, ते राजकीय लिखाण होते ही धारणा. या दृष्टीने प्रधानाचा प्रयत्न क्रांतिकारकच म्हणायला हवा. प्रधानानीच यासबंधी आपले विचार, एका पात्राविषयी लिहिताना, पुढील शब्दात व्यक्त केले आहेत– 'तो फिझिक्सचा विद्यार्थी होता आणि त्याला नेहमी वाटे की, राजकीय विषयावरील लेखनात अनेकदा अकारण शब्दबंबाळ असते. त्याला असेही वाटे विचारप्रधान लेखनात काही लेखक साहित्यिक शैली आणतात तेही बरोबर नाही. गणितात ज्याप्रमाणे तर्कशुद्धता व रेखीव बाधणी असते त्याचप्रमाणे विचारप्रधान *आर्थिक* वा राजकीय *विवेचनात* ती असायला हवी.' पण तर्कशुद्ध व वस्तुनिष्ठ लेखन रेखीव असूनही रोचक असू शकते आणि साहित्यिक शैलीचे लेखन रेखीवपणा नसल्यामुळे पुष्कळ वेळा पसरट आणि भोगळ बनते म्हणून वस्तुनिष्ठ, ऐतिहासिक आणि साधार लिहूनही रोचक लिहिणे हे राजकीय *किंवा शास्त्रीय वाङमयाच्या निकोप वाढीच्या* दृष्टीने महत्त्वाचे आहे. लेखनातील लालित्य आणि रोचकपणा न सोडताही प्रधान असे रेखीव व तर्कशुद्ध लिहू शकतील याचे अनेक पुरावे या पुस्तकात ठायी ठायी सापडू शकतील.

–प्र. वि. साखळकर

*साता उत्तराची कहाणी*
मौज प्रकाशन, मुबई
पृष्ठे : ४९५ + १२
किमत : पचाहत्तर रुपये.

रंगभूमी

## 'सौरभ' निर्मित नवे नाटक

# 'सॉरी गॉडफादर'

वि. भा. देशपांडे

'सौरभ' ही पुण्यात निघालेली नवीन व्यावसायिक नाट्यसंस्था. सदानंद चादेकर हे या संस्थेचे निर्माते आहेत. या संस्थेने नुकतेच 'सॉरी, गॉडफादर' हे नवे नाटक रंगमंचावर पेश केले आहे. सुहास शिरवळकर यांच्या कादंबरीवरून त्याच नावाने हृषिकेश पराजपे यांनी नाट्यरूपांतर केलेले आहे. नाटकाचे दिग्दर्शक आहेत अयुबखान.

'सॉरी, गॉडफादर' या नावावरून अनेक कल्पना आपल्या मनात तरळून जातात, त्याचबरोबर अपेक्षाही निर्माण होतात. नावाच्या वेगळेपणाप्रमाणेच विषयाचेही वेगळेपण या नाटकाच्या संदर्भात आहे. एक शास्त्रज्ञ ( मार्लन ) आपल्या खास संशोधनासाठी गावापासून खूप दूर अशा ठिकाणी एका बंगल्यात संशोधनासाठी आलेला आहे. घरात दोन नोकर आहेत. एक लंकी आणि दुसरा नागा. हे दोघेही स्थानिक रहिवासी आहेत. शास्त्रज्ञाबरोबर त्याचा मित्र डॉ. नरेन श्रीवास्तव हा खास संशोधननिरीक्षणासाठी, प्रयोगसाह्यासाठी आलेला आहे. या सर्वांच्या साथीला रीमा नावाची तरुणी, एक पोलीसइन्स्पेक्टर, एक फादर ( सिडने ) ही मंडळी आहेत.

मृत माणसाला जिवंत कसा करता येईल आणि त्याला पुन्हा आयुष्य जगता येईल अशा विश्वासाने डॉ. मार्लन हा शास्त्रज्ञ एका माकडावर प्रयोग करतो आहे तो प्रयोग यशस्वी झाला तर काय काय होईल याचे चित्र मनोमन रंगवतो आहे. हा प्रयोग सिद्ध होत असताना जी गुतागुंत होते त्यावर नाट्यकथानकाचा पसारा उभारलेला आहे मराठी नाटकाच्या संदर्भात बोलायचे तर हा विषय वेगळा, नवा आणि आव्हानात्मक आहे. याचा अर्थ शास्त्रीय विषयावरचे हे पहिलेच नाटक आहे असा नव्हे, पण शास्त्र, शास्त्रज्ञ, संशोधन-प्रयोग याना मध्यवर्ती धरून नाट्यलेखन होण्याचे प्रमाण तुरळक आहे. तुलनेने मराठी कथा आणि कादंबरी क्षेत्रात असे लेखन मोठ्या प्रमाणात होऊ पाहते आहे. त्या दृष्टीने अशा विषयावरच्या नाटकांचे स्वागतच झाले पाहिजे. प्रस्थापित रंगभूमीत मळलेल्या वाटेने जाणाऱ्या लेखकापेक्षा असे वेगळे प्रयत्न लक्षवेधी ठरतात, 'जसे डोंगर म्हातारा झाला' या नाटकाच्या संबंधात सागता येईल !

परंतु नाटकाचा विषय वेगळा असून तेवढ्याने भागत नाही. त्या विषयाचा विस्तार, त्याची मांडणी, त्यासाठी निर्माण केलेल्या व्यक्तिरेखा आदी अनेक गोष्टींचा विचार त्यामध्ये अंतर्भूत आहे. त्या दृष्टीने या नाटकात अनेक दोषस्थले आहेत. त्याचा दोन प्रकारांनी विचार करता येईल. एक म्हणजे नाट्यविषयाची मांडणी आणि दुसरे म्हणजे सादरीकरण. नाट्यमांडणी किंवा नाट्यरचना करताना लेखकाने नाटक मूळ विषयापासून दूर जाते आहे, त्यातला केंद्रबिंदू ढळतो आहे किंवा मध्यवर्ती लक्ष्य धूसर होते आहे याचे जेवढे भान राखायला हवे होते तेवढे राखलेले दिसत नाही. एखाद्या शास्त्रज्ञाने संकल्पिलेला प्रयोग जेव्हा चालू आहे किंवा निर्णयाप्रत येतो तेव्हा त्यातल्या गुतागुंती वाढत जाणार हे उघडच आहे. त्यातही हा प्रयोग असा की, निसर्गनियमाना सजीवतेला आव्हान देणारा आहे. ती गुतागुंत दाखवताना पहिल्या अंकात जे काही वातावरण निर्माण झाले आहे त्याला दुसऱ्या अंकात आणि नंतरही काही प्रमाणात रहस्यमय खूनकथेचे रूप आलेले आहे त्यामुळे ही कथा शास्त्रीय प्रयोगाची की तो प्रयोग करणाऱ्या शास्त्रज्ञाची ? कदाचित ती दोघांचीही असे उत्तर नाटककार देईल; पण मग प्रत्यक्षात तसे भावले नाही.

ही नाट्यकथा न भावण्याचे कारण दर्शनापेक्षा कथन, निवेदन, स्पष्टीकरण यांचे प्रमाण या नाटकात मोठे आहे. असे का घडले असेल त्याचा शोध घेतला तर सहज ध्यानात येईल की, कादंबरीवरून जेव्हा नाट्यरूपांतर केले जाते तेव्हा जे दोष अनेकदा संभवतात ते याही ठिकाणी आहेत. पहिल्या आणि तिसऱ्या अंकात ते विशेषत्वाने जाणवले याचा अर्थ केवळ घटनांची चळत किंवा मालिका सततपणाने नाटकात हवी अशी अपेक्षा नाही. निदान या प्रकारच्या विषयावरच्या नाटकात तर निश्चितच नाही. कारण या जातीच्या नाटकात काही घटना किंवा दृश्यरूप आणि त्याला पूरक मनोविश्लेषणात्मक भाग अभिप्रेत आहे; पण या मनोविश्लेषणाचे प्रमाण किती असावे यालाही सीमा आहेच. ते केवळ शब्दात गुंतून पडले तर रंगभूमी-माध्यमाला त्रासाचे होते. तेच कादंबरी-माध्यमाला सुखाचे असते !

लेखनातले मूळचे दोष ( म्हणजे नाट्यकथेच्या मांडणीतले) काही वेळेला सादरीकरणात झाकले जाण्याची शक्यता असते; पण या ठिकाणी तसेही घडले नाही. एक तर मुख्य व्यक्तिरेखा म्हणून असलेला डॉ मार्लन याच्या भूमिकेत विजय जोशी होता. त्याने जिवापाड अभिनयश्रम करूनही शास्त्रज्ञ म्हणून तो प्रभाव पाडू शकला नाही. केवळ दिसण्याच्या संदर्भात नव्हे तर शास्त्रज्ञ म्हणून जे वजन बोलण्यात, हालचालीत आणि अशा प्रकारच्या संशोधनात व्यग्र असलेल्या शास्त्र-

ज्ञाची प्रतिमा असते ती परिणामकारकरीत्या तो उभी करू शकला नाही ती उणीव चागल्या अर्थाने भरून काढण्याचे काम राहूल सोलापूरकरने केले प्रयोग पाहायला आलेला मित्र, डॉक्टर येथपासून ते त्या प्रयोगाचा बळी होईतोपर्यंत त्याने त्यातल्या अनेक अवस्था तपशिलात दाखवल्या शारीरउची रंगमचावर काही वेळा सोयीची आणि काही वेळेला गैरसोयीची असते तसे राहूलच्या बाबतीत आहे. ते गृहीत धरूनही तो भूमिकेच्या जवळ मोठ्या प्रमाणात राहिला. संपूर्ण नाटकाचा तोल सांभाळण्याचा हा एक भाग झाला. अन्य व्यक्तिरेखामध्ये असलेल्या कलाकाराच्या अभिनयाबद्दल आवर्जून सागण्यासारखे काही नाही. सर्वांत महत्त्वाची गोष्ट या प्रयोगात खटकली असेल तर ती म्हणजे कलाकाराची सवादबोलीची पद्धती, त्यातही आवाज वापरणे, शब्दावर चुकीचे आघात देऊन बोलणे वगैरे. नागाची बोलण्याची पद्धती किंवा त्याचे एकूणच 'बेअरिंग' असे रहस्यमय का होते ते कळले नाही. 'रीमा'चे बोलणे सत्त्वहीन, परिणामी निष्प्रभ होते तर इन्स्पेक्टर झालेले अशोक अवचट फिल्मी पद्धतीचे बोलत होते. फादर सिडने झालेले कमलाकर कर्वे अकारण ऐतिहासिक आवाज लावून आपली बोलण्याची हौस रगभूमीवर भागवून घेत आहेत की काय असे सारखे वाटत होते. यातल्या काहींचे अकारण हसणे, बोलण्यात दीर्घ विराम देणे, अतिरिक्तपणाने रंगमंचीय हालचाली आणि कृती करणे यामुळे काही वेळा गभीर प्रसगी प्रेक्षकातून हास्यनिर्मिती झाली. अशा चुकाचे धनी जसे कलाकार आहेत तसाच दिग्दर्शकही आहे.

नेपथ्याचा दर्शनी भाग आणि वापर (दार सोडल्यास) ठीक होता. पहिल्या काही प्रयोगांत होणाऱ्या चुका (प्रकाश, ध्वनी, पार्श्वशब्द याच्यासह) गृहीत धरून असे सागावेसे वाटते की, व्यावसायिक प्रयोग म्हणून जेव्हा उभे राहायचे तेव्हा इतक्या कच्च्या अवस्थेने येणे निर्मात्याला परवडणारे नाही! यामुळे प्रेक्षकापर्यंत पोहोचणेही होणार नाही! □

### नाट्य—समीक्षक मेळावा १ आणि २ डिसेंबरला

३ आणि ४ नोव्हेंबरला जो नाट्य-समीक्षक मेळावा अॅक्टिव्ह थिएटर्सने आयोजित केलेला होता, तो श्रीमती इंदिरा गांधी याच्या आकस्मिक निधनामुळे पुढे ढकलण्यात आला होता. तो आता १ आणि २ डिसेंबर ८४ ला (शनिवार, रविवार) टिळक स्मारक मंदिर, पुणे या ठिकाणी होणार आहे कार्यक्रम पूर्वी ठरल्याप्रमाणेच होतील. सबंधितानी नोद घ्यावी. □

चित्रपट

## 'अल्बर्ट पिंटो' नंतरचा 'मोहन जोशी....'


# उत्तम विषय, अयोग्य मांडणी

सईद मिर्झा दिग्दर्शित 'मोहन जोशी हाजीर हो' हा चित्रपट मुबईच्या आकाशवाणी ऑडिटोरियममधे गेले काही आठवडे सुरू आहे श्री. सुधीर मिश्रा यांच्या कथेवर श्री युसुफ मेहता आणि श्री. सईद मिर्झा यानी पटकथा रचली आहे. सवादलेखन श्री. रणजित कपूर, श्री. सुधीर मिश्रा आणि श्री. सईद मिर्झा यानी केले आहे.

आजच्या काळातील सर्वसामान्य व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वाचा प्रश्न 'आपले रहाण्याचे घर' हाच या चित्रपटाचा विषय आहे.

नोकरीतून सेवानिवृत्त झालेले गृहस्थ श्री मोहन जोशी (भीष्म सहानी) हे मुबईतील एका चाळीत रहातात. त्याची पत्नी रोहिणी (दीना पाठक), त्याचा मुलगा सुधीर (मोहन गोखले) नोकरीत आहे. त्याची पत्नी आशा (दीप्ति नवल) घरातल्या कामाच्या व्यापात बुडालेली. त्याचा शाळेत जाणारा छोटा मुलगा राहुल. चाळ अगदी पडायला आली आहे. साडपाणी वाटेल तसे वाहते. कचरा जिकडे तिकडे साठलेला आहे. चाळीचा मालक (अमजद खान) दूर अलिशान हवेलीत रहाणारा. चाळीची दुरुस्ती करायला तो राजी नाही. लोक कटाळून निघून जातील चाळ पडली की आपण तेथे उच हवेली उठवू असा चाळीच्या मालकाचा विचार आहे. श्री. मोहन जोशी मालकाविरुद्ध न्यायालयात जाण्याचे ठरवितात; परतु एक करीम सोडून चाळीतल्या इतर बिऱ्हाडांकडून त्यांना प्रतिसाद मिळत नाही. सुधीर आणि आशाही न्यायालयात जाऊन झगडा करू इच्छित नाहीत. तरीही पत्नी रोहिणी आणि करीम याच्या सहकार्याने मोहन जोशी न्यायालयाची पायरी चढतात. वकील मलकानी (नासीरुद्दीन शहा) आणि गोखले मोहन जोशीचा खटला चालवतात. खटला तीन वर्षे चालतो. रोहिणी दागिने विकून पैसे उभे करते. सुरुवातीला विरोध असणारे सुधीर-आशा नतर साथ देतात. न्यायाधीश चाळीची पहाणी करायला येणार असे ठरते. चाळीचा मालक चाळीला वरवरची रंगरगोटी करतो. न्यायाधीश आल्यावर म्हणतात, 'पहाणीसाठी तज्ज्ञ नेमायला पाहिजे.' अर्थात वेळ जाणार. मोहन जोशी बेभानपणे खाब हालवतो. तुळई त्याच्या अंगावर कोसळते. चाळीचा तो भाग धडाधड् कोसळत असताना दुसऱ्या भागाच्या गॅलरीतून न्यायाधिशासकट सगळे नुसते पहात असतात.

चित्रपटाचा विषय वैशिष्ट्यपूर्ण आहे. नेहमीच्या प्रेमकथेपेक्षा हा विषय वेगळा आहेच; पण श्री. विजय तेंडुलकरानी जो वास्तववादी प्रवाह चित्रपटसृष्टीत आणला त्या प्रवाहाचा विचार करताही 'मोहन जोशी हाजीर हो' या चित्रपटाचा विषय लक्षणीय आहे. विजय तेंडुलकराच्या चित्रपटात राजकारण्याच्या भ्रष्टाचाराने ग्रासलेले समाजजीवन प्रामुख्याने येते. त्याची कथा 'कुटुबा' भोवती फारशी रेंगाळत नाही. सईद मिर्झा दिग्दर्शित चित्रपटात 'कुटुब' हाच केंद्रबिंदू असतो. 'अल्बर्ट पिंटोको गुस्सा क्यू आता है?' किंवा 'मोहन जोशी हाजीर हो' या दोन्ही चित्रपटांत कुटुबचित्रे ठळकपणे येतात.



**चाळजीवनातला सर्वात महत्त्वाचा प्रश्न**

कुटुंबांच्या समस्येतून सामाजिक समस्या दिसू लागतात. यामुळे सईद मिर्झा यांचे हे दोन्ही चित्रपट विषयाच्या दृष्टीने सर्वसामान्य व्यक्तिजीवनाच्या अतिशय जवळ येतात.

'मोहन जोशी हाजीर हो' या चित्रपटात दिसणारी चाळ, त्या चाळीतले मोहन जोशींचे कुटुंब अगदी तुमच्याआमच्या नित्य सहवासातले वाटते. मुंबईच्या जीवनातले ताण, धावपळ ह्या कुटुंबातल्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर, नजरेत, हालचालीत आपल्याला जाणवतात. तरुण माणसे अतिशय गडबडीत, धावपळीत. वयस्क माणसे त्यामानाने स्वस्थ. कौटुंबिक संबंधांचे चित्रही अतिशय सुंदर आहे. मोहन जोशींचा मुलगा आणि सून न्यायालयात जाऊन झगडा करू इच्छित नाहीत. तसे ते मोहन जोशींना स्पष्ट सांगतात. त्यांना न सांगताच मोहन जोशी न्यायालयात जातात. सुधीर-आशा नाराज होतात; पण एकदम अद्वातद्वा बोलत नाहीत. नंतर सुधीर-आशा मोहन जोशींच्या न्यायालयाच्या भानगडीत म्हणण्यासारखे लक्ष घालत नाहीत; पण शेजाऱ्यांइतके त्यांच्यावर उलटतही नाहीत. मोहन जोशीवर फार खोटा आरोप होऊ लागताच त्याच्या बाजूने उभे रहातात. शेवटी न्याय मिळविण्यासाठी सुधीर-आशाही इरेला पडतात. या सर्व प्रवासात एकाच घरात मोहन जोशी-रोहिणीचे कुटुंब वेगळे आहे आणि आशा-सुधीरचे कुटुंब वेगळे आहे हेही सतत जाणवत रहाते. आपल्या कुटुंबाचे हे वास्तव चित्र आहे. कोणावर अन्याय होऊ न देता, कोणत्याही व्यक्तिचित्राचे उदात्तीकरण न करता अशा प्रकारचे कुटुंबचित्र रंगविणे कठीण आहे; पण येथे सईद मिर्झा यांना मात्र ते जमलेले दिसते.

## व्यक्ती, प्रसंग अतिरंजित

आपल्या समाजाची एकंदर उदासीन वृत्ती, कोणत्याही प्रकारे विचार न करता प्रवाहपतित अगतिक जगणे, स्वतःची कर्तव्ये सोडाच; पण हक्कांबद्दलही जागरूक नसणे हे सर्व मोहन जोशींच्या चाळीतील शेजाऱ्यांच्या वृत्तीत दिसून येते. वकिलांची बाजारी, सवंग वृत्ती, न्यायदानपद्धतीतील दिरंगाई यांचे चित्रण या चित्रपटात आहे.

वीरेंद्र सयानी यांच्या छायाचित्रणाने दाट लोकवस्तीची, पडायला आलेली अस्वच्छ चाळ अत्यंत परिणामकारकपणे दाखविली आहे. मुंबईतील गगनचुंबी इमारती, झोपडपट्टी यांचे दर्शनही मूळ चाळीच्या विषयाला पूरक आहे.

या जमेच्या बाजू असून, कथानकाच्या विषयाशी, वातावरणाशी प्रेक्षकांची अतिशय जवळीक असूनही हा चित्रपट आपला विषय प्रभावीपणे मांडू शकला नाही.

याला कारणे अनेक आहेत. कथानकाची प्रकृती वास्तववादी, समस्याप्रधान अशी आहे. असे असताना मलकानी आणि गोखले ही पात्रे फार्सिकल कथानकातल्या व्यक्तींच्या शैलीने उभी राहिली आहेत. लालवानी वारला म्हणून या दोघांचे अश्रू गाळणे, मलकानीच्या डोक्यावरचा केसांचा टोप गळून त्याचे टक्कल दिसणे, त्यांच्या एकंदर हालचाली, बडबडणे कथानकाच्या वास्तववादी प्रकृतीशी अत्यंत विसंगत आहे. त्यामुळे चित्रपटाचा तोल ढळतो. चित्रपटाच्या विषयात न्यायालयाचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. 'राहण्याचे घर' या समस्येतील न्यायालयाची भूमिका तिच्या सर्व गुंतागुंतीसह चित्रित होणे आवश्यक होते. तसे झालेले नाही. न्यायदानपद्धतीमुळे मोहन जोशीची कोंडी होते एवढेच प्रेक्षकांना कळते; परंतु त्या कोंडीच्या चित्रणामुळे प्रेक्षकांच्या जाणिवांच्या कक्षा रुंदावत नाहीत. चाळीच्या मालकाच्या भोवताली असलेले दोन प्रमोटर्स तर छबिलदासी नाटकाच्या शैलीने चित्रपटात वावरतात. वास्तववादी कथानकाच्या प्रकृतीशी ते विसंगत आहेतच; पण मलकानी, गोखले या फार्सिकल पात्रांशीही त्यांचा सूर जुळत नाही. त्यांचे पोषाख, एकंदर रूप, वागण्याची पद्धत प्रतीकात्मक भूमिकेच्या प्रकृतीची वाटते. प्रथम ते दगडासारखे निश्चल उभे असतात. नंतर नेहमी अतिशय यांत्रिकपणे हालतात आणि एकसुरी बोलतात. मुंबईमधल्या उंच उंच इमारतींबरोबर

जन्माला आलेल्या बिल्डर–प्रमोटर या नव-जमातीचे दर्शन घडवायचे आहे असे आपल्याला कळते; परतु ते घडत मात्र नाही. चित्रपटाचा तोल यामुळे आणखीनच बिघडतो. इतरही अनेक प्रसंग, व्यक्ती अतिरंजित ढोबळ वाटतात. चाळीचा मालक ठरीव ठशाचा खलनायक वाटतो. मोहन जोशींनी न्यायालयात जाण्याचा निर्णय घेताच त्याच्या नातवाच्या मागे मालकाकडचे गुंड येणे, त्यांनी त्या नातवाला अपघाताने मृत्यू आणण्याची धमकी सूचित करणे हा प्रसग अत्यत ढोबळ आणि भडक वाटतो. मुंबईतला कोणताही धनाढ्य माणूस मोहन जोशी-सारख्या कनिष्ठ मध्यमवर्गीय माणसासाठी सुरुवातीलाच एवढी शक्ती वापरणार नाही. न्यायालयात जाण्यास सहाय्य करायला चाळीतली इतर बिऱ्हाडे तयार नसतात हे सहज पटते; पण ती सगळी एक होऊन येताजाता मोहन जोशीशी उघडउघड भाडतात, टर उडवतात हे पटत नाही. शेवटी न्यायीयाश चाळीत येण्याचे ठरल्यावर चाळकरी एका सुरात मोहन जोशीचे अभिनंदन करू लागतात ते चित्रणही ढोबळ वाटते. चाळमालकाच्या वकिलानी येऊन चाळीची दुरुस्ती कशी करावी यासबधीच्या सूचना देणे खटकते. मोहन जोशीचा धाकटा मुलगा आणि त्याची प्रेयसी ही पात्रे चित्रपटात पूर्णपणे अनावश्यक वाटतात.

एकदरीत पहाता चित्रपटाचा विषय जरी महत्त्वपूर्ण आणि आव्हानात्मक असला तरी त्याची हाताळणी नेहमीच्याच फिल्मी ढोबळ पद्धतीने झालेली दिसते. सामाजिक विषय सईद मिर्झा समर्थपणे माडू शकतात हे त्याच्या 'अल्बर्ट पिंटोको गुस्सा क्यू आता है ?' या चित्रपटाने सिद्ध केले आहे. परतु 'मोहन जोशी हाजिर हो' या चित्रपटाने मात्र आधीच्या चित्रपटामुळे निर्माण झालेल्या अपेक्षाचा भग केला आहे.

'मोहन जोशी हाजीर हो' हे चित्रपटाचे नाव लांबलचक असले तरी योग्य वाटते. वकील, न्यायाधीश, आरोपी कोणी हजर असो-नसो, ते मगरुरीने, निष्काळजीपणे कसेही वागोत पण ज्याला न्याय मिळवायचा आहे त्याने मात्र सदैव 'हाजीर हो' हा हुकूम पाळलाच पाहिजे अशी आपल्या समाजाची आज परिस्थिती आहे, हेच या चित्रपटाच्या नावात अभिप्रेत आहे.

विषय उत्तम असला तरी त्याची माडणी अयोग्य झाल्यामुळे फसलेला असा हा चित्रपट आहे.

—विनया खडपेकर

# शाही रिवाजांना तडा देणारा 'लिट्ल लॉर्ड'

आयुष्यात आपल्याला पावलोपावली निरनिराळ्या स्वभावाची माणस भेटत असतात. व्यक्तीव्यक्तीगणिक मानवी स्वभावाचे निरनिराळे नमुने बघायला मिळतात. कोणी लोण्यासारख मऊ तर कुणी अगदीच तिरसिंगराव ! कुणी मुगी चिरडली म्हणून डोळ्यात पाणी आणणार तर कुणी प्राणीच काय माणसांनाही दयामाया न दाखवणारे करारी–कडक; पण या कडकपणाला जेव्हा हुकुमशाहीचा वास यायला लागतो तेव्हा मात्र हा गुण दुर्गुण ठरतो आणि अशा या हुकुमशाहीचा किंवा कडकपणाचा धुव्वा उडवणारा कोणी ना कोणी महाठकही भेटतोच. मग तो 'घरगंगेच्या काठी' सारख्या कर्तबगार सुनेच्या रूपात भेटतो किंवा 'खूबसूरत' मधल्या अल्लड मंजूच्या रूपात भेटतो. 'लिट्ल लॉर्ड' 'फन्टलरॉय' मधला नातूही आपल्या निष्पाप सहवासानं कडक आजोबांचा एकदम कायापालट करून टाकतो. तेही आजोबाना वठणीवर आणायच आहे किंवा त्यांचा कायापालट करायचा आहे अस डोक्यात धरून किंवा त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करून असही नाही; पण नातवाच्या एकेक कृतीमधून आजोबावर नकळतच परिणाम होत असतो आणि हळूहळू आजोबा चक्क बदलतात.

याच आजोबांनी पूर्वी पोटच्या पोरान अमेरिकन मुलीशी लग्न केल म्हणून त्याच नाव टाकलेलं असतं. कारण अमेरिकन लोकाविषयीची अढी मनात घट्ट रुजलेली. साहजिकच मुलाला क्षमा न करता घरातून हाकलून देतात; पण मुलगा अकालीच मृत्यू पावतो आणि एकुलत्या एक छोट्या मुलासह उघड्यावर आलेली सून हट्टी सासऱ्याच्या आश्रयाला न येता स्वतःच्या पायावर उभी राहते. आयुष्याच्या उतरणीला लागलेल्या आजोबाना एवढ्या अफाट सपत्तीचा वारस कोण याची रुखरुख लागलीय. नातवानं आपल्याकडे याव आणि सगळी सपत्ती रीतसर ताब्यात घ्यावी असं तर वाटतंय; पण हट्टी, हेकेखोर मन 'अमेरिकन' सुनेला स्वीकारायला मात्र तयार नाही. निरोप पाठवून आजोबा एक खडा टाकून पाहतात. सून मोठ्या मनाची. मन घट्ट करून मुलाला आजोबांच्या छायेखाली पाठवते एका अटीवर-आपल्याविषयीची कटु भावना मुलाच्या लक्षात येऊ न देण्याच्या. अट स्वीकारायला आजोबा फारसे तयार नसतात; पण मान्य करतात आणि नातवाची शाही राजवाड्यात रवानगी होते. लिट्ल लॉर्ड हा आतापर्यंत सामान्य वातावरणात वाढलेला आणि एक सामान्य व्यक्ती. अगदी सामान्य वातावरणातून एकदम भपकेबाज वातावरणात गेल्यानतर फक्त स्वप्नात पाहिलेल्या किंवा स्वप्नातल्यापेक्षाही खूप पल्याडच्या अशा या वातावरणाशी जमवून घेताना त्याची जी फटफजिती उडते–त्याचं चित्रण कधी मनोरंजनात्मक पद्धतीनं तर कधी भावनात्मक पद्धतीन करून निर्माण केलेले चित्रपट आले तसे एकदम खूप पैसा हाती आल्यानतर माणसाची बुद्धी कशी वाईट मार्गाला लागते–याचं चित्रण करणारेही चित्रपट आले; पण 'लिट्ल लॉर्ड' इथं थोडासा धक्का देतो. म्हणजे 'लिट्ल लॉर्ड' हा जरी सामान्य वातावरणात वाढलेला, सामान्य कल्पना हाती–पायी मुरलेला असा असला तरी शाही रीतीरिवाजांनी गांगरून किंवा भेदरून न जाता तो अशा आत्मविश्वासानं उभा राहतो की, जसा वर्षानुवर्षे राजघराण्यातील रीतीरिवाजांची तालीम घेतोय. त्याचबरोबर नजरेच्या टप्प्यात श्रीमंतीच श्रीमती येत असूनही श्रीमतीचा अहंकाराचा वळीही होत नाही. उलट या रीतीरिवाजाचं अवडंबर न माजवताही ते कसे आचरणात आणता येईल,

हे त्याच्या निर्व्याज कृतीतून दाखवून देतो. यातूनच शाही राजघराणं व सामान्य जनता यांच्यातील अभेद्य तटबंदीला तडे जात असतात. नातवाला शिकवून आपल्या तालमीत तयार करण्याऐवजी आजोबाच नातवाच्या दृष्टीतून जग नव्यानं पाहायला लागतात. नकळत लहान मुलाच्या उत्साहानं शिकायला लागतात. पायी चालण्यात कमीपणा मानणारे आजोबा जेव्हा पोचे आलेल्या डबड्यांनी नातवाबरोबर खेळायला लागतात, तेव्हा मधली बरीच वर्षं गळून गेल्यासारखी वाटतात. नातवाच्या निरागस प्रश्नांचं निराकरण करण्यात रमून जातात. त्याच्या निर्व्याज बडबडीत हरवून जातात, भल्या मोठ्या राजवाड्याच्या बंदिस्त चौकटीतलं कोंदटलेपण सोडून देऊन मोकळेपणाचा श्वास घेतात. कडक करारी आजोबा बघता-बघता लोण्यासारखे मऊ होतात आणि सुनेचं तोंडही न पाहण्याची प्रतिज्ञा केलेले आजोबा नातवाला ख्रिसमसची भेट देण्यासाठी म्हणून सुनेला राजवाड्याचे दरवाजे खुले करतात.

आजोबा आणि नातू यांच्यातील सूक्ष्म–नाजूक संबंधावर आधारलेला हा चित्रपट तितकाच निर्व्याज–निखळ; पण या निष्पाप आनंदाचा थोडासा सूर निसटतो तो आत्याबाईंच्या प्रकरणामुळं ! खोट्या वारसाचा दावा लावत या आत्याबाई उगवतात आणि आता 'लिटल लॉर्ड' ची संधी हुकली या कल्पनेनं सगळे व्यथित होतात; पण लवकरच या कारस्थानी बाईचा डाव उघडकीस येतो आणि प्रचंड निराशा पदरी घेऊन आत्याबाई पाय आपटतआपटत पडद्यावरून निघून जातात एक बरंय की, आत्याबाईंच्या लांड्यालबाड्या चित्रपटाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत लांबट न लावता वेळीच आटोपत्या घेतल्यात.

चित्रपट मुख्यत्वेकरून फिरत राहतो तो आजोबा आणि नातवाभोवती. या भूमिकांत अनुक्रमे अलेक गिनेज आणि रिकी यांनी मजाच केली आहे. करारी आजोबाकडून मऊसूत आजोबाकडे होणारं परिवर्तन अलेक गिनेजनं सुंदरच स्पष्ट केलंय. अर्थात त्याच्यातल्या कसलेल्या अभिनेत्याच्या दृष्टीनं हे फारसं अवघड नव्हतंच. खरी कमाल केलीय ती रिकीनं. सोनेरी, सुळसुळीत केसांच्या या बालनटाचं अस्तित्वच इतकं प्लेझंट वाटतं की बस्स ! आणि त्याचा अभिनय, अभिनयाला कुठलं परिमाण लावावं हेच विसरायला लावणारा. ही भूमिका तशी अवघडच. अवघडच म्हणण्याचं कारण ही भूमिका अशा उंबरठ्यावर उभी की, थोडा अति अभिनय त्याच्या हातून होता तर तो आगाऊपणा दिसला असता आणि संपूर्ण भूमिकेचा तोल ढळला असता; पण एकदाही तो ही लक्ष्मणरेषा ओलांडून पुढं जात नाही.

हा चित्रपट जाता जाता शाही रीतिरिवाजांवर जी झकास टिप्पणी करून जातो त्याची खुमारी मात्र प्रत्यक्ष अनुभवण्याजोगी!

—शुभदा रानडे


५००+५ = ४००+५००

**निवडक आणि दर्जेदार राजहंस प्रकाशने**
**आपल्या संग्रही ठेवण्यासाठी**

# राजहंस ऑगस्ट '८४ योजना

आपण ५०० रुपयांची ठेव ५ वर्षांसाठी राजहंस प्रकाशनाकडे ठेवल्यास व्याजाच्या मोबदल्यात ४०० रुपये किंमतीची राजहंस प्रकाशने आपणास मिळतील व ५ वर्षांनंतर ५०० रु. ची ठेवही परत मिळेल.

**शिवाय**

पुढील ५ वर्षांत प्रकाशित होणारी सर्व राजहंस प्रकाशने २५% सवलतीत सभासदांस मिळू शकतील. (पोस्ट खर्च सभासदांचा).

अपेक्षित सभासद नोंदणी झाल्यावर योजना बंद होईल.

**सविस्तर योजना पत्रक मागवा.**

**राजहंस प्रकाशन**
१०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०.
वेळः सकाळी ११ ते ५
•
वा. र. गोडे, जोशीवाडी, चितळे पथ कॉर्नर,
४१, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई ४०० ०२८.
वेळः दुपारी २ ते ७

PAN ADS.

# शरद जोशी : निवडणुका व राजकारण

पृष्ठ ३ वरून

वापराव लागलं असेल. उदाहरणार्थ कोपरगावकडे शंकरराव कोल्हे याचा प्रभाव कमी करायचा तर बोरावके किंवा तत्सम मडळीना उभं करायचं. अशी तुम्ही Counter-elites उभी करता किंवा आपोआप उभी राहत असतील.'

**जोशी** : तुम्हा शहरातले आणि पत्रकार लोकाना कुठली तरी चौकट माहिती असते, पाहिजे असते. त्या चौकटीमध्येच तुम्ही सर्व घटनाक्रमाला बसवू पाहता. एखादी संघटना आपल्या विचारानच लोकाना आकर्षित करून घेऊन त्याचा सतत पाठिंबा मिळवत राहू शकते हे तुम्हाला दिसतच नाही. किंबहुना आपल्या हितसबंधामुळे शेतकरी एकत्र येतो. त्याच्यासाठी त्या क्षेत्रातील कुणी परंपरागत किंवा धनवान अशी वडी असामीच लागते असे नाही.

'आज शेतकरी संघटनेचा कोणताही कार्यक्रम असला तरी नुसती सूचना मिळताच हजारोजण जमतात. कुणी बोलवाव लागत नाही. टेहऱ्याचच उदाहरण घ्या. तिथं गावातलं अस कोण होतं ? पण बैलबड्या जुपून लांबलाबून माणसं जमा झाली.'

शेजारी बसलेल्या भास्करराव बोरावकेंनी, बबनराव शेलारानी या म्हणण्याला पुष्टीच दिली. बबनराव तर आम्हा चौकटवाल्यावर तुटून पडले.

तरीही चिकटपणान विचारतच राहिलो. 'तुमची संघटना जसजशी वाढत जाईल तसतसं तिला अधिक सस्थात्मक रूप येईल, लोकाना गोळा करायच्या mobilization-manouvering च्या क्लृप्त्या अधिक अवगत होत जातील किंवा हे तुमच्यापाशी सर्व असेलच; पण यापुढे त्याचा वापर जास्त करीत जाल.'

न कंटाळता जोशी म्हणाले, 'परत तेच. सघटना म्हणजे तिच्यात अमुक गोष्टी पाहिजेतच हा काय हट्टवाद ? आमची संघटना आहे; पण त्यात जसा जबरीने लोक गोळा करायचा सवाल नाही, तसंच पदाधिकाऱ्याची उतरड, समित्या-उपसमित्या याचा खेळही नाही. त्या वेळच्या कामासाठी काम करणारा एखादा गट निर्माण करतो. लोकही त्या वेळी आमच्याबरोबर असतात.' आज महाराष्ट्रातल्या काही भागात तरी राजकारणी लोकाना दाद न देणारी, हवी तेव्हा उभी करू अशी ही हुकमाची ताकद असल्याचे जोशी म्हणतात.

**मी** : हे सर्व लहान स्तरावरच्या पुढाऱ्यापर्यंत ठीक आहे; पण त्या भागातला एखादा वजनदार पुढारी आला की, परत चित्र पूर्वीप्रमाणे होईल. उदाहरणार्थ नादेड जिल्ह्यात तुमच्या प्रभावाखाली असलेल्या गावात शकरराव चव्हाण किंवा तसा नेता आला तर–

**जोशी** : आबुलगे गावचीच गोष्ट घ्या. तिथं एक–दोन महिन्यापूर्वी शकरराव आले. गावच्या लोकांचा कार्यक्रमाला प्रचड विरोध होता. शेवटी पोलीसबदोबस्तात कार्यक्रम घ्यावा लागला. तिथं लाठीमार वगैरे गोष्टी झाल्याच. त्याउलट काही गावात गावच्या पुढाऱ्याच्या दहशतीमुळे आम्हाला जाहीर सभा न घेता एका घरातच बैठक घ्यावी लागली. पण तिथं गर्दी एवढी जमली की त्याची जाहीर सभाच झाली.

'आणि आता बरोबर कुठं काय व किती जोर आहे हे पाहून लोकं आणू शकतो. सघटनेच्या युक्त्या-प्रयुक्त्या manouvering व mobilization आम्ही करतच आहोत.'

## केवळ बौद्धिक रस !

चौकटीतल्या वगैरे का असेना अपेक्षेप्रमाणे जोशी उत्तर देत होते. सघटनेच्या चर्चेतूनच नेतृत्वाचा प्रश्न आला. अगदी आरभापासून बोरस्ते, बोरावके, कराडपाटील, मोरे ही मंडळी होती तरी सर्वांचा केन्द्रबिंदू (Rallying point) शरद जोशीच होते. नवा विचार माडणारा माणूस, त्याच्यामागची तर्कशुद्ध कारणमीमासा शेतकऱ्यांना समजेल अशा भाषेत (Terminology) मांडणारा–आपली केस बाहेरच्या शहरी-सरकारी-नोकरशाही वृत्तपत्रे याच्या जगापुढे समर्थपणे माडणारा म्हणून आणि शेवटी इडिया आणि भारत हे एक वेगळ समीकरण माडणारा माणूस म्हणून जोशीकडे नेतृत्व येणं अपरिहार्यच होत. आतापर्यंत ते सांगतील ती दिशा होती. मात्र आता दुसऱ्या पातळीवरचंही नेतृत्व तयार झालं. महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा या भागातले अनेक तरुण नेते–संघटक तयार झाले आहेत. हे नेतृत्व आता प्रत्यक्ष शेतकऱ्यांमधून–लहान शेतकऱ्यातून–पुढे येत आहे. यासंबंधीच्या बोलण्यात विचारलं–

'मग ही सघटना आंदोलन सुरू करणारं नेतृत्व (म्हणजे जोशी–मोरे–कराड–बोरस्ते बोरावके) हे या शेतकऱ्यांपासून थोडं वेगळं होत आणि तुमची स्थिती तर अगदी वेगळी म्हणजे एखाद्या आंदोलनासाठी पूर्णपणे वेगळ्या वर्गातला, नेतृत्वगुण निर्णयशक्ती असलेला आणि बुद्धिमंत असा एखादा गट लागतो. लेनिनच्या भाषेत 'व्हॅनगार्ड ऑफ रिव्होल्यूशन ! तुमची विशेषत: स्वत: जोशी याची अशी स्थिती आहे का ?'

जोशीचा दृष्टिकोन वेगळा आहे. ते म्हणतात, 'एक खरं, शोषित कधीच क्रांती करू शकत नाही. बदल घडवून आणू शकत नाही. त्याला ते शक्य नसतं. शोषक क्र. १ व क्र. २ याच्यामध्येच सघर्ष असतो.'

इथे आमच्यातला चौकटीवाला विजयीच झाला. मार्क्सवादातून येणारा अभिजन (Elites) सिद्धांत इथे जाणवतो. याच अनुषगाने स्वत बद्दल बोलताना शरद जोशी म्हणाले,

'मी काही Conviction (निष्ठा) मुळे या कामाला आलो नाही. कुणीही केवळ तात्त्विक निष्ठा म्हणून काही करू लागला की मला भीती वाटते. मी हे स्वार्थातून करत आहे. मी हा सघटनेचा एक प्रयोग करत आहे. त्यात बौद्धिक उत्सुकता असेपर्यंतच मी इथे राहीन. ती बौद्धिक प्रयोगाची उत्सुकता संपली किंवा सपवावी वाटली तर मी कशाला इथे राहू ?'

म्हणजे आता बाकीच्या लोकानी शरद जोशीनी दाखवलेल्याच मार्गाने जावे असे नसणारच. प्रत्यक्ष राजकारणात भाग घ्यावा असं नव्यांना, इतरांना वाटत असेल तर काही हरकत ?

'मुळीच नाही.' त्याच्यातला उदारमतवादी आवेशाने म्हणाला. त्यानंतर जी काय

वाक्यं येतात ती झाल्यावर जोशी म्हणाले, 'आमच्या बैठकीत माझी काय स्थिती असते हे तुम्हाला काय माहीत असणार !'

पोर ऐकत नाहीत अशा थाटातलं हे वाक्य.

## प्रभावक्षेत्रे

सघटनेत येणाऱ्या या संघटन–नेतृत्वाच्या प्रक्रियाना अप्रत्यक्ष मान्यता देतानाच जोशी शेतकरी संघटना हा दबावगट किंवा लॉबी असल्याचा इन्कारच करतात. 'अशा उपाधीमध्ये आम्ही अल्पसख्य असल्याचा आणि अयोग्य, अवाजवी मागण्या करत असल्याचा भाव आहे. तशी आमची स्थिती नाही. शेतकरी हा काही लहान गट नाही. इथला हा 'मुख्य' समाज आहे.'

या मुख्य समाजाला आपल्या स्व-अर्थासाठी संघटनेन जागं केलं असं सांगताना जोशी तिच्या ताकदीबद्दल भरभरून बोलतात. 'आज मी नुसतं म्हटल तरी काहीही प्रयत्न न करता वर्धा–हिंगणघाटाकडेसुद्धा हजारो जण जमतील, म्हटलं तर आदोलन करतील, रस्ता रोकतील.'

पण मतं देतील का ?

हे आपलं तुणतुणं मी लावून धरलेल आहे. 'एवढी शक्ती आहे म्हणता तर ती कुठे व्यक्त करायची नाही का ? का ती शक्ती दाखवायला गेलो तर प्रत्यक्ष दिसणारच नाही अशी भीती तुम्हाला वाटते ? का हा पाठिंबा विरोधी पक्षाच्या सभाना जमणाऱ्या तुफान गर्दीसारखा असतो– मताच्याबाबत शून्य उपयोग ?'

जोशी म्हणाले, 'मत–निवडणुका हा आमचा विषयच नाही. तिथं आम्हाला जायचच नाही.'

मतं नसली तरी त्याशिवाय मिळणारा पाठिंबा हा व्यर्थ आहे अस नाही, हे खरंच. मग या सहानुभूतीच्या, पाठिंब्याच्या एवढ्या मोठ्या स्टॉकचं काय करणार ? ज्यांच्याशी भांडायचं आहे ते आणि तुम्ही कोणत्या आखाड्यात एकत्र येणार ? शेवटी इथल्या राजकीय प्रक्रियेनुसार निवडणूक हा एक आखाडाच आहे. प्रत्यक्ष सत्ता मिळवणं हा निवडणुकांचा दृश्य परिणाम. त्याहीपेक्षा प्रतिस्पर्ध्याला आपल्या कुवतीचं दर्शन घडवणं हा अशा प्रसंगातून साध्य होणारा उद्देश अधिक महत्त्वाचा होता. सघटनेला आपली ताकद मतात परिवर्तित करायची नसली तरी स्वतच्या या ताकदीसबधी स्पष्ट कल्पना असेलच. म्हणून विचारल,

'तरी पण गृहीत धरा की तुम्हाला हा पाठिंबा मतात परिवर्तित करायचा आहे.'

–त्याबाबत मात्र आम्हाला फारसं यश आलं नाही. याला कारण वेगवेगळी असतात. मात्र काही भागात आमची ती क्षमता आहे'

'असे कोणते भाग आहेत ?'

धुळे जिल्ह्यात धुळे तालुका, नंदुरबार, खाली कळवण–नासिक जिल्ह्यांपर्यंत. इथे आम्ही दगड उभा केला तरी तो निवडून आणू अशी आमची खात्री आहे. विदर्भात अमरावती जिल्हा हा आमचा आहे वर्धा–हिंगणघाट भागही. मात्र सातारा, सागली, कोल्हापूर येथे आम्ही प्रभावी नाही. तिथं एक तर गुळाच्या उत्पादनाशी ऊस–उत्पादनाचा सांधा बसला आहे आणि शेतकरी कुटुबातला एक तरी माणूस साखरकारखान्यात नोकरीला आहे आणि त्या भागाची झालेली सर्वसाधारण प्रगती.'

'मराठवाड्यात परभणी, लातूर, नादेड जिल्ह्याचा काही भाग हा आमचा आहे. मराठवाड्यात आमचा वाढता प्रभाव आहे.

'कोकणात ?' –मी.

'काय आहे तिथं ? कोणत्या मुद्द्यावर आम्ही आदोलन सुरू कराव ? अवघ्या महाराष्ट्रात आंदोलन करायच, पसरायचं हा आमचा निश्चय नाही. गरज असेल, पाठिंबा उभा राहील तिथे आम्ही असतो. सांगलीकडचे द्राक्षमळेवाले, फूड प्रोसेसिंग–कॅनिंग करणारे बागायतदार आमच्या वाट्याला जात नाहीत. आम्ही त्यांच्याकडे नाही.'

'धुळे जिल्ह्यात पी. के. पाटील वगैरे मडळीचा धाक असा काही ?'

'नाही, आम्ही त्यांच्या वाट्यालाच जात नाही. म्हणजे सभा–मेळाव्यातून जोरदार चकमक करतो; पण प्रत्यक्ष असा सघर्ष होऊ देणार नाही. कारण नंतर हे आदोलन नको असलेल्या शक्तींच्या हातात जाईल. ते त्याचा वेगळा उपयोग करतील.'

'मग निवडणुकीचं काय ? एवढी शक्ती असल्याचा दावा करता. तर मग वापरत का नाही ? तुम्हाला भरवसा नाही ?' आता तो मुद्दा निकरावरच आणला.

'छे– तसं मुळीच नाही.'

## निवडणुकांवर बहिष्कार नाही

'मग येत्या निवडणुकीत अमुक एका पक्षाला मत द्या असं सागणार का ? का कुणालाच नको अस सागणार ? कारण तुमच्या प्रश्नाची समाधानकारक उत्तरं कोणीच पुढारी देणार नाही. आश्वासनं मात्र सगळेच देतील त्या वेळी तुम्ही काय सांगणार ?'

जोशी. 'निवडणुकावर बहिष्कार टाकण्याचा तर मी कधीच सल्ला देणार नाही. कारण निवडणुकातून काही साध्य होत नसलं तरी गावातल्या लोकाना पाच वर्षांनी येणारी ती एक जंगी करमणूक. थोडी स्वतःची जाणीव करून देणारी. झुजणारे कोंबडे पहायची सधी मिळते. तो आनंद कशाला त्यांच्याकडून हिरावून घेऊ?'

मध्येच निरंजन सरळ म्हणाला, 'हुकूमशाही शक्तीचा धोका असल्यानं, अमुक एका पक्षाला मत द्या, देऊ नका–विरोधकांना द्याव अस नाही वाटत ? निवडणुकीच्या सदर्भात याच महत्त्व नाही वाटत ?'

जोशी : मी तर म्हणतो, अगदी हुकूमशाही जरी आणली आणि धान्याला रास्त भाव दिला तरी त्या हुकुमशाहीचा प्रभाव पडणार नाही. कारण राजकीय सत्तेचा उगम, त्याचं स्वरूप हे आर्थिक व्यवस्थेनुरूप, भाडवलनिर्मितीच्या प्रक्रियेतूनच ठरत असतं !'

माझ्यातलाही चौकटवाला खुष !

मग पजाबचा प्रश्न निघाला. त्यावर शरद जोशीनी अजून जोरात सागितलं, 'हा अकालीदलाचा वगैरे काही प्रश्न नाही. पंजाबात गव्हाला १९० रुपये भाव द्या. एका महिन्यात मी पजाबचा प्रश्न सोडवतो.' इथे मग त्यानी रोमेश थापर–गुजराल–निखिल चक्रवर्ती याच्यासारखी शीख (जाट) शेतकरी –हिंदु व्यापारी अशी व त्या धर्तीवरची स्पष्टीकरणे दिली. एक तर अगदीच भिडणारा मुद्दा त्यानी माडला. '१९० रुपये भाव दिला तर फार खर्च येतो म्हणे. अहो, तेवढा दिला तर सैन्य–शस्त्रास्त्र आणि त्याहून इतर प्रचंड खर्च करायची वेळच येणार नाही.'

इथपर्यंत चर्चा ही सगळी प्रत्यक्ष धोरणाला व कृतीला धरून झाली. आगामी निवडणुकाच्या वेळी शेतकरी सघटनेच धोरण काय असेल त्यासबधी शरद जोशी स्पष्ट काहीच बोलत नव्हते. त्यानी सूचित केल्याप्रमाणे

त्याची आता एकसंध पकड पूर्वीसारखी राहिली नसेल म्हणून ते कुठेच Commit होत नसतील.

**राजकारण म्हणजे केवळ संस्था नाहीत**

शेतकरी संघटनेनं निवडणुका लढवाव्यात किंवा कोणत्या तरी मार्गानं त्यात भाग घ्यावा, ही काही जणांची वृत्ती म्हणजे काही तरी वेगळी–अश्लाघ्य अशी नाही. शरद जोशी ज्या राजकारणाला ( पर्यायान सत्ता-कारणाला ) टाळायचं म्हणतात, ते टाळणं शक्य नाही. कारण संघटना–उभारणी केली तेव्हाच त्यांनी राजकारणात प्रवेश केलेला आहे. त्यानंतरचा अपरिहार्य परिपाक म्हणजे आताची प्रवृत्ती.

जोशी ज्या गोष्टीला राजकारण म्हणतात आणि 'त्या चौकटीत आम्ही बसत नाही.' यासारखी विधाने करून इतरांना चौकटीतले विचार मांडणारे म्हणतात, त्या वेळी काही गोष्टींचा Polemics बाजूला सारून गंभीर-पणे विचार करावा लागेल.

मंत्रीपद–सत्ता– संस्था त्यांनी घेतलेले निर्णय–निवडणुका एवढे म्हणजे राजकारण हीसुद्धा शरद जोशींनी मनात धरलेली चौकटच आहे. राजकारण हे एवढे मर्यादित नसते. ते केवळ संस्थापदे Institutions, formal laws & decisions ) एवढेच नसते. राजकारण ही एक समाजातील अपरिहार्य, अंगभूत प्रक्रिया आहे. ढोबळपणे तिचा तपशील असा सांगता येईल–

कोणतीही गोष्ट साध्य करण्यासाठी, मनाप्रमाणे घडवून आणण्यासाठी निर्णय-प्रक्रिया ताब्यात पाहिजे. राजकारण म्हणजे *निर्णयप्रक्रियेवर नियंत्रण मिळविण्यासाठीचे* प्रयत्न व त्यानंतरची प्रक्रिया. याचा मार्ग म्हणजे सत्ता–POWER. ही power केवळ पदामध्ये किंवा औपचारिक संस्थामध्येच असत नाही. प्रत्येक व्यक्ती किंवा गटाची असलेली भिन्न–भिन्न प्रकारची ताकत, साधने (Resources) कौशल्य (skills) यामुळे ही 'सत्ता' तयार होते. ही 'निर्णय-प्रक्रियेवरची सत्ता' जीवनाच्या अनेक क्षेत्रात असते. किंबहुना तो प्रत्येक जीवनप्रक्रियेचा अंतर्निहित भाग आहे. म्हणूनच खेळात, शिक्षणात, कला–संस्कृतिक्षेत्रात 'राजकारण' असतं. त्याचं कारण Power to decision making हेच.

किंबहुना 'Politics is power to authoritative allocation of resources within that system' हे फार महत्त्वाचं निरीक्षण आहे. एकदा हे मान्य केलं म्हणजे आपली कोणत्याही क्षेत्रातली निर्णयप्रक्रि-येशी निगडित कृती ही राजकारण असते. शरद जोशींनी अगदी निवडणुका, पदे टाळा-यचो म्हटली तरी त्यांनी संघटना उभारणे ही राजकीय कृतीच आहे. या संघटनेमुळे *निर्णय–सत्ता या बाबीवर* केवढा परिणाम झाला आहे. आज निवडणुकामध्ये किंवा इतर सामाजिक घटना व कृतीमध्ये शेतकरी संघटना विचारात घेणे आवश्यक झाल की नाही ?

शरद जोशीच्या हातात (आतापर्यंत तरी) या शक्तीचं काय करायचं, कुठे वळवायचं, त्यानुसार इतर ताकददार मंडळींना (मंत्री–आमदार–सभापती इ.) कसं पेचात पकडा-यचं या गोष्टी आहेत. त्यामुळे शरद जोशी राजकारण करत नाहीत हे म्हणणं निरर्थक आहे. तो अपरिहार्य परिपाक आहे.

एवढंच की राजकारण यासंबंधीची चौकट इथे व्यापक व पायाभूत घेतली आहे. शरद जोशींची राजकारणाच्या व्याप्तीची चौकट मुळातच संकुचित व वरवर दिस-णाऱ्या गोष्टींवर आधारित आहे. त्या लहा-नशा चौकटीतच ते आपल्या कृती बसवतात.

राजकारण एकदा अपरिहार्य प्रक्रिया म्हटली आणि संघटना उभारली की तिचे पुढचे परिणाम हे आपोआप त्या स्थितीला धरून होतात. मग शरद जोशी किंवा कराड-पाटील यांची मते व कृती काहीही असोत.

*आंदोलन – चळवळ – संघटना – संस्था* (Institutionalization) व शेवटी मठ (school) हा प्रवास अजूनपर्यंत चुकला नाही. ही एक social dynamics ची बाजू आहे. मात्र आपण राजकारण करत आहोत हे मान्य करण्यासंबंधी प्रचंड संकोच आहे. निर्णयप्रक्रियेतून आपल्याला हवं ते काढून घ्यायचा प्रयत्न तर चालतो. मात्र त्या प्रक्रि-येला असलेलं 'राजकारण – पॉलिटिक्स' हे नाव नको वाटतं. नाव नसलं तरी प्रक्रिया बदलत नाही; पण आपली आधीची भूमिका चूक ठरेल ना! म्हणून आपण बदललोच नाही असा हेका धरला जातो किंवा बदल-णार नाही, बदलायची गरज नाही अशी भविष्याची ग्वाहीसुद्धा दिली जाते.

अगदी आत – या हेक्याला एक व्यक्ति-गत अस्तरही असतं का ?

दुसरी गोष्ट चौकटीची हा एक चांगला सोयिस्कर शब्द निर्माण झाला आहे. मार्क्स-वादाच्या False consciousness, शंकरा-चार्यांच्या 'विवर्तवादा'च्या परंपरेतीलच ही एक संज्ञा. तर्क संपला की, वापरण्यास मोकळे. चौकटी कुणाला चुकल्या ? शरद जोशींचा एक–कलमी कार्यक्रम, पंजाब तोडगा, गरिबी-वर अक्सीर इलाज ही चौकटच नाही का ? त्याही पुढे त्यांचे भांडवलनिर्मितीसंबंधीचे विवेचन, Line of significant contradiction (आठवा–माओ) या सगळ्या जुन्याच चौकटी आहेत आणि त्या फार तोकड्या आहेत. वैचारिक दूषणे ही दोन्ही बाजूकडून लावली जाऊ शकतात.

तात्पर्य, राजकारण टाळतो असं म्हणणे म्हणजे एक आत्मवंचनाच आहे. त्या मार्गाने तर जायचं, त्याचं नाव मात्र घ्यायचं नाही ही एक धार्मिक ब्राह्मणी संस्काराची 'आपद्-धर्म' तऱ्हेची वृत्ती आहे.

आपण राजकारणच खेळत आहोत. यात सर्व शक्ति–कौशल्याचा उद्दिष्ट प्राप्तीसाठी अनेक मार्गांनी उपयोग करायचा हे एकदा खुलेपणानं मान्य केलं की, निवडणुका–पद-प्राप्तीसंबंधीची दडस (Inhibition) राहत नाही. मग याबाबत कसाही निर्णय घेतला तरी चालतो. निवडणुका लढवायच्या नाहीत हा निर्णय मग वरवरच्या तत्त्वज्ञाना-तून न येता धोरणात्मक (pragmatic strategy) म्हणून येतो. अशा वेळी आपणच *गैरसमजातून घालून घेतलेली बंधने जातात* आणि कोणताही निर्णय हा अधिक खुला (Frank) असतो.

सध्याच्या राजकीय परिस्थितीत शेतकरी संघटनेला काही तरी निर्णय घेणे प्राप्त आहे. तो निर्णय कोणताही असला तरी तो कोणत्या तरी अढीतून किंवा चौकटीतून घेतला जाऊ नये.

( शब्दाला शब्द परत केल्याचे समा-धान ! )

□

# दीपावली शुभेच्छा

१. माधव कानिटकर, प्रपंच प्रकाशन, पुणे
२. एच. आर. बर्वे, पुणे
३. जगन्नाथ कुटे, कतार
४. विनय सहस्रबुद्धे, मुंबई
५. प्राकृती प्रिंटर्स, सातारा
६. आमची पंधरावी कला, पुणे
७. शिवाजी सिताराम जवळकर अॅण्ड सन्स, सोलापूर
८. राहूल सप्लायर्स, इचलकरंजी
९. डॉ. अरविंद लेले, पुणे
१०. सुनील बेल्हे, जळगाव
११. कमलेश कन्स्ट्रक्शन कं., पुणे
१२. श्री. व सौ. मिरजकर, नवी दिल्ली
१३. प्रतिमा प्रकाशन, पुणे
१४. श्री. मोरेश्वर दाते, सौ. मृणालिनी दाते, नातेपुते
१५. जनसत्ता कार्यालय, अहमदाबाद
१६. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, पुणे
१७. समाजवादी महिला सभा, पुणे
१८. सुहास बाक्रे, माधवी बाक्रे, ठाणे
१९. काशिनाथ बाळासा गुजराती अॅंड सन्स, शहापूर
२०. बांबु–आर्टिस्ट, अकोला
२१. रघुपती भट्ट, पेठ वडगाव
२२. केमोक्रॅटस्, पुणे
२३. एस. डी. नेरॉय, मुंबई
२४. मोहन दिनकर पाठक, सौ. विजयश्री मोहन पाठक, डोंबिवली
२५. लोकप्रतिनिधी, पुणे
२६. श्याम भिडे, डोंबिवली
२७. प्र. स. गद्रे, सौ. आशा गद्रे, मुलुंड
२८. फिरोज रानडे, प्रतिभा रानडे, मुंबई
२९. यशवंत, सौ. सुजाता ठकार
३०. स्टुडिओ पार्करसन, पुणे
३१. पी. एस. देशपांडे, पुणे
३२. महावित्त मंडळ, मुंबई
३३. नॅशनल लॅंग्वेज सर्व्हिस, मुंबई
३४. मोहन कुलकर्णी, मुंबई
३५. दै. तरुण भारत, पुणे
३६. सुरेश नावडकर, पुणे
३७. चंदन बेदरकार, मुंबई
३८. शांताराम को. सगणे, मुंबई
३९. बागलकोटे परिवार, बडोदा
४०. बाबू उडुपी, पुणे
४१. पत्की अॅण्ड दामले असोशिएटस्, पुणे
४२. क्रांती बुक डेपो, जळगाव
४३. प्रिंट्रोल कंपनी, नाशिक
४४. सतीश नाईक, नीता नाईक, सायन
४५. सूर्यकांत दाणेकर, सुरेश कुलकर्णी, उस्मानपुरा
४६. जोरी बंधू, पुणे
४७. त्रिमूर्ती आर्टस्, पुणे
४८. खाडिलकर प्रोसेस स्टुडिओ, प्रिंट लिंक, प्रिंटेज, पुणे
४९. बजाज टेम्पो, पुणे
५०. श्री. व्ही. डी. मेहरूणकर, पुणे
५१. महेश कुलकर्णी, सौ. चारुशीला कुलकर्णी, नासिक
५२. एस. व्ही. होनप, महिंद्र ओवेन लि, पुणे
५३. श्री. शामराव भिडे, सौ. अनुराधा भिडे, इचलकरंजी
५४. पॉप्युलर ब्रेड फॅक्टरी, भुसावळ
५५. सी. एम. भावे, पुणे
५६. अदिज अॅडव्हरटायजिंग, पुणे
५७. डेव्हिड ब्राउन ग्रीव्हज लि., पुणे
५८. विजय फाउंडर्स, कोल्हापूर
५९. स्टेप इन प्रोसेसेस, पुणे
६०. मयूर प्रिंटर्स, पुणे
६१. ओक हॉस्पिटल, साधना क्लिनिक, पुणे
६२. एल. डेकॉर, स्पीडिकॉन, बिल्ड क्विक, सुविधा सर्व्हिस, हॉटेल अश्वमेघ, मुंबई
६३. विशाल ट्रेडिंग कंपनी, पुणे
६४. उज्ज्वला मेहेंदळे, पुणे
६५. स्टॅन्डर्ड प्लेटस् अॅण्ड वेसलस प्रा. लि., पुणे
६६. स्टॅन्डर्ड मॅटॅलर्जिकल लॅब, पुणे
६७. गंगाधर हवालदार, पुणे
६८. मयूर पारीख, अंजली पारीख, पुणे
६९. आशिष एन्टरप्रायझेस, पुणे
७०. डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर, दिल्ली
७१. पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, पुणे
७२. सौ. शरयू रानडे, मुंबई
७३. श्री. पद्माकर व सौ. वसुधा सोहोनी, पुणे
७४. उत्तम जाहिरात वितरक, पुणे
७५. अरुण इंजिनिअरिंग वर्क्स, बेळगाव
७६. मे. मयूर बॅटरी इंडस्ट्रीज, पुणे
७७. अलंकार पब्लिसिटी, कोल्हापूर
७८. सुरेश शंकर खेर, मुंबई
७९. उषा मेहता, मुंबई
८०. डी. आर व सौ. नलिनी पेंडसे, मुंबई
८१. श्री. व सौ. व्ही. एन. रानडे, मुंबई
८२. मे व्ही. बी. अभ्यंकर अॅण्ड ब्रदर्स, पुणे

वरील सर्व व्यक्तींनी, संस्थांनी पाठवलेल्या दीपावली शुभेच्छा पत्रांबद्दल आभारी आहोत.

राजहंस प्रकाशन, पुणे । साप्ताहिक माणूस । साप्ताहिक मुद्रण, पुणे

# नाट्यपंढरी



## □ घनःश्याम गहिवरला !

नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकरांनी वृंदावन, घनःश्याम, साबाजी मातंग युवराज, सेनापती विक्रमसिंह अशा अनेक भूमिका गाजविल्या; पण चिंतामणराव म्हटले की, आधी आठवण होते, ती त्यांच्या 'भावबंधन'-मधल्या 'घनःश्याम'च्या भूमिकेचीच ! आयुष्यभर त्यांचा घनःश्याम गाजला. ताजा टवटवीत राहिला. गडकऱ्यांच्या नाटकात भक्तिभावाने रंगणे हा कोल्हटकरांचा कुळाचार–कुळधर्मच म्हणा ना ! कारण चिंतामणरावांचे सुपुत्र चित्तरंजन आज घनःश्यामचा वसा मनोभावे वशीत आहेत. परंपरेने गडकऱ्यांचा घनःश्याम त्यांच्या घरात आला आहे.

चिंतामणरावांच्या उतारवयात (१९५६-५७ साल असेल) ते नाटयव्यवसायातून, तसे निवृत्तच झाले होते. तरी पण त्याना घनःश्याम करण्याचा आग्रह रसिकांकडून वारंवार होई; पण ते म्हणत, 'आता तरुण मंडळी तयार झाली आहेत. घनःश्याम करण्याचे – मुलीला मागणी घालण्याचे – विशीपंचविशीचे माझे वय नाही. मी आता धनेश्वर-धुंडिराजांच्याही पुढे गेलो आहे'; पण एका प्रयोगात त्यांनी धुंडिराज करण्याचे मनावर घेतले.

योग असा की–ते धुंडिराज तर त्यांचे चिरंजीव चित्तरंजन–घनःश्याम. तालमीत तर एकदा अशी मजा झाली की, घनःश्याम –धुंडिराज यांचा पहिलाच प्रवेश सुरू झाला. 'माझे नाव घनःश्याम' म्हणून चित्तरंजनांनी आपल्या संवादाला सुरुवात केली; पण त्यापुढचे धुंडिराजचे नि त्यानंतरचे घनःश्यामाचे–असे सर्व संभाषण चिंतामणरावच बोलत राहिले. मध्येच थांबले नि म्हणाले, 'काय रे, तू का बोलत नाहीस ?' चित्तरंजन हळूच म्हणाले, 'काका, आपल्या दोघांचेही संवाद तुम्हीच म्हणत आहा.' 'असं झालं होय ? मग आधीच नाही का सांगायचं ?' हाडीमाशी खिळलेला घनःश्याम त्यांची पाठ थोडीच सोडणार ? नुसता घनःश्यामच नव्हे तर सगळा गडकरी त्यांच्या रोमारोमात भिनला होता !

प्रत्यक्ष प्रयोग फारच सुरेख झाला. चिंतामणरावांचा धुंडिराज ज्यांनी पाहिला ते भाग्यवान ! पहिल्या अंकातल्या रेल्वे-स्टेशनच्या पाचव्या प्रवेशात, पोलीसवेषात घनःश्याम प्रवेशतो नि महेश्वराच्या सहाय्याने अश्राप धुंडिराजास दागिन्यांच्या चोरीच्या लचांडात गुंतवितो. कबुलीजबाब लिहून घेतल्यावर दयेखातर त्याला मोकळा सोडतो. या प्रसंगात अखेर, 'सरकार, आपले उपकार मी जन्मभर विसरणार नाही' असे सांगून धुंडिराज घनःश्यामाच्या पायावर डोके ठेवतो घनःश्यामाच्या (चित्तरंजनच्या) पायावर, काकांनी (चिंतामणरावांनी) जन्मदात्या पित्यांनी डोके ठेवताच त्यांच्या अंगात सरकन वीज चमकून गेली. अंगावर काटा उभा राहिला. क्षणभर काही सुचेना ! (पण इथेच अंकाचा पडदा पडतो.) पडदा पडल्यावर चिंतामणराव उभे राहिले नि चित्तरंजनच्या पाठीवर हात फिरवीत म्हणाले, 'अरे, तू का असं डोळयाला पाणी आणतोस ? तुझे वडील नाही तुझ्या पाया पडले–पाया पडला तो मालतीचा बाप–धुंडिराज !' धन्य तो पिता नि धन्य तो पुत्र !

## □ बेटा से बाप...


चित्तरंजनचा घनःश्याम प्रेक्षकांना एकदम आवडला होता. अनेक प्रयोगांत गावोगावी ते घनःश्याम म्हणून उभे रहात होते. ते खेळ ठेकेदारांचे असत अगदी मा. नरेशपासून तो नयना आपटेपर्यंत दहा-पंधरा कलाकार 'लतिका' म्हणून त्यांच्याबरोबर उभे राहिले असतील.

पुण्यातल्या एका प्रकाशकांकडे गडकऱ्यांच्या नाटकांच्या प्रयोगाचे हक्क आहेत. त्यांचे नि भावबंधनचे प्रयोग लावणाऱ्या कॉन्ट्रॅक्टरचे खेळाच्या रॉयल्टीवरून भांडण झाले होते. त्यांनी प्रमुख कलाकारांना काम करू नये म्हणून नोटिसा बजावल्या होत्या. चित्तरंजननेही अनवधनाने ती नोटिस स्वीकारली होती; पण मुंबईच्या खेळात काम करण्याचेही कबूल केले होते. विनोद असा, की मुंबईच्या प्रयोगाच्या दिवशी कलावंतांना काम करू न देता, खेळावर बंदी आणण्यासाठी ते प्रकाशक नि त्यांचे वकील 'डेक्कन क्वीन' ने मुंबईला चालले होते. चित्तरंजनही त्याच डब्यात होते. प्रकाशक नि त्यांचे वकील यांच्याशी त्यांच्या गप्पाही झाल्या; पण 'आपण प्रयोग बंद पाडण्यासाठी जात आहो' याची त्यांनी ताकास तूर लागू दिली नाही. दादरला उतरल्यावर, एकदा थिएटरवर चक्कर मारावी म्हणून तिकडे गेले. मग हिंदु कॉलनीतल्या आपल्या घरी गेले. त्याआधी ही मंडळी चिंतामणरावांना भेटायला गेली होती. हेतू हा की, चित्तरंजनने त्या प्रयोगात काम करू नये, नाही तर तो पकडला जाईल हे चिंतामणरावांनी त्याला समजावून द्यावे; पण चिंतामणराव कसले मख्ख ! ते म्हणाले, 'हे पहा तुम्ही सांगितले हे ठीक; पण त्याचा तो जाणता आहे. त्याला हवे ते करू द्या!' असे सांगून त्यांची बोळवण केली.

थोड्या वेळाने, चित्तरंजन घरी आल्यावर 'काय रे, तुझ्या आजच्या प्रयोगाची काय भानगड आहे ? ते रॉयल्टीवाले नि त्यांचे वकील आताच येऊन गेले.' असे चिंतामणरावांनी विचारले. 'हो मलासुद्धा ते आताच कळलं. मला काम करू देणार नाहीत म्हणे!' –चित्तरंजन.

'हे बघ, मुळीच काळजी करू नको. आधी आपल्या सॉलिसिटर रेगे यांना भेटून ये. ते काय म्हणतात ते पहा आणि येताना त्या तुमच्या कल्पाची एक बाटली घेऊन ये!' –चिंतामणराव. त्यावर चित्तरंजन साहजिक म्हणाला, 'कल्प कशाला ?' त्यावर चिंतामणराव म्हणाले, 'अरे, असावी गरज पडली तर ! तुझं काम ज्या प्रवेशात ज्या वाक्याला बंद पाडतील तिथपासून मी सुरू करीन. मी उभा राहीन घनःश्याम म्हणून ! मला हवा ना कल्प. जा, खेळ झालाच पाहिजे!'

वा रे वा ! बेटा से बाप सवाई !



**श्रीग्रामायन**

**बलसागर**

या पूर्वीच्या दोन पुस्तकांप्रमाणेच

**निर्माणपर्व**

या प्रस्तुत पुस्तकाचा विषय आहे विकसनशील, स्वावलंबी भारत.
एका खळबळजनक कालखंडातील हे चिंतन. चळवळीतील प्रत्यक्ष सहभागाची पार्श्वभूमी लाभलेले – शदादे चळवळ, जेपींचे बिहार आंदोलन, आणीबाणी, जनता पक्षप्रयोग, ग्राहकचळवळ, म्हैसाळप्रयोग . . .

★

श्रीग्रामायन या पुस्तकाबद्दल एका तरुण वाचकाने लिहिले होते – ' ग्रामीण भारताच्या वाटांचा शोध घेणाऱ्या कोणाही कार्यकर्त्याला ' श्रीग्रामायन ' मध्ये रेखाटलेली या ग्रामजीवनाची चित्रं आजच्या काळात आणि संदर्भात तितकीच ताजी वाटावीत, अशी आहेत. कदाचित त्यांना वाट पुसतच एखादा पुढली चित्रं चितारू शकेल. '

याच वाचकाने ' बलसागर ' बद्दल लिहिले होते – ' विविध विचारधारांना खुल्या मनाने लेखक येथे सामोरा जात आहे. त्यांचे सुस्पष्ट व तर्कसंगत विश्लेषण येथे आहे आणि आजच्या संदर्भात भारतीय राष्ट्रवादाची नवी मांडणी करण्याचा प्रयत्नही आहे. '

या पुस्तकात, या ' निर्माणपर्वा ' तही हा प्रयत्न आहे.

एक नवी मांडणी आहे. समन्वयाचे पूर्वसूत्र आणखी पुढे नेले आहे . . .

★

**हा समन्वय कोणत्या शक्तींचा ? कोणते प्रवाह एकत्र यायला हवेत ?**

# ॥ निर्माणपर्व ॥

हे पुस्तक याचा शोध घेणारे आहे.

**लेखक : श्री. ग. माजगावकर**

**राजहंस प्रकाशन**

**मूल्य चाळीस रुपये**

पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.